श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ६५

श्रीएकनाथमहाराज प्रणीत

# आनंदानुभव

श्रीदासराममहाराजकृत श्रीआनंदविलास टीकेसह

**प्रकाशक** : **सौ.रोहिणी चंद्रशेखर केळकर**
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, गांवभाग,
सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३,
भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

**प्रथम आवृत्ति** : इ.स. २०१६

**प्रकाशन दिन** : फाल्गुन व.६ शके १९३७
मंगळवार दि.२९/३/२०१६
श्रीएकनाथ षष्ठी

© श्री.दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन

**मुद्रक** : श्री. अनिल लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

---

**प्रत मिळणेचे ठिकाण :** श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३, भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ६५

श्रीएकनाथमहाराज प्रणीत

आनंदानुभव

श्रीदासराममहाराजकृत श्रीआनंदविलास टीकेसह

ॐ

◆ संपादक ◆

प्रा.डॉ.के.वा.आपटे

◆ प्रकाशक ◆

सौ.रोहिणी चंद्रशेखर केळकर

आवृत्ति पहिली सांगली इ.स. २०१६

।। श्रीराम ।।

## प्रार्थना

'श्रीदासराममहाराजकृत श्री आनंदविलास टिकेसह श्रीएकनाथमहाराज प्रणित आनंदानुभव' प्रकाशित करीत आहेत सौ.रोहिणी केळकर ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

'' ज्ञानाचा एका आणि नामाचा तुका'' असे एक अध्यात्मिक क्षेत्रात अवतरण आहे. त्या श्रीएकनाथमहाराजांनी आनंदानुभव लिहीला. आनंदो ब्रह्मेति असे श्रुती वचन आहे. हा आनंदानुभव आहे, बह्मानुभव आहे. यावर माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराजांनी श्रीआनंदविलास टीका लिहीली आहे हा चिद्विलास आहे.

या आनंदानुभव ग्रंथावरील टीका श्रीदादांचेकडून लिहून झाल्यावर आपल्या श्रीदादांच्या स्वप्नात चिमडच्या महाराजांचे अधिकारी चिरंजीव प.पू. श्रीउध्दवरावजीमहाराज यरगट्टीकर आले होते व त्यांनी श्रीदादांना आशीर्वाद दिला. ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे.

प.पू.श्रीरामचंद्ररावजीमहाराज यरगट्टीकर हे श्रीएकनाथमहाराजांचे अवतार होते. त्यांचेबाबतीत श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस म्हणतात, ''महाविष्णु तू एकनाथ तू । स्वामी गुरुनाथा ।।'' तर उध्दवरावजीमहाराजांच्या कानाला जन्मापासूनच मोठी भोके होती. म्हणून प.पू.लक्ष्मीबाई अक्का म्हणतात '' हा उध्दव म्हणजे एक कानफाट्या योगी चिमडच्या महाराजांचा पुत्र म्हणून जन्माला आलेला आहे.'' श्रीउध्दवरावजीमहाराज म्हणजे श्रीगोरक्षनाथांचा अवतार असे माझे पितृदेव श्रीदादा म्हणत असत. त्यादृष्टीने या ग्रंथाला श्रीउध्दवरावजी महाराजांचे आशीर्वाद आहेत असे मला वाटते. याला फार मोठे महत्व आहे.

हा ग्रंथ माझ्या सारख्या परमार्थ पायीकांना अत्यंत उपयोगाचा ठरणार आहे. तसा तो ठरावा अशी प्रार्थना भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर, माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर या त्रैमूर्तींचे चरणी करतो.

शेवटी भगवान श्रीसद्गुरु श्री निंबरगीकरमहाराज यांचे पासून आलेल्या या चिन्मय संप्रदाय परंपरेला अभिवादन करून येथेचे थांबतो.

**'' निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई**
**एकनाथ नामदेव तुकाराम ।।''**

**'' पुंडलिक वरदा हरि विठ्ठल श्रीज्ञानदेव तुकाराम ।**
**पार्वतीपते हरहर महादेव श्री गुरुदेव दत्त ।।''**

शेष श्रीराम स्मरण

सांगली,
७/३/२०१६
महाशिवरात्र

श्रीदादांचा कृपाभिलाषी
चंद्रशेखर
(चंद्रशेखर रामराय केळकर)

# प्रस्तावना

''ज्ञानाचा एका'' असे एक वचन आहे. त्याचा अर्थ आहे की ज्ञानेश्वर महाराज हेच एकनाथमहाराजांचे रूपाने पुनः जगतीतलावर अवतरले . श्री. ज्ञानेश्वर महाराजांचे प्रमाणे श्री. एकनाथ महाराजांचे अनेक ग्रंथ आहेत. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव हे ज्ञानेश्वर महाराजांचे मुख्य ग्रंथ असले तरी त्यांचे जोडीने त्यांचे ज्ञानदेवतेहत्तिशी इत्यादी अनेक प्रकारचे ग्रंथ आहेत. असाच प्रकार एकनाथ महाराजांचे बाबतीत दिसून येतो. भावार्थ रामायण, एकनाथी भागवत, हे त्यांचे प्रधान ग्रंथ. याखेरीज चिरंजीवपद, प्रकाशदीपिका इत्यादि काही लघु प्रकरण ग्रंथ एकनाथ महाराजांचे आहेत. एकनाथ महाराजांच्या अशा प्रकरण ग्रंथांत ''आनंदानुभव'' नावाचा एक प्रकरण ग्रंथ आहे.

आनंदानुभव ग्रंथ हा सुगम, रम्य ओव्यांनी बनलेला आहे. आणि तो गुरु–शिष्य – संवाद रूपाने आहे. या ग्रंथाचे काही उपविभाग एकनाथ महाराजांनी दिलेले नाहीत. तथापि आढळले ते असे :–

१) ग्रंथाचा प्रारंभ शिष्याच्या वचनाने होतो. त्याचे वचन १ ते ७ ओव्यांमध्ये आहे. त्याचे म्हणणे असे की मला काही ब्रह्म जाणून घ्यावयाचे नाही, तर 'मी कोण' हे मला जाणून घ्यावयाचे आहे. आणि त्याचा खुलासा गुरुंनी मला करावा अशी त्याची अपेक्षा आहे. तो म्हणतो, ''मज द्यावा निश्चय। जो मी कोण असे।। मी कोण कोणाचा। कोठोनी आलो कोठे जायाचा। निश्चय बरवा सांगावा आता। कृपा करुनि स्वामिनाथा (५,७)

२) शिष्याच्या या प्रश्नाचे समाधान गुरु ओवी ८ ते २०१ मध्ये करतात. गुरुचे मुख्य सांगणे आहे की, शिष्य हा ब्रह्मच आहे. (म्हणजे जीव हा ब्रह्म आहे). संकल्पामुळे जीव ही संकल्पना येते. संकल्प विकल्प लयाला गेले की जीव ब्रह्मच होतो. (जरी संकल्प विकल्प सांडिशी । तरी तू ब्रह्मची असशी। संकल्पे आणिले जीवदशेसी । संकल्प लोपे तू पर ब्रह्म ।। ५१।। संकल्प निमता जीवदशा जाय। मग स्वयंपर ब्रह्मचि आहे ।।५३।।) पण हे कळण्यास सद्‌गुरु आवश्यक आहे. (म्हणोनि सद्‌गुरुशी । शरण जावे सद्‌भावेशी। तो तात्काळ करी शिष्याशी । परब्रह्म ।।६६।।) नंतर गुरु शिष्याला सांगतो ''सोहंब्रह्म मी हे स्मृती। असों दे सदा ।।११६।।) या मुख्य विषयाच्या अनुषंगाने गुरूने कर्म, अज्ञान, भक्ती, रज्जूसर्प, ज्ञान इत्यादि अनेक विषयांचा उहापोह केला आहे.

३) त्यावर पुनः शिष्याचे गुरूचे स्तुतिपर वचन ओवी क्रमांक २०२ ते २१० यामध्ये आहे.

४) त्यावर गुरूचे म्हणणे २११–२३२ ओव्यांमध्ये येऊन जाते.

५) त्यानंतर २३३–२४१ या ओव्यांत एकनाथमहाराज प्रस्तुत प्रकरणाचा समारोप करतात. या समारोपात एकनाथमहाराज म्हणतात :–

अ) हे वाक्पुष्प पूजा । घडो श्रीगुरुराजा । एकनाथ म्हणे तुझा ।। २३३।।

आ) एकनाथमहाराजांच्या मते आनंदानुभव ''हा ग्रंथ अध्यात्मपूर्ण । गुह्याचेही गुह्यज्ञान।।२३७।। (इ) आणि ''येथीचा गुह्यार्थ जाणता । ब्रह्मत्वे पूर्ण होय श्रोता वक्ता । भक्ति सायुज्यता। पाया लागे ।।२३८।। (ई) तसेच ''हा ग्रंथ जे अनुभवोनी राहति । ते या देहीच ब्रह्म होती।। (२३४)

प्रस्तुत प्रकरणाला ''आनंदानुभव'' असे नाव दिले गेले आहे. पण हे नाव ग्रंथातील ५४१ ओवीत कुठेही येत नाही. मग हे शीर्षक कोठून आले? या प्रश्नाचे उत्तर असे दिसते :–

गुरूच्या वचनांमध्ये अद्‌वयानंदी (१०८), अद्‌वयानंद (१११) अद्‌वयानंदी(१६०), अद्‌वयानंदपणे (१८८) अशाप्रकारे शब्द येतात. शिष्याच्या भाषणात 'चिदानंद' (२०८) असा शब्द येतो. आणि ओवी क्र. २४१ मध्ये ग्रंथानुभव असा शब्द येतो. तेव्हा असे दिसते की हे शब्द जोडून, हे प्रकरण प्रकाशित करणाऱ्यां संपादकाने/प्रकाशकाने अमृतानुभवाच्या धर्तीवर ''आनंदानुभव'' हे शीर्षक तयार केले. आनंदानुभव ग्रंथाच्या दासराममहाराजकृत टीकेत ''आनंदानुभव

सनद । अनुभवानंद (२४१.९) आणि ''नाथांचा आनंदानुभव'' (२४१.११) असे शब्द येतात.

एकनाथमहाराजांच्या समारोपात अशी एक ओवी आहे :- ''ते या देहीच ब्रह्म होती । जे जपती बृहदारण्यकश्रृती । ते ओळखती या ग्रंथाते।।'' (२३४) या ओवीचा भावार्थ असा दिसतो की बृहदारण्यकश्रृती /उपनिषद् जाणणाऱ्याला हा ग्रंथ कळेल आणि तो ब्रह्मरूप होईल.

छांदोग्य उपनिषदात जीव ब्रह्म आहे हे सांगणारे ''तत्त्वमसि'' हे महावाक्य येते. त्याचा अर्थ ''(हे जीवा) तू ब्रह्म आहेस'' या महावाक्याचे शंकराचार्यांच्या केवलाद्‌वैत वेदांतात भागलक्षणेचा वापर करून जे स्पष्टीकरण दिले जाते, ते मात्र एकनाथ महाराजांनी प्रस्तुत ''आनंदानुभव'' ग्रंथात वापरलेले नाही. त्यांनी या तत्त्वमसि या वाक्याच्या अर्थाचे वेगळ्या पद्‌धतीने स्पष्टीकरण केलेले आहे.

एकनाथमहाराजांच्या जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य सांगणाऱ्या या आनंदानुभव ग्रंथाचे स्पष्टीकरण ओवी वृत्तात श्रीदासराममहाराजांनी सविस्तर आणि फार चांगल्याप्रकारे केले आहे आणि ते मुमुक्षु जनांना उपयोगी पडणारे आहे.

आनंदानुभव ग्रंथाच्या २४१ व्या अंतिम ओवीवर टीका करताना दासराम महाराजांनी काही गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. त्यांचा निर्देश येथे करणे आवश्यक आहे. :-

(१) ज्ञानेश्वरमहाराजांच्या अमृतानुभव या ग्रंथासारखा एकनाथ महाराजांचा हा आनंदानुभव ग्रंथ आहे. (श्री ज्ञानेशांचा अमृतानुभव । तैसाचि नाथांचा आनंदानुभव ।। २४१.११)

(२) आनंदानुभव ग्रंथावरील श्रीदासराममहाराजांची टीका संपल्यावर असे घडले :- चिमडच्या रामभाऊमहाराज यरगट्टीकर या श्रेष्ठ संतांचे चिरंजीव उद्‌धवराव या नावाचे होते. हे उद्‌धवराव अधिकारसंपन्न साक्षात्कारी होते. हे उद्‌धवरावजी दासराममहाराजांच्या स्वप्नात आले आणि त्यांनी दासराममहाराजांना आशीर्वाद दिला. (उध्दवराव यरगट्टीकर । स्वप्नी प्रगटोनी साचार । आशीर्वाद निर्भर । दिला सप्रेम दासरामी।। २४१.१३)

एकनाथमहाराजांच्या ''आनंदानुभव'' आणि त्यावरील दासराम महाराजांची आनंदानुभव विलास नावाची टीका हे साधक-मुमुक्षूंना अत्यंत उपयोगी पडणारे आहेत. हा ग्रंथ सौ. रोहिणी चंद्रशेखर केळकर ह्या प्रकाशित करीत आहेत. ही आनंदाची गोष्ट आहे. या गंथाच्या वाचनाने / श्रवणाने मी ''ब्रह्म आहे'' याची खात्री पटेल आणि गुरूची कृपा झाल्यास आनंदानुभव प्रत्ययास येईल.

**प्रा.डॉ.के.वा.आपटे**

श्रीएकनाथमहाराज प्रणीत

# आनंदानुभव

श्रीदासराममहाराजकृत श्रीआनंदविलास टीकेसह

**श्री गणेशाय नम: ।। श्री गुरूकृपासिंधु । स्वामी तु अनाथाचा बंधू ।**
**आता कृपा करूनि सांग स्वयंभू । म्हणोनि चरणी लागला ।।१।।**

कृ करणे पा पालन । ऐसिया कृपेची खूण । हे शिष्या करवी घडवी आपण । सामर्थ्येची ।।१।। ऐसिया कृपेचा सागर । सत्तारूप श्रेष्ठ थोर । जया आधीन चराचर । गुरुत्वमध्य ।।२।। आमुचे जे जीवन । तयाचे जेथ गुरुत्वाकर्षण । व्यवहार घडे येऊन । देहावरी ।।३।। जैसेचि निजसत्ते । जो जीवासी नेई उर्ध्वपंथे । चैतन्याची खेच जेथे । देहापरौती ।।४।। ऐसे जे गुरुत्व । जेणे प्रपंच परमार्थ भाव । दोनी होती सावेव । माध्यम त्याचे ।।५।। उभा आडवा छेद घेऊन । पाहता जीवन तपासून । सापडे ठिकाण । दम जेथे ।।६।। जया नाही नाथ । तयांचा तू नाथ । अनाथा करी सनाथ । बंधुभावे ।।७।। ऐसा जो तू श्रीगुरु । कर्णापरीस उदारू । सांग नवलावे थोरु । स्वयंभू काई ।।८।। म्हणोनि चरणी लागला । तो मस्तकी हात आला । स्वानुभव ओतिला । अंतर्यामी ।।९।।

**इतर शिष्य प्रश्न करिती । ब्रह्म कैसे म्हणोनि पुसती ।**
**तरी माझे पुसणे नव्हे आनंदमूर्ती । मी का तैसे पुसो ।।२।।**

जेथ नाही गुरुप्रकाश । गुरुची ओळख नाही ज्यास । व्यवहारी वरिले गुरुत्वास । ते इतर शिष्य ।।१।। जेथ प्रश्न आणि उत्तर । चाले जन्मवर । परी निरुत्तर । नोहेचि जेणे ।।२।। पुढे ओघ तो पूर्वपक्ष । जीवन चाले सापेक्ष । ठेच लागता अनुभव सौरस । उत्तर ते ।।३।। ऐसी अंधारी वाटचाल । ब्रह्म कय आकळे निखळ । जे पडे पाऊल । प्रकाशावीण ।।४।। जीवनाची चकमक । तेणे पाऊल मोजी एकेक । चाले अनेक । परी एकाविण ।।५।। ते एक कळे कैसे । म्हणोनि

श्रीगुरुसि पुसे । पुसो जाता ब्रह्म कैसे । कळे तया ।।६।। परी आपणचि पुसे । आणि गुरूसी पुसो जातसे । मगचि तेथ ठसे । ब्रह्मभाव ।।७।। मागे पुढे ब्रह्म दाटे । विचारी देव आहे कोठे । आत भाव न उतरे । प्रश्नची नुसधा ।।८।। तरी माझे पुसणे तैसे नव्हे । ते आपणचि पुसावे । आनंदमूर्ती व्हावे । आनंदोनी ।।९।। मी का तैसे पुसो । ते आपणचि जरी पुसो । जाय तरी पुसो । पुसणे मग ।।१०।।

**माझे पुसणे ऐसे असे । मज ब्रह्म होनि काय खोळंबले असे ।**
**मी हे कोण हे जाणत नसे । ते जाणवा आधी मज ।।३।।**

मी माझे हे पुसणे असे । जरी ब्रह्म होनि शरीर नसे । काय ते वीण खोळंबा असे । ऐसे वाटे ।।१।। यापरी मी कोण । याची काय मज जाण । नसेचि जाणपण । मग आनंद कैचा ।।२।। म्हणोनि ते जाणवा आधी । तरी आनंद समाधी ।चिदाकाश अवधी । जीवनसंधी ।।३।। जयाचे नाही ज्ञान । तेथ नोहे समाधान । जरी ते आपण । असोनही ।।४।। स्वयंपूर्ण स्वयंप्रकाश । जेथ ज्ञानाचा उल्हास। जीवनी प्रकर्ष । असो त्यांचा ।।५।। मी कोण हे जाणवा मज । तरीच गाठी पडे नीज। निजाचिये निजे तेज । फाको लागे ।।६।।

**तुम्ही ब्रह्म दावाल कृपेने । परी ते देखावे कवणे ।**
**मी देखावे तरी आपणाते नेणे । मी कोण म्हणोनी ।।४।।**

तुम्हीच एक ब्रह्म । तुम्हा नेणती आगमनिगम । ऐसे जाणता वर्म । अंतर दडपे ।।१।। मग तुम्ही आपुले कृपे । कराल हे सोपे । परी तुम्ही दाविल्या आपण पे । ते मी कैसे पहावे ।।२।। विश्वरूप दर्शन । करवी भगवान । परी तो अर्जुन । पाहो न शके ।।३। तैसेचि माझी अवस्था । जाली विचारे पाहता । यावरी निरुता। उपाय काय ।।४।। मग जरी काय उपाय । तरी तो होयेचि अपाय । मग हे कैचे पाय। अंतरले ।।५।। तरी आता सोय दावा । प्रगटोनि ब्रह्मभावा । जेथ मी आटावा । आनंदासी ।।६।। तुम्हीच ब्रह्म ते कृपेने । दावाल ही स्पष्टपणे । परी ते देखावे कवणे। सरल्या मी ।।७।। मी ते देखावे जरी म्हणे । तरी मग आपणासी काय जाणे। तुम्हा प्रती नेणे । ऐसे होय ।।८।। मी कोण गोमाजी कापशा । याचा मज न भरवसा। ते दावाजी सहसा । कृपेचिया ।।९।। म्हणोनि मी कोण । मीचे काय कारण ।



कारणाचे काय कोण । मुळारंभ कोणता ।।१०।।

**मी जीव किंवा शिव । उभयामाजी मी न जाणे सोय ।**
**म्हणोनि मज दावा निश्चय । जे मी कोण असे ।।५।।**

मी जीव का शिव । हेचि मज न पडे ठाव । म्हणोनि मज ना दृढभाव। काही केल्या ।।१।। जो मी कोणी असे । तो मी मज कोठे न दिसे । आणि मी मी नुसते ऐसे । म्हणतो की ।।२।। त्याचाची निश्चय नाही । मी तू म्हणता दृढ ठायी । मी हे स्फुरण जेथे होई । अदृश्य ते ।।३।। तो मी मग कोण असे । हे दावा जी अनुभव सौरसे । कळो यावे लक्ष्यांशे । वाच्यांशे न ।।४।। जो मी असे तो मी दिसे । आणि नाही काहीसे । व्हावे आता ऐसे । मज वाटे ।।५।। मी माझे भेटीसी आतुर । म्हणोन तव पायी आलो तर । कृपा करोनि मजवर । सोय दावा ।।६।। सोय दावा दोनीमाजी । जे मी न जाणे जी । होय माझा निश्चये सहजी । जे निश्चये ।।७।।

**म्हणोनि मजला आधी जाणवा । मज मी पडलिया ठावा ।**
**मीच देखणा जरी आघवा । मग ब्रह्म पुसणे काय असे ।।६।।**

सापडावे माझे मज । जे मी आहे तेथिचे गुज । जे वरी मीतूपणाचे व्याज। मुद्दलाचे ।।१।। जे व्याजी चाले व्यवहार । परमार्था पडला घोर । मुद्दलाचा होय विसर । केवळ आशा ।।२।। व्याज मिळावे तो घ्यावे । ना तरी आशेवरी जगावे। बाजारी जागावे । न घरी ।।३।। व्याज बट्टा देणे घेणे । यात गुंतोन पडणे । मग आता हरी जाणे । नफातोटा ।।४।। ना स्थैर्य शाश्वती । काहीच नव्हे निश्चिती । जी गावयाची क्षीती । वाटे मज ।।५।। मीच ठावा पडलीया । जरी दृश्य होय वाया। तरी श्रम शीण वाया । होतील रे ।।६।। अथवा मीच देखणा । का पुसो ब्रह्मखुणा। ब्रह्मचि अनुसंधाना । राहे तरी ।।७।। मग काय पुसणे असे । सहजची ब्रह्म ठसे । जरी मग का ब्रह्म पुसे । उरले काय ।।८।। याचा करावा उलगडा । मज करोनि उघडा । अनुभव द्यावा रोकडा । आनंदाचा ।।९।। जे का हे विचारे बोले । ते साधकासी कळे । नातरी नातळे । निगुरिया ।।१०।।

**पुसणे जरी मी कोण कोणाचा । कोठोनि आलो कोठे जायाचा ।**
**निश्चय बरवा सांगावा साचा । कृपा करुनि स्वामीनाथा ।।७।।**

पुसणे जरी मी कोण । कोणाचा हा घडे मौन । जेथ हे नुरती दोन । तेथ एक ।।१।। तो एकचि ठाव । तो सकळाचा ठाव । तेथुनि सर्व उद्‌भव । मग जाणे कोठे ।।२।। आम्ही आलो जेथुनि । आम्हा जाणे मग कोठुनि । येणे जाणे जेथुनी तेथुनि । आनंदचि ।।३।। मग बोलणे येणे जाणे । हे बोलणेचि होणे । येणे जाणे न होणे । दोन परी ।।४।। जेथुनि येणे तेथुनि जाणे । जेथुन जाणे तेथुनि येणे । जेथुनि तेथुनि एकपणे । येणे जाणे कैं ।।५।। येणे तेचि जाणे । जाणे तेचि येणे । छेद जाता उणे । येणे जाणे ।।६।। उणे जरी येणे जाणे । तरी कोण ही जाणे । व्यवहार केवीलवाणे । बोलण्याचा ।।७।। जरी येणे जाणे नाही । तरी आम्ही आमुचे ठायी । कोणाचा कोण नुरे तेही । ऐसा प्रश्न ।।८।। हा निश्चय बरवा । साचपणे सांगावा । कृपा करोनि आघवा । स्वामी नाथा ।।९।। तूचि आमुचा स्वामी । एक खरा नामी । जेथ उरे ना मी । उरे तो तू ।।१०।। मी नाही तेथे काय तू । मग काय म्हणावे तू तू । तयाविण जे होतू । ते आपण वंद्य असा ।।११।। ऐसी करोन प्रार्थना । लागला चरणा । तव गुरुराणा । प्रसन्न झाला ।।१२।।

**तव श्रीगुरु म्हणे भला भला । त्वां बरवा प्रश्न केला ।**
**ऐसा नाही कोणी भेटला । प्रश्न करणारा ।।८।।**

तो श्रीगुरु भला म्हणती । त्वा प्रश्न केला युक्ती । बरवा तयाची संगती । परब्रह्मी ।।१।। ऐसा प्रश्न कोणी न करिती । जेणे लाधे ब्रह्मस्थिती । कोणी जे कोण गती । ते कोण ।।२।। ते कोण उमगता । कळे मी कोण हे वार्ता । मग ब्रह्म स्वरूपता । सहजेची ।।३।। ताठर मीपण नको । मग जे असो ते असो । तेचि तो आलासि पुसो । पुसावया ।।४।। ब्रह्म कोण हे विचारती । परी मी कोण हे न पुसती । येथचि तुझी परमार्थ श्रीमंती । उजाळली ।।५।। जरी कळे मी कोण । तेचि ते ब्रह्मज्ञान । जरी मी तू पण । मायाभ्रम ।।६।।

**ब्रह्म काय ऐसा प्रश्न करिती । नाना मते धुंडाळिती ।**
**परी मी कोण असे न पुसती । आपुला शोध ।।९।।**



आपुला शोध । तोचि असे ब्रह्मबोध । परी यासी ब्रह्मविद । पाहिजे की ।।१।। ब्रह्म काय हे विचारती । परी काय म्हणता बुडाली स्थिती । मग ते काय गती । ज्ञान कैचे ।।२।। काय आणि ब्रह्म । येथ जीवन संभ्रम । तेथ उठला तो भ्रम । तैसा प्रश्न ।।३।। काय हे जो न विचारी । तोचि तो खरा विचारी । मग तो न विचारी । काय म्हणोनि ।।४।। काय म्हणोनि विचारी । तो जहाला अविचारी । मग काय सुटे हे विचारी । विचारोनी ।।५।। अविचार तो नाही विचार । विचार नव्हे तो ना आचार । आचार ना तो उच्चार । कायचि करी ।।६।। जैसा होय उच्चार । तैसा साक्षात्कार । हा मंत्र चमत्कार । आहेच की ।।७।। मग नाना मते धुंडाळी । नाना दृश्य कवळी । अदृश्य आकळी । कैचे तया ।।८।। नाना वृत्तीने वेटाळी । नाना परी तळमळी । नसे ते आकळी । काय सांगो ।।९।। मी कोण असे न पुसती । मीपणाची तेथे भ्रांती । जे पुसती ते शोधिती । जे का असे ।।१०।। मी कोण जो पुसे। तोचि तो असे । असे तो न दिसे । नसोनिया ।।११।। परी जो नसे । तो दावी आहेसे । ऐसे हे कायसे । वर्म आहे ।।१२।।

**एरव्ही तरी जाण बोलतो बोलणे । आपशुद्धी नेणे तो परशुद्धी काय जाणे ।**
**जे आत्मशुद्धी नेणून ब्रह्म पुसणे । ते पुसणे न घडेचि ।।१०।।**

एरव्ही तरी बोलणे । तेथ काय असे करणे । काय करणे आणि बोलणे । एकमेळ ।।१।। बोलेल ते करील काय । गर्जेल तो पडेल काय । या म्हणीचा विचार काय । पहावा जी ।।२।। जेथे मी नुठी । तेथे तु कैचा उठी । मी तू विण गोठी । ते ब्रह्मजाल ।।३।। तेचि ते ब्रह्मजाल । ते नव्हे ते मायाजाळ । जैसे का इंद्रजाल । आकाशीचे ।।४।। बोल बोलता सरे कृती । कृती होता बोल नुरती । आत्मशुद्धीचिये प्रचीती । आगळीच ।।५।। आत्मशुद्धी जो नेणे । तो परशुद्धी काय जाणे । आपण या जगा ओळखणे । आपणावरुनी ।।६।। स्वतासी बोचला काटा । तो कळले ही काय चेष्टा । परी तोवर होता वाटा । गमतीचा ।।७।। दुसऱ्यासी काटा बोचला । तो गंम्मत वाटे याला । परी तो यासची जैं बोचला । तेंव्हा कळले ।।८।। आत्मशुद्धी नेणे । तै होणे ब्रह्म पुसणे । जै आत्मशुद्धी मी कोण पुसणे । तै ब्रह्म होय ।।९।। नेणपणे जे पुसणे । ते होय न पुसणे । परी जाणपणे पुसणे । ते पुसणे उपेगी ।।१०।।

**म्हणोनि तुवा बरवा पुसिला प्रश्न । जे मी कोण म्हणोन ।**
**तरी स्वये चैतन्यघन । असता परी जीवित्व भोगिसी ।।११।।**

प्रश्न तेथे उत्तर । जे करी निरुत्तर । ना तरी प्रत्युत्तर । आहेच की ।।१।। हा प्रश्न जो करी कोण । तोचि तू आपण । मी कोण हे म्हणे कोण । जाणिजे ते ।।२।। म्हणोनि तुवा । आहेसी बरवा । जे ठायी प्रश्न पुसावा । उत्तर ते ।।३।। तुवा जो पुसिला प्रश्न । तेथ उरले प्रश्नचिन्ह । नुसतेचि आपण । प्रश्नापुरते ।।४।। येथ उत्तरचि झाले प्रश्न । प्रश्नचि दावी उत्तर आपण । हे कोठे आढळे का पण । पहा जरा ।।५।। मी कोण म्हणे कोण । हा प्रश्न आला कोठून । जो तू पुसतासि चिद्घन । उरले तेथ ।।६।। प्रश्नाचे स्फुरण । ते जे ठिकाण । स्वयंपूर्ण । चैतन्यची ।।७।।स्फुरद्रूप जे स्फुरण । तयाचे विस्मरण । पुरोगामी जीवन । ते जीवदशा ।।८।। स्फुरणासी दुर्लक्षी । म्हणोनि हे अवस्था तुजसी । तै अलक्ष्य तेधवा लक्ष्यी । देह दृश्य ।।९।। आत राहिले स्फुरण । वरी उठले भ्रमण । तयावरी प्रश्न चिन्ह । पुसोनि जाय ।।१०।।

**भावना जे भाविजे । ज्या भावने असिजे ।**
**त्याच भावने देह पडिजे । तरी तेचि होई देहांती ।।१२।।**

स्फुरणावरी जे उठले भ्रमण । तेथ पावले जीवन । ते फिरो लागले आपण । तेणे दृश्य ।।१।। तेणेचि हे उपाधि । व्यष्टी समष्टी भावसिध्दी । दृश्ये द्रष्टा दर्शन संधी । सहजेची ।।२।। जेवी होय भ्रमणा । तेवी घडे भावना । भावने परी प्राक्तना । भोग जाला ।।३।। मग ते प्रारब्ध । जाले सिद्ध । न चुके अगाध । थोर थोरा ।।४।। जैसी धरावी भावना । तैसे त्याचे फळ जाणा । आमुचे मामा सांगती खुणा । आपुले अभंगी ।।५।। भावना म्हणजे दुखणे । ते होय अभावपणे । जयाचा अभाव ते गुणे । भाव नाही ।।६।। जयाचा जेथ अभाव । जेथ धरणे लागे भाव । परी तो सहज स्वभाव । तेथ धरणे कैचे ।।७।। जरी का शरीरी कमी साखर । तरी ती व्यथिता आवडे फार । रक्तदाब वाढला जर । मीठ रुचे ।।८।। आत्मा असे तो असे । परी तेथ आपुला भाव कोठे वसे । तेचि दुखणे कायसे । जीवा भुलवी ।।९।। तो भाव ना । म्हणोनि उठली भावना । मग तेचि जाली भावना । दुःखिताची ।।१०।। जे रीती दुखणे आले। तेचि रीती पाहिजे गेले । भावना उडवी भावनाबळे



।।११।। विषाने विष मरे । पैकीच हे बरे । पाहता दिसे खरे । विचारेचि ।।१२।। तरी जै भावना भाविजे । आणि तेथ मग असणे सहजे । देह पडे तरी दुजे । कैसे होय ।।१३।।

**जरी जीवित्वेचि जीव देह पडे । तेचि देहांती येणे घडे ।**
**ब्रह्म भावने देह पडे । तरी ब्रह्मची होणे ठाके ।।१३।।**

जीवपणाचेनि योगे । जीव देह पडे प्रसंगे । तेचि देहाचे अंती वेगे । येणे पुनः ।।१।। जीवपणा का तो जीव । जीव का होय जीवित्व । याचेचि औचित्यपूर्ण महत्त्व । जाणिजे पा ।।२।। साखर म्हणजे का गोडी । गोडी का साखर का रोकडी । घेवोनिया थोडी । पहावी की ।।३।। साखरेत गोडी असे । गोडीविण साखर नसे । ऐसे हे दोनी नसे । येरयेराविण ।।४।। जीव आणि जीवपणा । एकमेकांना पूरकपणा । कुंभकेसी होता उणा । निकुंभची ।।५।। मग तो सहजे मुक्त । हे नातरी आहेचि जीवित । ऐसी ही मात । पाहाता आहे ।।६।। नासिकेचे सूत । तेथ जीवपण व्यक्त । तेणेचि ओळखत । जीव हा ।।७।। अपूर्णता येई खाली । पूर्णता नेई निराळी । परी पूर्णता भली । दोनी पैल ।।८।।

**यद्भावना तद्भविष्यति । ऐसे श्रुतिस्मृति बोलति ।**
**अंतकाळी भावना उरे तेचि होती । यदर्थी गीता प्रमाण ।।१४।।**

जैसी भावना तैसे होणार । हे तो श्रुतिस्मृतिंचे सार । अंतकाळी जो विचार । तेचि होय हे सांगे गीता ।।१।। अंती जे का मती । तैसीच होय गती । जैसे कर्म तैसी मती । ऐसे असे ।।२।। मती जरी कर्मापरी । तरी मग मोक्ष कवणे परी । ऐसी विचारांची परी । पाहिजे की ।।३।। कर्माची न पडे गुंती । ऐसीच विचारांची संगती । कर्मापासोनि सुटे वृत्ती । तो कर्म न बाधक ।।४।। कर्माची नाही आसक्ती । मग तेथ नाही अधोगती । तेथ भावना केवी अंती । अन्य होय ।।५।। जे वासनेचे संगे । जीव जन्मा येणे लागे । जे हरीच झाली अंगे । मग जन्म कैचा ।।६।। श्री एकनाथ अभंगी । हेचि बोधिती प्रसंगी । जे का अनुभवे आले अंगी । तयांचिया ।।७।। जेथे ज्याचा जीव जडे । तेथेचि त्याचा देह पडे । जैसा पडे तैसा घडे । येणे जाणे ।।८।। अंती जै भगवद्वृत्ती । ते तो भगवंतचि होती । परी दृश्य

देही आसक्त होती । पुन: येती त्या काजा ।।९।।

अंतकालेच मामेव । इति स्मृते: ।

**अंतकाळी एकवटूनि अंत:करण । जो देह टाकी माझे धरोनि स्मरण ।**
**तो मद्भावे होय मीच आपण । यदर्थी संशयो नाही ।।१५।।**

जीवनाचे मोजमाप । कशावरी चाले अपाप ।आणि कोण योगे काप । कळिकाळा ।।१।। काळ करी साची । गणना रे आयुष्याची । परी कथेकाळी वय वेची । ते न गणे ।।२।। तरी हे जीवित । कैचे होय उदित । आणि तयाचा अस्त । कोठे असे ।।३।। हे पाहणे लागे । वेगे तरी उगे । कळो येई प्रसंगे । अभ्यासूसी ।।४।। श्वास आणि उच्छ्वास । हे कळि काळाचे ग्रास । परी यांचाही प्रवेश । जेथ नाही ।।५।। ऐसा जो संधीकाल । तो जीवनाचा अंतकाळ । जयाचा हा मेळ । अनंतत्वी ।।६।। जो असे कुंभक । जेथ साधकासी धमक । काळासी धाक । पडे जेथे ।।७।। दिक्काल आकाशातीत । जे का सदा असत । तेथ तयाचे चित्त । जन्मवरी ।।८।। ऐसा सदा अंतकाल । जाणोनि साधी नाम वेळ । तया अमृतचि फळ । आनंदाचे ।।९।। देह राहीला बाजूसी । हा सदा राखे स्मरणासी । तो महाप्रलय देहासी । ते तेच स्थिती ।।१०।। मग तेथ जे स्मरण । ते तोचि होय आपण । गीती प्रबोधी भगवान । संशय नाही ।।११।।

**ज्या भावने देह टाकी । अंती तेचि होणे न चुके की ।**
**ब्रह्म भावने देह टाकी । तरी सुखे ब्रह्मची होणे ।।१६।।**

ज्याचे जया ध्यान । तेचि त्याचे होय मन । ऐसा सिध्दांत गहन । जाणावा की ।।१।। म्हणवोनि अवघे सारा । पांडुरंग दृढ धरा । श्री तुकाराम अंतरा । बोधिताती ।।२।। कैचा असे हा अभंग । जया लागी नाही भंग । तेथेचिया दंग । व्हावे वाटे ।।३।। देहभावनाचि सुटली । तो देहासक्ती संपली । ब्रह्मभावना उरली । हरिनामे ।।४।। एक उरे एक सरे । दृश्य ते सहज ओसरे । अंतरी पूर्ण पसरे । आनंद तो ।।५।। मग आनंदावाचून । कोण राहिले आपण । हे पाहता आपण । दिसेच की ।।६।। ब्रह्मभावने देह टाकी । तरी ब्रह्म वस्तू होय निकी । देहभावनाचि शेखी । तरी जन्म तैसा ।।७।।



**देही ज्या भावने भाविजे । देहांती तेच होईजे ।**
**जड भरत काई होईजे । मृग ध्यासे मृगचि ।।१७।।**

जो जयाचा स्थायी भाव । तोचि त्याचा होय स्वभाव । स्वभावेचि भावाभाव । कळो येती ।।१।। म्हणोनि हा श्रेष्ठ भाव । थोर त्याचा नवलाव । भावापरीच देव । नटला आहे ।।२।। म्हणोनि जो अयोनिसंभव । विचारे पाहता असंभव । तयाचा व्हावया संभव । हा उपाय ।।३।। जो व्हावा वाटे संभव । तैचा पाहिजे उपाव । ना तरी अपाव । निरुपाये ।।४।। उपाये होय उपाय । उपायाविण अपाय । काही ध्येय काही उपाय । आहेच की ।।५।। देही जी भावना उत्कट । त्याची प्राप्ती अवचट । देहांतीही स्पष्ट । तेचि होय ।।६।। जो जडत्वेचि भरत । ऐसा जो जड भरत । ते का होय मात । चैतन्याची ।।७।। जडत्वाने भरलेला । तोचि स्थायीभाव झाला । अंती आशेने गुंतला । मृगावरी ।।८।। तो का आधिच असता सुटला । मग तो शेखी नसता गुंतला । परी जो अधिक गुंतला । शेखी तरी काय व्हावे ।।९।। आशा ही सुटता सुटेना । देव भेटता भेटेना । परी हे कोण मना । आणि सांगा ।।१०।। जडभरत हा भला । परी मृग ध्यासे मृगचि झाला । एथचि सिद्धांत झाला । अध्यात्माचा ।।११।।

**तेवी जीव भावने भावीत होय । जीव सांडिता जीवचि होय ।**
**जो देह सांडी ब्रह्म भावनीय । तो ब्रह्मचि होय पार्था ।।१८।।**

तेवी जड जडोपाधी । तेथ जो भरला अवधी । तो जडभरत जीवोपाधी । स्पष्टचि की ।।१।। मृग तोचि जीवभाव । रात्री राजा दिवसा वाव । भिकारी होवोनिया पस्ताव । करीतसे ।।२।। या बोलण्याचा भावार्थ । जाणोनि घ्यावा यथार्थ । तरीच हा गुह्यार्थ । कळो येई ।।३।। जीव भावने भाविला । तेथेचि जीवभावे जीव टाकिला । मग तो कैसा मोकळा । शिव होय ।।४।। तो तरी जीवची होय । ज्ञानाची नेणुनि सोय । यासी एकचि उपाय । ब्रह्मभावाचा ।।५।। जे ब्रह्म भावनीय । तो ब्रह्मभाव तरणोपाय । देह सांडे ऐसी सोय । हरी बोले पार्थासी ।।६।। येथ जीव तो अर्जुन । सदा राही अर्जवुन । जयाचे सरल जीवन । श्रीकृष्ण भेटी ।।७।। म्हणोनि श्रीकृष्ण । तया भेटला नारायण । तो प्रबोधी परीपूर्ण । आत्मत्वेची ।।८।।

**ऐसे गीतेमाजी बोलिले श्रीहरी । यांसि संशय न धरी ।**
**जो ध्यास असेल अंतरी । ते होणे न चुके अंती ।।१९।।**

ज्यात गीत आहे ते गीता । ग्रथित ते गाथा । कथित ते कथा । जाणोन घेई ।।१।। निसर्ग निर्मित गीत । जे स्वयंपूर्ण असे सतत । सहजेचि उमटत । स्वयंसिध्द ।।२।। ऐसी जी जीवनगीता । जेणे संजीवन येई हाता । जगज्जीवन बोधी वक्ता । जीवार्जुना ।।३।। जो ध्यास असे अंतरी । ते न चुके जन्मांतरी । म्हणोनि प्राप्ती ध्यासापरी । होत असे ।।४।। येथ धरी जो संशय । तो बुडणार निःसंशय । परी हरिवचनी जो निःसंशय । तोचि तरला ।।५।। संशयात्मा विनश्यति । ऐसीच आहे भगवदुक्ति । म्हणोन निःसंदेह प्रचिती । संतांचिये ।।६।। संदेह अवघा फिटला । तो अध्यात्माचा उदय झाला । बोलती स्वानुभवे बोला । श्रीजनाबाई ।।७।।

**म्हणोनि मी सोहंब्रह्म । हेचि माने सनेम ।**
**अखंड भावने मी भावी पुरुषोत्तम । क्षराक्षराचा साक्षी जो ।।२०।।**

आहे नाही हे दोनीहि नोहे । तेथ जे का आहे । ते पाहिले प्रत्यये । संतजनी ।।१।। जयांचे डोळे आले । तयाहि जे न दिसले । मग जयांचे डोळे गेले । त्यांचे काय ।।२।। जे मुळीच आंधळे । तयासि का ते आतळे । जया काहीच नातळे । देहाविण ।।३।। जे का समकाले आले । संधीवेळे दर्शन झाले । जेथ जीवनाचे सरले । उदयास्त ।।४।। जे आले विषमकाले । ते दृश्य देखती डोळे । विषमत्व जै वितळे । तै साम्यस्थिती ।।५।। जैं जीवनी साम्यस्थिती । तै समता होय चित्ती । समभावे सम प्रचिती । दृश्य नुरे ।।६।। दृश्य नुरे तो द्रष्टा उरे । साक्षित्वचि जेथ पुरे । पहाणेही सरे । आपणपातु ।।७।। तेथ जो सोहंभाव । तो जयाचा होय स्वभाव । इंद्रिया वळण ते सावेव । नेमाचेनि ।।८।। पुरुषामध्ये जो उत्तम । तोचि तो पुरुषोत्तम । जया जीवाचा तो नेम । होऊनी ठेला ।।९।। जरी प्राणासवे गाठी । तरीच नेमाचिया गोष्टी । हे भावना उठाउठी । ज्या जीवाची ।।१०।। जो क्षराक्षराचा साक्षी । जीव सदा निरिक्षी । जयाचा भाव अलक्षी । खिळोनि ठेला ।।११।।

**मी सोहं ब्रह्म निःशेष । हाचि अखंड जयासी ध्यास ।**
**तेणे ध्यासे देह सांडी सावकाश । तरी परब्रह्मची होय ।।२१।।**



गुण निर्गुण आटले । सोहं रुप ते मिळाले । हे वृत्ती जेथ उजळे । अखंडित ।।१।। तेथेचि स्फुरतसे मी । म्हणोनिया तेचि मी । जेथ उरेचिना मी । नामी ते ।।२।। जे स्वरूप अखंड । जया लागी नाही खंड । म्हणोनि तोचि उदंड । ध्यास झाला ।।३।। जयासि जो हव्यास । तयासी त्याचा ध्यास । देहभाव सावकाश । ओसरे त्याचा ।।४।। सकाराचा अवकाश । तेथ देहभावाचा नाश । होतसे अनायास । आत्मत्वेसी ।।५।। तो परब्रह्म वस्तूचि होय । तेथ उरे ना हे काय । तोचि एक उरला ठाय । अधिष्ठानाचा ।।६।।

**नातरी मी जीव हा ध्यास । अखंड असे जयास ।**
**त्याचि ध्यासे अंती सोडी देहास । तरी जीवचि होई पुनः ।।२२।।**

परी जीवपणाचा अध्यास । होवोनि जया अखंड ध्यास । तया ध्यासे देह दृश्य । आकर्षण ।।१।। जयाचे आकर्षण । तेचि ते प्राणोत्क्रमण । अंगी खिळे देहपण । देहाकार ।।२।। उठे देहाचा अहंकार । तेणे देहाशी तदाकार । पूर्णत्वे विसर । सोहंरूपाचा ।।३।। सोहंरूपाचा टाहो । तेथ अहंतेचा ना हो । होय परमात्म्याचा लाहो । सदोदित ।।४।। परी तेविण हे गोठी । जीवपणे मी उठी । तेथ जाहली त्रिपुटी । कर्मकांड ।।५।। देहकर्मे कर्मे देह । देहापासुनि उपजे देह । मग तो कैसेनि अदेह । विदेहता ।।६।। मग जैं जीवी देह । तयाचा पुनः देहीच जीव । नाना देहांचा अनुभव । घेत जाय ।।७।।

**म्हणोनि ब्रह्मभावने अखंड असिजे । जीवभाव तो सांडिजे ।**
**ब्रह्मभावने देह सांडिजे । तरी ते होय ।।२३।।**

ब्रह्मभाव तो स्थायीभाव । तयाचा थोर प्रभाव । पहाता नवलाव । कळो येई ।।१।। ब्रह्मभाव अखंड असे । असणेपणेचि सौरसे । जीवभाव तै समरसे । तरी तेचि ।।२।। परी जे अखंड नसे । आणि क्षणैक आकारलेसे । तयाचे ज्या पिसे । तै देह होय ।।३।। हे विसरल्या ब्रह्मभावना । जेथ उपाधी नुरे जीवना । देह सांडे आपणा । सुटता देहापासुनि ।।४।। मग जैं जगा परौते । तेचि होई आपण ते । जीव ब्रह्मरूप निरुते । जीवित्वापैल ।।५।। रामकृष्णवाचा । जो भाव असे जीवाचा । ग्रासोनि चत्वार वाचा । हरिवाचे हरि स्फुरे ।।६।। जरी हरिवाचे हरी । स्फुरे

स्फुरद्रूप तरी । एकचि उरे हरि । सकळ हरूनि ।।७।।

**ज्या भावने देह पडे । तेचि अंती होणे घडे ।**
**जडभरतासि मृग ध्यासे रोकडे । मृगचि होणे घडले ।।२४।।**

जयाचा जो ध्यास । तेचि प्राप्त होय तयास । हा सिद्धांत विश्वास । ठेवुनि पहावा ।।१।। अंती जे होय मती । तेचि तया होय गती । म्हणोनि जीवनाचे जे अंती । तेचि चित्ती पाहिजे ।।२।। जीवनाचा जेथ अंत । तेथ जो असे अनंत । तोचि ज्या चित्तात । तो जीवन्मुक्त ।।३।। परी देह दृश्य । हा ज्याचा ध्यास । अंतीही त्या चित्तास । काय असे ।।४।। म्हणोनि तो तेचि होई । जरी देह सांडे काही । जडभरतापरी होई । त्याची स्थिती ।।५।। जडभरत मृग जाहला । का तयासी शेखी मृगचि दिसला । येणे उमग होय जीवाला । उमगता रे ।।६।।

**म्हणोनि सोहंब्रह्म । हे जाणोनि गुरुमुखे वर्म ।**
**तेणे ध्यासे देह पडे सनेम । तरी ब्रह्म होवोनि ठाके ।।२५।।**

पहाताचि शुका ऐसे । जे मुक्त झाले निज ध्यासे । येथचि वर्म गवसे । मुक्तीचे की ।।१।। म्हणोनिया सोहंब्रह्म । जेथ नुरेचि जीवन संभ्रम । तरी आठवोचि ब्रह्म । भवभ्रम नाठव ।।२।। भव म्हणजे झालेले । त्यातचि जे फिरले । फिरफिरोनी भ्रमले । आठव कैचा ।।३।। परी तेथ न गुंतता । जया जीवनी साम्यता । तेणे योगे समता चित्ता । बाणली चित्ती ।।४।। ऐसे समत्व चित्ताचे । जे सारचि असे योगाचे । तेथ काय वियोगाचे । काम काय ।।५।। हाचि जयाचा नेम । तो जाहला सनेम । का तेथ ब्रह्मनाम । ठसावले ।।६।। असे ते जरी ठसे । नसे ते नुरतसे । जरी का नुसते दिसे । दिसणेपणे ।।७।। मग तो ब्रह्मचि होय । मग विचारसी काय । प्रश्नचि पुसता काय । तो उत्तर तेचि ।।८।।

**नाना विद्या साधिली सिद्धी। अंतकाळी स्वरूपी न बैसे बुद्धी।**
**तरी व्यर्थची त्याची सिद्धी । जे जे केली ।।२६।।**

नाना विद्या साधिली । परी ते विद्या उपेगा न आली । अनेकत्वे व्यर्थ गेली । एकेविण ।।१।। आम्ही आकळो एक । म्हणोन पाऊल ठेले चोख । परी ते आम्हा अनेक । दिसो आले ।।२।। एकावीण तो नाही सुख । मग ते सिद्धीचा काय हरिख । जे जन्मवरी नातळले देख । ते अशेख मग कैचे ।।३।। स्वरूपी न रमे जो संधी । तया का सापडे शेखी आवधी । जरी नव्हे स्थिर बुद्धी । सिद्धी कैची ।।४।। स्वरूपाकर्षण बुद्धीसि नाही । बाह्यकर्षणे दंग राही । ते स्वरूपी नच येई । तो बसे कैसी ।।५।। जे ठायी न होय बैठक । तव दिव्यज्ञान नोहे नि:शंक । ज्ञान झालिया क्षण एक । फिरणे नुरे ।।६।।



तस्मात् सर्वेषु कालेषु ।

**जगज्जीवन म्हणे अर्जुनासी । सर्व काली घ्यावे अहर्निशी ।**
**नाना रूपे जरी देखसी । मीच मानी ।।२७।।**

जगाचा जो जीवन । जगत्रयाचे जेणे जनन । जनने जग नामाभिधान । जाले असे ।।१।। जन्मणे जगणे मरणे । मिळोण हे जग होणे । ऐसे जे नोहेपणे । जीवन ते ।।२।। हे जग जेणे । जया नाही जिणे निमणे । तो जगज्जीवन श्रीकृष्ण म्हणे । अर्जुनासी ।।३।। जो करी सकळांचे आकर्षण । म्हणोनिया तो श्रीकृष्ण । जो अखंड स्थायिभावे पूर्ण । सर्व काली सर्वही ।।४।। तो म्हणे सर्व काली । आयुष्याचे वाटचाली । दिननिशि गती जाणुनि भली । घ्यावे बापा ।।५।। ऐसे जरी घडे ध्यान । तेचि सहज होय मन । जैसे भान तैसे ज्ञान । समाधाने ।।६।। नाना रूपे देखसी । ती नाना म्हणजे नव्हति ऐसी । मानोनि मज देखसी । सर्वां ठायी ।।७।। हेचि येथे वर्म । जेणे नुरे संभ्रम । केशवराजे सिद्धी परम । अद्वयत्वे ।।८।।

**कानी जे जे ऐकसी । ते ते मानी निश्चयेसी ।**
**मनी जे जे भाविसी । अभेदभावाने ।।२८।।**

कानी जे जे होय श्रवण । ते घडे नादानुसंधान । तेचि जरी संधान । निश्चयाने ।।१।। तेचि होय सुफळ । निश्चयाचे जे बळ । मनी भाव पूर्ण केवळ । अभेदत्वे ।।२।। जेथ नाही भेद । म्हणोनि तो अभेद । अभेदा कारणे भेद । तो भेद नव्हे ।।३।। हे जरी मानवले । तेणे सर्वकाही साधिले । जेणे साधिले तया काहि उरले । का साधायाचे ।।४।।

**मन बुद्धि हाचि ध्यास । अखंड माझेच सावकाश ।**
**माझ्या नाम ध्यासे सांडी देहपाश । तरी मीच होय ।।२९।।**

पाहता एक निजध्यासे । मुक्त झाले शुका ऐसे । जरी हे मनबुद्धिसी पिसे । असेचि की ।।१।। सकारामध्ये अवकाश । तेचि ते सावकाश । जाणोनिया सावकाश । स्थिर ते रमे ।।२।। ऐसा होता अखंड ध्यास । मग खंड नोहेचि त्यास । देहबुद्धीसी अवकाश । नोहेचि जेथे ।।३।। ऐसा माझीये नामाचा ध्यास । जेणे सांडी देहपाश । देहभावोचि ओस । होवोनिया ।।४।। ऐसे परी पाही । देहभावो जेथ नाही । आत्मभाव तेथ राही । होवुनि मीची ।।५।।

**ऐसे श्रीकृष्ण सांगे अर्जुनासी । ज्या ध्यासे सांडिसी देहासी ।**
**तेचि होणे निश्चयेसी । न चुके सर्वथा ।।३०।।**

श्रीकृष्णाचे ऐसे । अर्जुनासी सांगणे असे । देहभाव सांडी जे ध्यासे । तेचि ते होणे ।।१।। तेचि होआवया लागी । निश्चय धरी वेगी । वेग जाणोनिया उगी । उगेपणे ।।२।। मग तया अध्यासे ध्यास । ध्यासे साध्य ज्याचे त्यास । जे असे द्वैतनिरास । स्वयंरूप ।।३।। मग तो तेचि होय । ऐसा येथिचा निश्चय । यात चूक नच होय । अचूक ते ।।४।। जे आहेचि अचूक । साधिता ते बिनचूक । ते गिवसेचि अचूक । नेमक नेमे ।।५।। नेमक जरी नेमी आला । आणि नेम साधी साधुनि नेमाला । तरी हा लाभ तयाला । नेमकाची ।।६।।

**म्हणोनि ब्रह्मध्यासे जे देह सांडिती । ते देहांते ब्रह्मचि होती ।**
**ऐसी निजभक्ताची गती । अंती ब्रह्म होती ब्रह्मध्यासे ।।३१।।**

अखंड सहज ब्रह्मध्यास । तेथ जो होय अध्यास । तेणे देहभान भास । दृश्यात्मक ।।१।। म्हणोन जीवा जै उघडे । उघडपणे ब्रह्मध्यास घडे । जे का उपाधीमाजी दडे । निरुपाधिक ।।२।। ध्यासे लक्षिता निरुपाधी । सहजावस्थेने जाय उपाधी । उपाधी जाताचि जे अवधी । ते निरुपाधी लक्ष्य होय ।।३।। निरुपाधीची अवधी । तेथ जडता बुद्धी । सहजे सहज समाधी । लक्ष्य अलक्ष्य लक्षीतसे ।।४।। अलक्षेचि अलक्ष लक्षी । जरी लक्षी हा होय अलक्षी । एक अक्ष उरला पक्षी । अंतर्मुख ।।५।। जेथ हा देह सांडे । तेथ ब्रह्मचि एक उघडे । अनंत



विश्व घडे विघडे । देहादि दृश्य ।।६।। देह दृश्य घडे विघडे । का ते क्षणक्षणा पालटे विघडे । घडणे न घडे वीण दुथडे । सर्व ब्रह्म ।।७।। देह होत जात । तयाचा जेथ अंत । तेचि ब्रह्म ते निभ्रांत । निभ्रांत होती ।।८।। भ्रमण नाही ते निभ्रांत । भ्रांती जाऊनी होती निभ्रांत । ते ब्रह्मचि पावत । स्वस्वरुप ।।९।। अखिल विश्वाची गती । ते एक ब्रह्मस्थिती । जेथ प्रवाहीपणे उठती । देह दृश्य ।।१०।। ते ओसरोन जाती । हे निजभक्त जे जाणती । जाणोनि निज गुजस्थिती । पावती ऐक्य ।।११।। म्हणोनि ते अंती । ब्रह्मध्यासे ब्रह्म होती । अंत होताचि अनंती । विरती स्वये ।।१२।। जेथ देह दृश्याचा अंत । तोचि अंतकाल जे देही जाणत । ते देह पडलियावरी होत । ब्रह्मरूप ।।१३।।

**येथे आणिक एक गुह्य असे । ते सांगो नये कोणास ।**
**कोप येईल सनकादिकास । म्हणोनि गुह्य ठाकिजे ।।३२।।**

प्रगट असोनि जे गुह्य । गुह्य तरी प्रगट होय । श्रीज्ञानराजे सोय । दाविली जे ।।१।। जे बोलताचि नये । म्हणोनि ते बोलोच नये । जरी कोणी बोलो जाये । कोप होय सनकादिका ।।२।। ते गुह्यचि येथ ठाकिजे । ते जाणोनि गुह्यचि होईजे । गुह्यपणेचि असिजे । गुह्य स्वरूप ।।३।।

**परी त्यांचा कोप साहिजेल । परोपकारार्थ सांगिजेल ।**
**अन्याय झाला म्हणोनि होइजेल । शरणागत ।।३३।।**

सनकादिकांचा कोप । जेणे कळिकळा सुटे काप । परी तोहि साहू अपाप। या गुह्यासी ।।१।। परोपकार बुद्धी उत्कट । म्हणोनि गुह्य करु प्रगट । प्रगटलियाहि जे अप्रगट । कळेना ज्या ।।२।। तयासी नाइलाज । परी जे ध्यानी घेती त्या इलाज । करोनि ठेवू सहज । सांगो जाता ।।३।। मग तो जरी अन्याय । झाला तरी धरु पाय । शरणागत म्हणोनि होय । शरणची ।।४।।

**सद्गुरू जरी लाहे । तरी आताचि ब्रह्म होये ।**
**तया देहांति ब्रह्म होवो काय । उरले असे ।।३४।।**

सद्रूपा दाविती गुरू । म्हणोनि ते सद्गुरू । देही देहातीत थोरु । लाभती जर ।।१।। सद्गुरूंची होता प्राप्ती । तरी पावे ब्रह्मस्थिती । आताचि ये देही

निश्चिती । देहा सुटुनि ।।२।। देहासि सुटले जे चैतन्य । तेचि ते करिती आपण । तया देहांती प्रमाण । काय उरे ।।३।। देही असताच देहा सुटला । तो देह टाकता कोण झाला । आधीच ब्रह्मी मिळाला । तो मागुता कैसा ।।४।। ब्रह्म होणे देहांती । ऐसी नाही तयाची स्थिती । जीवनप्रवाहानंद युक्ती । गतीचि सरले ।।५।।

**जो देह असताचि ब्रह्म झाला । तो देहांती स्मरेल कवणाला ।**
**जया स्मरावे तोचि होवोनि गेला । निश्चयेसी ।।३५।।**

ऐसा जो कृत निश्चय । तयासि ज्ञानाचा निश्चय । निश्चित लाधली सोय । चिंतनेचि ।।१।। जेथ उरेल चिंतन । म्हणोन तेथे चिंता न । ब्रह्म जाहला सुटोन । देहादेही ।।२।। चिंता न करी असोनि देही । चिंतने देहीच विदेही । देह त्यजिता काय राही । चिंतनावीण ।।३।। जयाचे करावे चिंतन । तोचि तो जाहला आपण । एक चिंतन साधून । अहर्निश ।।४।।

**देह पडलिया स्वरूपी मिळाला । तरी संत हासति या बोला ।**
**आधी काय वियोग झाला होता त्याला । मग मिळाला म्हणिजे अंती ।।३६।।**

देह टाकता ब्रह्मी मिळाला । तरी देही कोण होता तो पहिला । कोणी अज्ञान बोले बोला । तरी हासती संत ।।१।। आधी जरी असे वियोग । तरी सार्थ होईल योग । का तैसा आलाचि योगायोग । जुळोनिया ।।२।। परी जया अखंड योग । जेथ देहा कर्माचा न घडे भोग । देही असोनि कर्मत्याग । तया योग कैचा ।।३।। जीवपणाचा वियोग । तो स्वरूपाचा योग । गुरुकृपे सवेग । जया प्राप्त ।।४।। जया आदि मध्यांत ब्रह्म । जया देही नातळे कर्म । जयाचा भवभ्रम । दुरावला ।।५।। तो शेखी जाहला ब्रह्म । हे बोलणेचि भ्रम । का बोल तयाचा संभ्रम । आहेचि म्हणुनि ।।६।। त्यानी ओळखलेचि नाही । आधीच हा कोण होई । श्री गुरुकृपाचिही । संपादिली ।।७।।

**घट भंगलिया घटाकाशी । मग मिळणे होय चिदाकाशी ।**
**की आधीच असे अखंड दशेसी । हेचि विचारी पा ।।३७।।**



घट होणेपूर्वीही आकाश । घट भंगलियाही आकाश । घट तेचि अवकाश । घट निर्मिल्या दिसतसे ।।१।। येथ आकाशा आकाश मिळणी । होत असे घट असुनी । तो भंगलिया निर्वाणी । कोड मिळे ।।२।। की अधीच ते असे दशा । म्हणोनि अंतीही प्राप्त ते दशा । पाहता हा अनुभव ऐसा । कोणीही बोले ।।३।। जीवा जरी चैतन्य दशा । मिळणी आहेचि चिदाकाशा । देहा का होये आडसा । तये ठायी ।।४।। हे जरी आहे । तरी देहांती मिळे हे नवल नोहे । आधीच तो मिळताहे । निजध्यासे स्वरूपी ।।५।।

**तेवि देह पडलिया आत्मयासी । मग मिळणे होय त्यासी ।**
**परमात्मा की आधीच बसे स्वरूपेसी । हे विचारी पा ।।३८।।**

परमात्मा तो आहेचि आधी । मागुती जाहली उपाधी । तयामाजी जे अवधी । बुद्धी तेचि ।।१।। हेचि होय जरी बुद्धी । अंतर्मुख सहज समाधी । उंचावोनि त्रिशुद्धी। आनंदीच सत चित् ते ।।२।। मग तो देह असेना ऐसा । तो काय होय अडोसा । चित्ता चिदाकाशा । चैतन्य मिळे ।।३।। स्वरूपे तो आहेचि आहे । परी जो ते दशे तो मिळताहे । गुरुकृपे हे वर्म लाहे । बहिर्मुख निगुऱ्या न कळे जे ।।४।।

**अखंड स्वरूपेसी लग्न असे । ऐसे जया गुरुकृपे भासे ।**
**तया देहांती मिळणे काय असे । आधीचे असे स्वरूपी ।।३९।।**

अखंड जे स्वरूप । तेथेचि जो निर्विकल्प । तया स्थिती नि:संकल्प । तो विकल्प कोठे ।।१।। देही भरे । चैतन्याचे वारे । तेचि जाहले सारे । पसरे दृश्य ।।२।। तेथे मिळे जो प्रेमभरे । त्याचा देहभाव नुरे । दृश्य दृष्टीचे ओसरे । संलग्न खरे स्वस्वरूपी ।।३।। जे स्वरूप अखंड । जेथ पा नोहेचि खंड । तेथ जड हे पाखंड । केवी टिके ।।४।। गुरुकृपे ऐसे । जया साक्षातचि दिसे । आधीच स्वरूपी बैसे । मिळणे कासया देहांती ।।५।। वारियात मिळाले वारे । जीव जाले स्वरूपाकारे । ते वर्तती ना अहंकारे । साक्षात्कारे विलसती ।।६।।

**स्वरूपी असे म्हणणे न साहे । तो स्वरूप अखंड आहे ।**
**परी जाणावया म्हणिजेत आहे । स्वरूपी असिजे ऐसे ।।४०।।**

स्वरूपी जीव संलग्न असे । म्हणणेचि हे होय कैसे । स्वरूपावीण जीवदशे । काय आहे ।।१।। स्वरूप तो आहे । काय आहे आणि नोहे । प्रवासी तो एकची आहे । स्वरूपी जीव ।।२।। हे जरी कळो ये । तरी हे बोलणे न साहे । जाणोनि घेण्या बोलीले हे । स्वरूपी असिजे म्हणोनि ।।३।। स्वरूपेसी जीव अभिन्न । देहोपाधी वाटे भिन्न । देहाचा अध्यास जीवन । दावी भ्रमणे ।।४।। अध्यासेचि अभिमान । देहाचा होय तो जो शीण । मग सुखी दु:खी आपण । कर्मी गुंती ।।५।। परी गुरुकृपे जीवन अंतर्मुख । जरी होय स्वरूपाभिमुख । ध्यासे स्वरूपचि एक । स्वानुभवा ये ।।६।।

**असिजे नसिजे हे काही । स्वरूप आत्मया वियोग नाही ।**
**सागरी तरंगा वियोग आहे काई । या तरंग सागरी मिळविजे ।।४१।।**

असणे नसणे असो काही । उपाधीमुळे जे घडो येई । उपाधीचा योग होई । वियोग केव्हा ।।१।। ऐसा घडे योगायोग । तेथ ठाके प्रारब्धभोग । परी जाणता संयोग । आहेच स्वरूपी ।।२।। स्वरूपाचे अनुसंधान । जडोन जाहलीया संलग्न । उठेचि नामीपण । व्यष्टीभाव ।।३।। मग ते होय समष्टी । सहजेची व्यापक दृष्टी । स्वरूप आत्मयासी मिठी । सहज आहे ।।४।। स्वरूप आत्मयाचा योग । हा नव्हे योगायोग । जो व्यापोनि आहे सर्वांग । या विश्वाचे ।।५।। सागरी उठती तरंग । तैसे जीव स्वरूपी अभंग । कल्पना उपाधी भंग । अवस्था करी ।।६।। या परीस काही नाही । जे व्हावयाचे ते होई । येथ आहे आणि नाही । दोन्ही संभ्रम ।।७।। सागरी तरंग उसळे । आणि तो सागरीच मिळे । ऐसे हे भक्तियोग सोहळे । साधकासी ।।८।।

**ऐस भावी मी स्वरुपसागरी तरंग । तरी मज स्वरुपी कैचा वियोग ।**
**सागर माझे सर्वांग । अथवा सागरचि मी ।।४२।।**

तरंग उठे सागरी । सागरपाणी तरंग का तरी । तोही पाणीच की परी । अल्प दिसे ।।१।। तो तरंग मिळे सागरी । तरी तो सागरचि आहे सत्वरी । सागर आणि लहरी । लहरी आणि सागर ।।२।। हे ऐसेचि पाहता असे । तोचि ते जीवमात्री दिसे । स्वरूपी अनंत जीव विलसे । जीवी ठसे स्वरूपची ।।३।।



स्वरूपसागरी जीव तरंग । मग का तया स्वरूप वियोग । तया सदाचि आहे संग । स्वरूपाचा ।।४।। उपाधीचा जै प्रसंग । कल्पना उठे सवेग । तेथ अध्यास आवेग । वियोग भासवी ।।५।। तरी जया हे कळे । कळ आकळोनि स्वरूपी मिळे । तो तेथ अखंड उजळे । स्वरूपची ।।६।।

**अहं ब्रह्म ऐसी स्फूर्ती । स्फुरे जया प्रती ।**
**अखंडीत बाणे ब्रह्मस्थिती । स्वरूपत्वेचि असे ।।४३।।**

स्फुरद्रूपाची प्रचीती । तेथ स्फुरद्रूप स्फुरे निश्चिती । अहं ब्रह्म हे स्फूर्ती । स्फुरण पावे ।।१।। मग ते ठायी जीवा प्रती । अखंड बाणे ब्रह्मस्थिती । स्वरूपाकार होवोनि वृत्ती । उठे मिळे स्वरूपाची ।।२।। वृत्ती दृश्यावरी नुठे । कारण तेथ दृश्य न उठे । स्वरूपची प्रगटे । स्वयंपूर्ण ।।३।। मग तेथ नुरे स्वरूपत्व । दृश्याचे नुरे दृश्यत्व । तो जीवित्व कैचे ।।४।।

**स्वरूपभावने देह पडे । तरी काय होईल आणखीकडे ।**
**तयासी अंतकाली स्मरावे न लगे रोकडे । स्मरावे जया तोचि तो ।।४४।।**

स्वरूपभावे देहाकडे । लक्ष्य नाही तो देह पडे । देहभावना देहाची उडे । देह असोनि ।।१।। मग तो देह असो नसो । जीव स्वरूपी जाय बैसो । ब्रह्मवृत्ती ठसो । आली जेथ ।।२।। स्वरुपी जो जीव जडे । काय होईल आणिकी कडे । जया जीवित्वाचे साकडे । भान उडे दृश्याचे ।।३।। मग ते देहाची जिताचि माती । मेलिया काय होय त्याची स्थिती । असो नसो क्षिती । नाही ज्याची ।।४।। देह मृत्तिकेसमान । आत्मा तो गाभा आपण । मग का तेथ स्मरण । वेगळे असे ।।५।। जरी स्मरणे वेगळे न हे । तरी स्मरण कैचे लवलाहे । स्मरणाकार जो होय स्वये । स्मरणरूप ।।६।। जया स्मरावे तेचि होये । मग वेगळे स्मरण जेथ नोहे । अंतकाल जाये । तयावरुनी ।।७।। अंतकाली आहे का स्मरण । हे पहाणेही अज्ञान । जेथ अखंड स्मरण । काळ वेळ ये जा करी ।।८।। सर्वचि जो साधी काळ । तो का न साधी अंतकाल । स्वरुपी नुरेचि दिक्‌काल । आकाश तेही ।।९।। जया स्मरावे तोचि तो । श्रीएकनाथांचा बोध हा तो । जया ठायी ठसावे तो । नि:शंकची ।।१०।।

**तोचि तो अघवा असे । तयासी अंती स्मरण स्मरण का असे ।**
**आधीच तो मिळोनि असे । देह नसे ब्रह्मची ।।४५।।**

तोचि तो एक ब्रह्म । जे जीवनी नुरे संभ्रम । देहदृश्य भ्रम । वोसरे निर्मम म्हणोनि ।।१।। तेथ जीवनी सर्वकाळ । येती जाती केवळ । का ते स्वरूप निखळ ।कर्मातीत ।।२।। मग अंतकाळ कोठे जाई । अंतकाळी हा कोठे राही । अंतकाळाचा अंत होई । अनंतात ।।३।। अंतकाळी देह जाई । परी हा स्मरणरूप राही । स्वरूपाची हे नवाई । अखंडची ।।४।। आधीच ब्रह्मी मिळाला । पुन: जन्म का असे त्याला । मरणाआधी मरोनि ठेला । विदेहपणे ।।५।। तो मनुष्याकृती दिसे । म्हणोनि वाटे मनुष्य ऐसे । परी तो ब्रह्मचि असे । सगुणपणे ।।६।।

**देही बह्म होणे । ते निर्गुण सायुज्यता म्हणणे ।**
**हे पाचवी मुक्ती जाणणे । वेदांतशास्त्री ।।४६।।**

देही जीव ब्रह्म होणे । ते निर्गुण सायुज्यपद जाणे । चारी मुक्ती पैल पावणे । पाचवी मुक्ती ।।१।। सलोकता समीपता । स्वरूपता सायुज्यता । चारी मुक्तींची वार्ता । ऐसी असे ।।२।। देवाचे लोकी जाई । तया सलोकता प्राप्त होई । देवासमीप राही । ते समीपता ।।३।। देवासरिसे रूप होई । ते सरूपता इही । तेचि ते होऊनी राही । ते सायुज्यता ।।४।। चारी मुक्ती सापेक्ष । पाचवी निरपेक्ष । येथ जीव प्रत्यक्ष । निर्गुण बह्म ।।५।। जीवनाचा ऊर्ध्वगामी गुण । तये संगे पावे निर्गुण । ऊर्ध्वगामी गुण । त्रिगुणाउपरी ।।६।। तीन गुणांचे होता कूट । ऊर्ध्व वाहे पवन नीट । अगुण शून्याचा करोनि घोट । सकार गुण ग्रासितसे ।।७।। सगुणाचा करोनि ग्रास । दावी निर्गुण सौरस । जेथ अखंड उल्हास । उत्साह मोठा ।।८।। ऐसे वेदांतशास्त्र बोले । जे पद संती आकळिले । तेचि येथ पा कथिले । श्रीएकनाथे ।।९।।

**क्षीरसागरी तरंग दिसे । तो सबाह्य क्षीरची असे ।**
**भंगता भंगता निजांशे । सागरचि असे आपण ।।४७।।**

क्षीरसागराचे वरी । उठती अनंत लहरी । तेथ बाहेर नि अंतरी । क्षीरचि असे ।।१।। लहरी फुटोनि होय पाणी । प्रवाहित्वे तेचि तरंगपणी । म्हणोनि ते दोनीही पाणी । तरी दोन नव्हेची ।।२।। मग तो एकचि सागर । पाणियाचे असे आगर । शब्दांचाचि फेरफार । उरलासे ।।३।।



**तेवी ब्रह्म तो क्षीरसागर अभंग । देह तेथिचा तरंग ।**
**तरंगा सबाह्य सागराचेचि अभंग । स्वयं ब्रह्म सागर तोचि ।।४८।।**

स्वयं ब्रह्म क्षीरसागर । तेथ देहांचे तरंग अपार । तेथ ब्रह्मावाचुनि इतर । काही नाही ।।१।। अंतर्बाह्य ब्रह्म दाटे । परी तरंगत्वे दृष्टी फुटे । दृष्टीसी आले फाटे । या दृश्याचे ।।२।। म्हणोन म्हणे ब्रह्म कोठे । जरी ते मागे पुढे दाटे । तरंग विरल्या भेटे । ब्रह्मासि ब्रह्म ।।३।। तरी तरंगही ब्रह्म । सागरही ब्रह्म । तेथ मरण आणि जन्म । उदणे निमणे ।।४।। तरी उदणे निमणे या अर्थ नाही । ब्रह्मसागर अभंग राही । म्हणोनि तो अभंगी येई । अभंगपणे संतांचे ।।५।।

**आता तो देहतरंग । फुटता न फुटता  ब्रह्मचि असे अभंग ।**
**तो देहनाशी ब्रह्म असे चांग । तेचि निर्गुण सायुज्यता ।।४९।।**

आता तो काया लहरी । फुटली न फुटली ब्रह्म तरी । असे अभंगीच परी । अभंगत्वे ।।१।। ती लहरी होय विलीन । मग ते दिसे ते लहरीपण । तया नाश आहे वाटे पण । ते अभिन्न सिंधूसी ।।२।। लहरीचे न दिसे पाणी । परी ते विरता सागरपणी । सागर तो पाणीच पाणी । नाश हा तो शब्दची ।।३।। लहरी विरता पाणी दिसे । लहरी उठता ते लहर भासे । लहरीचे पुनरपि नाशे । पाणीच ते ।।४।। देहनाशे ब्रह्म चांग । देह तरी ब्रह्माचे अंग । परी देहपणे उमग । न होय त्याचा ।।५।। देह गेलिया आठवे अनंत । म्हणती मिळाले अनंतात । मग ते आधी कोण होत । वेगळाले ।।६।। देह आत्मयाचे अंग । तया नाशे ब्रह्म चांग । हा जया अखंड प्रसंग । तया उमग या बोलाचा ।।७।। तेचि निर्गुण सायुज्यता । हे सहज ज्ञानावस्था । अज्ञानियासी हे कथा । कळो नये ।।८।।

**त्वा पुसिले मी कोण । कोठोनि आलो कोठे जाईन ।**
**मी जीव की शिव हा प्रश्न । पुसिले होते तुवा ।।५०।।**

मी कोण आलो कोठून । मागुती कोठे जाईन । मी जीव की शिव हा प्रश्न

। केलासि तुवा ।।१।। हा प्रश्न केलासी चांगला । हे कोणी विचारी न मला । तुझ्या या प्रश्ने जाहला । संतोष भला ।।२।। तुवा जो केला प्रश्न । तेचि आता सांगेन । तरी देवोनि अवधान । श्रवण करी ।।३।।

**जरी संकल्प विकल्प सांडिशी । तरी तू ब्रह्मचि असशी ।**
**संकल्पे आणिले जीवदशेसी । संकल्प लोपे तू परब्रह्म ।।५१।।**

सांडिता संकल्प विकल्प । जीव होय निर्विकल्प । सहजेचि ब्रह्मरूप । होत असे ।।१।। त्याची ब्रह्मभूत काया । का निवारिली तेणे माया । दवडिला नाही वाया । एक क्षण ।।२।। संकल्पेचि जीवदशा आली । जीवनगतीची वाटचाली । निमिषोन्मेष उजळी । प्राणापान ।।३।। प्राणापान गती वाहे । तेथ मन वाहे प्रवाहे । ते आकळिता लवलाहे । मन पंगु ।।४।। प्राणापान ऊर्ध्व वाहता । आनंद भरे गगनावरुता । आपआपणा पाहता । ब्रह्मरूपता होय ते ।।५।। संकल्पेचि जीवदशा । संकल्प लोपे ब्रह्मदशा । दारिद्र्य ते अवदशा । जन्माची नुरे ।।६।।

**वायुसंगे सागर । झाला दिसे तरंगाकार ।**
**वायु लोपे निरंतर । जैसा तैसाचि असे ।।५२।।**

अथांग भरला सागर । तेथे वायूचा होता जोर । तरंग उठती अपरंपार । हे तो दिसे ।।१।। परी वायु होता संथ । तरंगाचा होय अंत । एकसागर अनंत । स्वरूप उरे ।।२।। वायु लोपे जैसा तैसा । सागर तो असे जैसा । प्रकार येथेही तैसा । असेचि पा ।।३।। पाणियावरी पाणी उसळे । पुन: ते पाणियात मिळे । तरी ते पाणी नोहे निराळे । निराळेपणे ।।४।।

**संकल्प निमता जीवदशा जाय । मग स्वये परब्रह्मचि आहे ।**
**तया मग येणे काय । उरले असे ।।५३।।**

संकल्प निमालिया । जीवदशा जाय विलया । निवारोनि काया माया । ब्रह्म उरे ।।१।। नाकासी जे लागले सूत । तेचि जीवदशा होत । याचाही जेथ अंत । ते मूळ ब्रह्म ।।२।। तेचि जो का होय । तेथ येणे जाणे असे काय । मग तेथे उरे काय । ब्रह्मावीण ।।३।। ब्रह्मावीण नसे काही । उपाधीचा संभ्रम होई । उपाधी येई



आणि जाई । परी हे तैसेचि ।।४।।

**तयासी मग येणे जाणे नाही । घट भंगता घटाकाश काई ।**
**येणे जाणे असे पाही । विचारी पा ।।५४।।**

घटापूर्वीही आकाश । घटी आले म्हणोनि घटाकाश । घटभंग तरी महदाकाश । बोलिजेती ।।१।। घटामुळे हे बोलणे घडले । परी आकाशावाचून काय वहिले । विचार करिता कळे । ते आहेचि की ।।२।। ते मुळीच आकाश । उपाधीने शब्दविशेष । या परीस अशेष । ते वेगळे का ।।३।। मग जरी ते वेगळे नोहे । तरी घट फुटालिया निराळे काये । मागुती पाहता होये । सांगा तरी ।।४।। मग आकाश का आले गेले । ते सदाचि संचले । घट झाले आणि फुटले । काय घडले याविण ।।५।।

**तेवी निर्विकल्प पुरुषा । येणे जाणे नाही सहसा ।**
**घट भंगता घटाकाशा । येणे जाणे नसे ।।५५।।**

घट भंगलिया घटाकाशा । येणे जाणे नाही दशा । आकाश ते आकाशा । ठायीच असे ।।१।। सदेह जीव जो सविकल्प । तो विदेह जरी निर्विकल्प । तो सहजेचि अपाप । ब्रह्मरूप ।।२।। सदेह म्हणोनि सविकल्प । हे देहाचेचि रूप । परी तया आत जे निर्विकल्प । विदेहपणे ।।३।। देहाचे अध्यासे जीवा भ्रांती । ते गेलिया मूळची स्थिती । आहेच की निश्चीती । ठायीचीच ।।४।। मग येणे जाणे काही । तेथ कासया होई । हे बोलणेची काई । विपरीत ।।५।।

**घटाकाशी मठाकाशी । काय वेगळीक असे तयाशी ।**
**घट मठ भंगता महादाकाशी । वेगळीक असे ।।५६।।**

घटामाजी जे आकाश । आणि मठामाजी जे आकाश । तेथ वेगळेपण सदृश । नव्हेचि पाहता ।।१।। घट मठ भंगता निराळे । आहे का महादाकाशा वेगळे । नव्हे नव्हे ते आकाशचि निखळे । आकाशी या ।।२।। मग ते आहेचि आकाश । तया का म्हणावे लागे आकाश । उपाधीयोगे जे सदृश । निरुपाधी तेचि ते ।।३।। घट मठ उपाधी । म्हणोनि घटकाश संधी । मठाकाश शब्दी । भिन्न वाटे ।।४।।

हे शब्दज्ञाने वाटे भिन्न । अनुभवे पाहता अभिन्न । येणेजाणे वीण । ते ठायीच असे ।।५।। घट मठ फुटलिया । येणे जाणेचि नाही क्रिया । आकाश ते असे ठाया । आकाशाचे ।।६।। उपाधीचे सुटले ठिकाण । किंवा उपाधी झाली निर्माण । तरी आकाशाचे आकाशपण । जैसे तैसे ।।७।। उपाधीमाजीही आकाश । उपाधी गेलियाही आकाश । मग वेगळीक तयास । कदापि नोहे ।।८।। उपाधीने वेगळेपण । वाटे हे अज्ञान । परी हे अज्ञान आहे हे होता ज्ञान । अज्ञान सरे ।।९।।

**तेवी देह पडता न पडता । आत्मा आत्मत्वेचि असे तत्त्वता ।**
**तोचि सबाह्यता । पूर्णपणे ।।५७।।**

तेवी विचारे पाहता । आत्मा परिपूर्ण तत्त्वता । व्यक्ता आणि अव्यक्ता । व्यापुनि असे ।।१।। तयामाजी विश्व असे । आणि विश्वामाजी तो असे । अनुभवू सौरसे । घेता कळे ।।२।। म्हणोन देह पडता न पडता । आत्मा आत्मत्वे तत्त्वता । पहाता आहेचि निरुता । असणेपणे ।।३।। जे का मुळीच नाही । ते आहे नाही होई । सापेक्षता नवलाई । असे त्याची ।।४।। आहे नाही मिळोनी दोही । पाहता हे काही नाही । परी हे घडे जे ठायी । आहे नाहीवीण असेचि ते ।।५।। म्हणोनि ते निरपेक्ष । सर्वा ठायी प्रत्यक्ष । तेथ लक्ष्यी करोनि अलक्ष । जे दक्ष होती ।।६।। तयासी हे प्रचिती । सर्वची हे ब्रह्मस्थिती । जयाची हे व्याप्ती । अंतर्बाह्य ।।७।।

**डोहामाजी कुंभ असे । तया सबाह्य जळची असे ।**
**कुंभ भंगता न भंगता सरिसे । उदकचि असे ।।५८।।**

डोहामाजी असे कुंभ । किंवा फुटोनि होय निकुंभ । परी दोही ठायी स्वयंभ । अंभचि की ।।१।। देह आला आणि गेला । तैसा आत्मा नाही झाला । सदाचि तो संचला । जैसा तैसा ।।२।।

**घट भंगता उदक मिळाले । हेही बोलणे न साहे पहिले ।**
**वेगळे होते तया मिळाले । म्हणिजे तया ।।५९।।**

घट फुटलिया उदक मिळाले । म्हणजे ते काय झाले । आणि ते पाहता पहिले । काय होते ।।१।। पहिले ते होते पाणी । घटामाजी आले भरोनी । घट



फुटता पाणी । पाणीच झाले ।।२।। तेथ का आहे निराळे । की तेथ म्हणावे मिळाले । मिळता न मिळता उगले । पाणीच ते ।।३।। घट भरला तरी पाणी । फुटला तरी पाणी । घटापूर्वीही पाणी । निपाणी नव्हेची ।।४।। उगीच शब्दाचा खेळ । फुकट दवडती वेळ । पाणी ते निर्मळ । पाणीच आहे ।।५।।

**तेवि देह कुंभ भंगलिया । मग आत्मा मिळे परमात्मया ।**
**पहिली वेगळीक काय तया । या मिळाला म्हणिजेती ।।६०।।**

विदेहपणे कुंभ फुटलिया । आत्मा मिळे परमात्मया । हे बोलणेचि वाया । पहाता दिसे ।।१।। जो मिळाला परमात्मया । तो तरी आहेचि आत्मया । वेगळेपण तो तया । आधीही नाही ।।२।। मग मिळाला म्हणजे काय झाला । आधीचा तो कोण बोला । आणि जया मिळे तो निराळा । आहे कोठे ।।३।। मग तो आधी आहेच की । आत्मत्वेचि तया एकी । उपाधीने विलोकी । द्वैतभावे ।।४।। म्हणोनि द्वैत । अज्ञानाचा हेत । ते गेलिया निभ्रांत । आत्माचि तो ।।५।।

**तेवि भूते ब्रह्मचि असती । अंतर्बाह्य ब्रह्मचि होती ।**
**परी ते आपणाते नेणती । भाविती जीव संकल्पे ।।६१।।**

भूते आपणासी नेणती । जीव संकल्पे भाविती । नातरी ते ब्रह्मचि असती । अंतर्बाह्य ।।१।। जसा जयाचा संकल्प । तेचि त्याचे होय रूप । जरी का सत्य संकल्प । सद्रूपता ।।२।। ब्रह्माचा सत्य संकल्प । मायेचा मिथ्या विकल्प । जीवनाची खेच अपाप । होत आहे ।।३।। जैसा मनाचा घडे जप । तैसे त्याचे होय तप । तैसेनि प्रकाशे अपाप । सिद्धी होय ।।४।। संकल्पेचि धारणा । धारणेचि प्रगट खुणा । स्वानुभव तो आपणा । बाणतसे ।।५।।

**ते बापुडे करतील काई । सद्गुरु तया भेटलाचि नाही ।**
**जो गुरु भेटला तयाची पाही । जीवदशा गेली नाही सर्वथा ।।६२।।**

सद्गुरु जया भेटला नाही । तो बापुडा करी काई । निगुराचि तो राही । गुरुवीण ।।१।। जीवदशाचि गेली नाही । ऐशा गुरुची भेट होई । तरी भेट होवोनि काई । उपेगा ये ।।२।। जशी सरली जीवदशा । तैसी प्राप्त ब्रह्मदशा । जीव

जीवत्वेसी पाहता । दशा नुरे ।।३।। ऐसी जयाची स्थिती । तो श्रीगुरु ब्रह्ममूर्ती । ते दाविती प्रचिती । जीव शिव परमात्मा।।४।। जीवनाते जगणे । आणि जीवनची जगणे । हे गौप्यची जाणणे । महत्त्वाचे ।।५।। मग ते जीवनची जगती । ज्यांची झळके जीवनज्योती । जीवीत्वे जाणून जीवा प्राप्ती । ब्रह्मयाची ।।६।। जीवीत्वे जीव कळे । तो आधीच ब्रह्म निखळे । उपाधीसी न मिळे । उपाधीमाजी ।।७।।

**गुरुची जीवदशा गेली नाही । जीवाने जीव उद्धरेल काही ।**
**जो स्वये ब्रह्म झाला असे पाही । तोचि उद्धरील जीवाते ।।६३।।**

मी कोणी वेगळा जीव । ऐसा जयाचा जीवभाव । देहपणे जो स्वभाव । बनला तोचि ।।१।। समष्टीची व्यष्टी । परी व्यष्टी नेणे ते समष्टी । व्यष्टी परी दृष्टी । तैसी दशा ।।२।। जो झाला बहिर्मुख । तो का होय अंतर्मुख । सुख आणि दु:ख । बाहेरी ज्या ।।३।। मग तो पडे कर्मकांडी । तया काय आत्मयाची गोडी । जीवीत्वाने दिली दडी । जगला देहे ।।४।। मग ते देहदशा । ते जयाचि जीवदशा । अंतर जीवित्वाची दशा । नेणोनिया ।।५।। कशावरी हे जीवन । हे घेताचि ओळखून । देहाभिमान । मिरवी जगी ।।६।। देहाकडे ज्याची बुद्धी। तो सांभाळी देहा आधी । चित्तशुद्धी दृढबुद्धी । स्थिरता नव्हे ।।७।। जीवित्वेसी जीवजीवन । जरी ओळखे आपुले आपण । तरी तेचि ते जीवन । देहावीण या देही ।।८।। मग जीवदशा नुरे । जीवा जे दशा आली ते सरे । असा जो ब्रह्माकारे । तो तारी जीवासी ।।९।। जीवदशा नुरवोन । तो गुरु कैचा म्हणवी आपण । तयाते ओळखून । येती शरण शरणागत ।।१०।। परी जो गुरु म्हणवी आपण । दशा गेली नाही अजुन । तो का उध्दरी जन । जीव जात ।।११।।

**अंधाने अंध धरिला करी । तरी दोघेही पडतील गारी ।**
**त्यास काढावया बाहेरी । तिसरा पै पाहिजे ।।६४।।**

अंधळ्याची कास धरी आंधळा । दोघांचे वाटचाली खड्डा आला । अध:पात तो ठरलेला । तेथे डोळसची पाहिजे की ।।१।। जरी का भेटला डोळस । तरी घवघवीत यश । न मुकता प्राणास । ध्येयबिंदू गाठतील ।।२।।



**ते दोघेही सद्भावेशी । शरण जाती सद्गुरुशी ।**
**तरी उद्धरती निश्चयेशी । नाही तरी जाती अध:पाता ।।६५।।**

सद्रूपा जो दावी गुरु । ऐसा श्री सद्गुरु । तयांचा महिमा थोरू । अघटित ।।१।। वासनानदी महापुरी । प्राणी जरी ग्लानी करी । तेथे उडी घालोनि तारी । सद्गुरु तो समर्थ म्हणती ।।२।। जीवदशा जयांची सरली । ते ब्रह्ममूर्ती जगी ठेली । श्री गुरुलिंगजंगमाची साऊली । उद्धरी जगाते ।।३।। ऐसे सांगती समर्थ । श्री सद्गुरु श्री हनुमंत । तेची भगवान सद्गुरुनाथ । कळले पाहिजे ।।४।। ऐसे जया आकळीले । ते ते उद्धरिले । नातरी गेले । अध:पाता ।।५।।

**म्हणोनि सद्गुरुशी । शरण जावे सद्भावेशी ।**
**तो तात्काळ करी शिष्याशी । परब्रह्म ।।६६।।**

म्हणोनीच सद्गुरुशी । शरण जावे निश्चयेसी । धरोनिया सद्भावेसी । शरण्येची ।।१।। ज्यानी आपुले मन । केले सद्गुरुंचे आधीन । तेचि ते शरण । म्हणो ये की ।।२।। आपुले ऐसे काही । ज्यांनी ठेविलेची नाही । ते शरण त्यांची नवाई । जगावेगळी ।।३।। सत्स्वरूपा दावी जो भाव । तोचि एक सद्भाव । आमुचे मामा बोधिती भाव । कीर्तनी हाची ।।४।। सद्गुरु आपणासी निखळ । ब्रह्मचि मग तात्काळ । करीती न लगे काळवेळ । सांगती श्रीतुकाराम ।।५।। एकचि जाहले अनेक । ते अनेकी दाविती एक । मग तेथे एकीएक । एकीचेनी ।।६।। एकचि जरी अनेक । तरी का म्हणावे अनेक । जेथे नाही त्याविण आणिक । एकचि ते ।।७।।

**ते परब्रह्म म्हणजे कैसे । ते सांगता नये ऐसे तैसे ।**
**सांगावे जरी हाचि हा असे । तरी सांगणे घडे केवी ।।६७।।**

तरी ते परब्रह्म कैसे । सांगो म्हणो जरी ऐसे । तरी ते नोहेचि ऐसे । आणि तैसेही ।।१।। परी ते असे जैसे तैसे । सदा सर्वी संचले असे । आणि हा तरी कोण असे । तयावीण ।।२।। म्हणोनि तेचि ते असे । आणि काहीच नसे । जगावेगळे आपैसे । जगामाजी ।।३।। ते जगावेगळे असे । परी तयावीण जग न दिसे । हेचि येथीचे वर्म कैसे । जाणणे असे अनुभवे ।।४।। म्हणोनि ते सांगणे । केवी हे घडो येणे । सांगणे न सांगणे हेहि येणे । याविण नोहे ।।५।। सांगणे न सांगणे । पुसणे

न पुसणे । श्रीगुरु शिष्यहि येणे । सर्व हाचि ।।६।। ते ब्रह्मचि हा असे । तरी याचेवीण ठाव नसे । मग ते बोलावे कैसे । कोण शब्दे ।।७।।

**हाचि तो ऐसे काई । परब्रह्मी न लगे पाही ।**
**तेचि ते परब्रह्म पाही । पहाण्याविणे ।।६८।।**

हाचि परब्रह्म होई । मग येथ कोण कोणा पाही । तेचि ते परब्रह्म पाही । आपणासी आपण ।।१।। जे दुजेवीण पहाणे । ते असे पहाण्याविणे । का ते पहाणे परतणे । आपणिया ।।२।। तेचि ते आत्मदर्शन । तोचि तो दृष्टीदर्पण । काही न होनि नसोन । आपणचि ते ।।३।।

**पाहिले ते ब्रह्म नोहे । पहाते ब्रह्म होईल काय ।**
**हा विचार करोनि पाहे । पहाते ब्रह्म की पाहिले ब्रह्म ।।६९।।**

तरी पाहिले ते ब्रह्म नोहे । पहाणे आपणासीच होये । मग तेथे निराळे पाहिले काये । आणि पहाता कोण ।।१।। मग पाहिले का पहाते ब्रह्म । ऐसे हे सहजे आले वर्म । याचे ध्यानी आणोन मर्म । शोध घ्यावा ।।२।। कैसा हा करावा विचार । का करावा जयाचा विचार । जे तरी निर्विचार । आहेच की ।।३।। तरी आपआपणा पडताळा । यावा म्हणोनि घेऊ ताळा । जै जैसे आहे डोळा । तैसे दाऊ ।।४।।

**जरी पाहिले ब्रह्म होय । तरी पाहते आन आहे ।**
**पहाते ब्रह्म होये । पाहिले तेचि ।।७०।।**

जेथ काही न संभवे । तेथे प्रश्नची न उद्भवे । प्रश्नचि ना काय द्यावे । उत्तर ते ।।१।। जे पाहिले ते ब्रह्म होये । तरी पाहणारा बाजुसी राहे । पहाणाराचि ब्रह्म होये । पाहिले काय वेगळे ।।२।। तरी पहाते पहाणे पाहिले । ते तीनी एकचि झाले । तीन न म्हणो तरी ते गेले । एकचि साच ।।३।।

**दृश्याचा देखणा म्हणे द्रष्टा । एऱ्हवी दृश्यभावे देखणे नष्टा ।**
**या उभय चेष्टा । न चले तेथे ।।७१।।**



एऱ्हवी दृश्याचा जो देखणा । तो द्रष्टा म्हणवी आपणा । दृश्यचि ना तेथे द्रष्टा कोणा । म्हणावे जी ।।१।। जाला दृश्याचा अभाव । तेथे पहाणेचा सरला भाव । पहाणेपणाचा अभाव । होवोनिया ।।२।। पहाणे दृश्य दोनी सरले । तेथे एकचि राहिले । द्रष्टाही म्हणणे नुरले । एकत्वेसी ।।३।। दोनी चेष्टा न चलती । तेथ एकचि प्रचिती । द्वैतभाव चित्ती । उरलेचि ना ।।४।।

**दृश्याचा देखणा । तो द्रष्टा जाणा ।**
**हाहि विचार नामाभिधाना । न लगे तेथे ।।७२।।**

दृश्यचि जेथ सरे । तेथ द्रष्टेपण नुरे । का पहाणेचि वोसरे । म्हणोनिया ।।१।। आत्माचि आत्मया आत्मत्वे विलोकी । तेथ चाड नसेचि काही लौकिकी । तीन परी ते आले एकी । एकपणे ।।२।। म्हणोन द्रष्टा हे नामाभिधान । न लगेचि तयालागुन । ऐसे हे आत्मपण । सर्वश्रेष्ठ ।।३।।

**परा पश्यंती मध्यमा वैखरी । वाचा उडालिया चाऱ्ही ।**
**द्रष्टा महाद्रष्टा कोण अक्षरी । वाचा चारी कुंठित ।।७३।।**

जीवदशा जेथ सरे । मग चत्वार वाचा केवी उरे । परा पश्यंती मध्यमा नुरे । वैखरी ही ।।१।। येथ बोलणेचि संपले । चारी वाचेचे मौन झाले । आकाश शब्देचि ग्रासीले । अक्षर ते अक्षरत्वे ।।२।। कूटस्थोक्षर उच्य । भगवान बोलती हे भगवद्गीते । नाश नाही तयाते । म्हणोनि अक्षर ।।३।। क्षरापैल ते अक्षर । जेथ नाही शब्दोच्चार । द्रष्टा महाद्रष्टा हा विचार । तेथ कैचा ।।४।। निर्विचारी नाही विचार । विचार ना तेथ कैचा उच्चार । आत्मत्वाचा आचार । देहाचार नोहेचि ।।५।।

**जेथे बावन्न अक्षरेचि नाही । तेथे द्रष्टा महाद्रष्टा काई ।**
**हे उच्चारा आणि विचारा पाही । वाचे केवी बोलवेल ।।७४।।**

जेथ शब्दाक्षरे नुरली बावन्न । तेथ द्रष्टा महाद्रष्टा कोण । म्हणणे तरी कोण कारण । कैसेनि पा ।।१।। विचार उच्चारा न येई । वाचे केवी बोलो येई । अनिर्वाच्य जे राही । परब्रह्म ।।२।। जे का असे अनिर्वाच्य । ते कैसेनि व्हावे वाच्य । जेथ

वाच्यचि अवाच्य । कृपे जाहले ।।३।। जो शब्देविण संवादू । दुजेवीण अनुवादू । स्वयंसिध्द बोधू । आत्मयाचा ।।४।।

**परी वाचे वाच्यानी काही । अनिर्वाच्य न कळे काही ।**
**भाषणावीण कळे काई । विचारी पा ।।७५।।**

जे ब्रह्म परी दृश्या आले । किंवा जेथ दृश्य झाले । दृश्य देखती डोळे । ना कळे ते परब्रह्म ।।१।। जीव बहिर्मुख जाले । कळेचिना हे कैसे चाले । जे हाले आणि डोले । लक्ष्य तेथे ।।२।। परी हे हालवी कवण । याचे तो नाहीच भान । जीव जो होती बेभान । एकपण विसरोनी ।।३।। पहाती गाडी कैसी पळे । परी वाफ न देखती डोळे । पहाती देह चाले । परी जेणे हे घडो आले । ते देखती ना ।।४।। म्हणोनि येथ शब्दाचे काम । शब्देचि निरसे शब्दभ्रम । जेथ जीवन संभ्रम । तेथ वळे ।।५।। तरी वाच्य अनिर्वाच्य । सरली शब्दाची कचकच । तोंडाची वचवच । उरेचना ।।६।। वाचा जाणे जे वाच्य । अनिर्वाच्य दावी जे अनिर्वाच्य । परी हे अंतरी लागे आच । संभाषणे ।।७।। म्हणोनि हे बोलणे । असे अबोलपणे । अबोल एकदाचि जाणे । तो सरे बोल ।।८।। जये ठायी बोल सरे । तेथ कृती अवतरे । कृतीवीण कोण तरे । सांगा जगी ।।९।। म्हणोन महत्त्व कृती । तयाकरिता शब्दव्युत्पत्ती । बोलावे लागे हे युक्ती । स्वानुभवासी ।।१०।। जेणे आत्मयासी अनुभूती । ऐसे करणे लागे कृती । आवश्यक तरी भक्ती । शब्द संगती तैसीच ।।११।।

**कर्मे निषेधती नेणोनि वर्म । कर्माविण केवि पावेल परब्रह्म ।**
**भक्तीवीण पुरुषोत्तम । केवी पाविजे ।।७६।।**

परी जे कृती नेणती । ते संभाषणीच राहती । कृतीवीण प्राप्ती । नोहेचि काही ।।१।। करणारासी वेळ नाही । बोलावया लागी काही । बोलेल ते करील काई । म्हणती जनही व्यवहारी ।।२।। तेचि परी ये रीती । असे कर्माची संगती । जेणे शुद्धचित्त होती । प्राप्तीलागी ।।३।। पाहता कर्म कृतीवीण । न घडे हे उपासन । उपासने सहज ज्ञान । एरव्ही नोहे ।।४।। परी जे हे नेणती । ते बोलोनि तृप्त होती । जे का खरी नव्हेचि तृप्ती । अनुभवावीण ।।५।। जया हे कळलेचि नाही । येथिचे



वर्म काही । तयांचा परमार्थ सोयी । शब्दाची माजी ।।६।। ते शब्दांची करती सोय । परी ते अनुभवांची गैरसोय । परी हे सांगायाचीही सोय । नसे काही ।।७।। हे सांगता येतो राग । म्हणोन म्हणणे पडे भाग । तुम्हीच थोर आम्हा लाग । नाही याचा ।।८।। काही झाले तरी । कृतीवीण न पवे सरी । कृती मुख्य अवधारी । जाण तया ।।९।। नेणपणे कृती नेणती । तया कैसी ब्रह्मप्राप्ती । जरी नाही भक्ती । केवी आतळे पुरुषोत्तम ।।१०।। दृश्य असे पुरीष । तयात अदृश्य पुरुष । तयातु उत्तम सौरस । तो पुरुषोत्तम ।।११।।

**मार्गेवीण नगरा केवि जाइजे । नगर गेलिया मार्ग राहे सहजे ।**
**पाक केल्याविण तृप्ति पाविजे । हे केवी घडे ।।७७।।**

मार्गची नाही जर । कोठेनिया हा जाणार । नगर कैचे गाठणार । मार्गावीण ।।१।। मार्गी टाकिता पाऊल । ध्येय बिंदू येई जवळ । तोचि तो गाठेल । निश्चितपणे ।।२।। पाक झालाचि नाही । तो हा खाणार काई । पोटी अन्नचि गेले नाही । तो तृप्ती कैची ।।३।।

**म्हणोनि कर्मेवीण ब्रह्म पाविजे । हे तो व्यर्थचि अनुमान बोलिजे ।**
**तृप्ती झालिया सहजे । पाक करणे ठेले ।।७८।।**

ब्रह्मप्राप्ती कृतीवीण । हे बोलणे तो शीण । हे व्यर्थ अनुमान । पाहता कळे ।।१।। जया अंतरीच झाली तृप्ती । तया न लागे पाक निष्पत्ती । परी व्हावया ते संतृप्ती । पाक निष्पत्ती करणे लागे ।।२।।

**हरपले सापडल्याविण । दीप केवी सांडिजे आपण ।**
**खणता जोडिले जीवन । सहज खणणे राहे ।।७९।।**

सांडले ते सापडावया । दीप जो घेतला हाती या । कोण बाजुसी ठेवी तया । सापडलियावाचून ।।१।। खणता खणता जमीन । सहज लागले जीवन । मग तेथ खणणेचे कारण । राहे कोठे ।।२।। मग ते राहे सहजेची । तेची वार्ता येथिची । संगती मनी विचाराची । घेतली पाहिजे ।।३।।

**तैसे कर्मे ब्रह्म पाविजे । मग कर्मे राहती सहजे ।**
**हे दृष्टांते आले ओजे । परी ते कैसे नोहे ।।८०।।**

कृती केली ब्रह्मप्राप्ती । मागुती कर्मे सहजेचि राहती । हे ओजस्विते आले दृष्टांती । परी ते तसे नव्हेची ।।१।। इतुकी हे कृती । आहे महत्वाची स्थिती । आचरोनि दाविली संती । ब्रह्मरूपता पावोनि ही ।।२।। आधी होता संतसंग । तुका झाला पांडुरंग । तरी भजन ते अभंग । अखंड चाले ।।३।। अभंग म्हणजे भंग नाही । अखंड म्हणजे खंड नाही । चाले सदासर्वदाही । सहजेचि ।।४।।

**ठेविले सापडल्या दीप ठेविजे । हा दृष्टांत बोलावे वाजे ।**
**परी न घडे बोलिजे । ते तू ऐके ।।८१।।**

ठेवणे ठेवले । ते दीप प्रकाशे सापडले । दीप जागी ठेवोनि राहिले । निवांतची ।।१।। सापडली ठेव म्हणून । दिवा तेथ प्रकाशन । दिव्याचे काय कारण । मागू ते की ।।२।। परी ऐसे परमार्थी न घडे । वस्तू दृश्याआड दडे । ती पाहिजे उजेडे । अखंड की ।।३।।

**कर्मे ब्रह्म पाविजे । मग कर्मे त्यागिजे ।**
**हे बोलणे श्रुतीशी सहजे । विरोध दिसे ।।८२।।**

कर्मे तो ब्रह्मप्राप्ती । आणि कर्मत्याग मागुती । परी हे संमत नोहे श्रुती । हे बोलणे ऐसे ।।१।। अखंड ते जरी ब्रह्म । तरी त्याचे अखंड कर्म । हेचि येथीचे वर्म । बोले श्रुती ।।२।।

**कर्मे ब्रह्म पाविजे । ते कर्म न सांडिजे ।**
**लोकसंग्रहाकारणे कीजे । आज्ञा प्रभूची ।।८३।।**

कर्मसु अमृतं । अमृतधारा अखंड कर्म । जे सहजे घडे सनेम । आमरण ।।१।।जे सुटताचि मरण । तयाचा त्याग करी कोण । जेणे ब्रह्म भेटे आपण । ते त्यागून काय प्राप्ती ।।२।। म्हणोन कर्म टाकता न ये । आणि ते टाकोचि नये । जे ब्रह्मचि झाले स्वये । आयुष्य केले कृतिरूप ।।३।। आयुष्यचि केले साधन । जीवनची जगले संपूर्ण । मरणांतीही ते न सोड्डून । दावी आपण कृती जगा ।।४।।



लोकसंग्रहाकारण । कृती करावी ब्रह्मही होऊन । ऐसी आज्ञा भगवान । करीतसे ज्ञानीया ।।५।।

**भक्ती ज्ञान वैराग्यावीण । न पाविजे ब्रह्म पूर्ण ।**
**ऐसे वेदशास्त्र प्रमाण । सांगती प्रसिध्द ।।८४।।**

कर्म भक्ती ज्ञान विराग । मिळोन ब्रह्मप्रत्यय पूर्णांग । हे वेदशास्त्र सांग । सांगताती ।।१।। हे तो असे प्रसिद्ध गोष्टी । यावीण न धरावे पोटी । जे पोटी तेचि ओठी । कृतिरूप असो द्यावे ।।२।। ऐसीया कृतीवीण । ब्रह्मानुभव नये पूर्ण । म्हणोन साध्य साधन । साधन साध्य ।।३।। ऐसे हे कर्म जाणून । तया तेचि करणे आपण । जे जे करणे ते कारण । तयासीच ।।४।।

**म्हणोनि देहवंत जंव असिजे । तंव कर्म सज्ञनी न सांडिजे ।**
**संती उदास होवोनि जरी सांडिजे । तरी जनी केवी वर्तावे ।।८५।।**

म्हणोन हा देह आहे जोवरी । तोवरी कर्मकृतीची जरुरी । वर्म हे जाणोनि अंतरी । सज्ञन ते न सांडीती ।।१।। सत्स्वरुपाचियाप्रती । जन म्हणजे इंद्रियवृत्ती । जयांचिया तादात्म्य होती । तेचि जाणावे सज्ञन ।।२।। ज्यानी आयुष्यची केले कर्म । म्हणोन चुकले प्रारब्धकर्म । प्रारब्ध भोगिती परी न बाधे ते वर्म । जाणावे पा ।।३।। संत उदास देहावरी । सदाचि रंगले अंतरी । कृतिरुप जीवनपरी । अंतर्बाह्य ।।४।। उदास होवोनि जरी । संत सांडीती कर्म तरी । सामान्यजने कोणेपरी । रहाटावे ।।५।। म्हणोनि संतांची रहाणी । श्रेष्ठ मानिली सुजनी । कोणी हे जाणुनी । मार्ग धरिती ।।६।।

**श्रेष्ठ जैसे आचरती । इतर जन तैसेचि वर्तती ।**
**श्रेष्ठ जन न आचरता इतर जन भांबावती । हे काय भले ।।८६।।**

जयेपरी श्रेष्ठ आचार करिती । आचरोनिया सत्कर्म कृती । क्रियारूप दाविती । जगालागी ।।१। तोचि बोध जन घेती । आणि तैसेचि ते चालो जाती । तया संप्रदाय पंथ म्हणती । किंवा मार्गू ।।२।। जे मार्गे जाती संतजन । तेचि ते पंथ होती आपण । तयामागोन सारेजण । तया आचारे चालती ।।३।। म्हणोन

वेदशास्त्रा जे प्रमाण । ते आचरती संतसज्जन । तेचि होय जगासी प्रमाण । संत जरी न करीती आचरण । इतर जण भांबावती ।।४।। अरे हे काय बरे । आहे की जी सांगा त्वरे । कृतिरूप कर्म खरे । येर खोटे ।।५।।

**म्हणोनि संती कर्मभक्ती कीजे । न चाले त्या भक्ती लाविजे ।**
**परोपकारास्तव दाविजे । आचरोनिया ।।८७।।**

म्हणोनि संतवरी । कर्मभक्ती शेवटवरी । जीवनीया केली खरी । अंतर्बाह्य ।।१।। हे जे आपणासि दिसे । याचे कारण हेचि असे । न कळे तरी पुसे । भगवंतासी ।।२।। भक्तीसी नाही मोल । ते तो असे अमोल । जेणे योगे घेई डोल । घननीळ परमात्मा ।।३।। जया अंतरी नाही भक्ती । तेथ ते निर्मिली ये शक्ती । आपण आचरोनि युक्ती । आमरण ।।४।। मग उरले नाही पाखांड । पाखांड ते झाले दुखंड । सरले वादवितंड । मायाजाळ ।।५।। मग ते मार्गी आले । आलिया भक्तिमार्गी लाविले । देहासी चंदनापरी झिजवले । परोपकारी ।।६।।

**आता असो ह्या गोष्टी । त्वां वर्तावे परिपाठी ।**
**नाही तरी निर्वाण निष्ठी । निष्ठा धरोनि राहिजे ।।८८।।**

आता असो द्या जी या गोठी । तुवा आचरावे ये कोटी । जे ठेविले परिपाठी । संतजनी ।।१।। जाणोनि तो परिपाठ । भाव ठेवोनि उत्कट । धरावा मार्ग चोखट । कृतिरूप भक्तीचा ।।२।। ध्येयनिष्ठा धरोनी । लक्ष्य द्यावे निर्वाणी । लावोनि ऐक्य निशाणी । भोगावे निर्वाणी परमपद ।।३।। अंतरी बाणता दृढ निष्ठा । मग ते होय निर्वाणनिष्ठा । तेथ देहाची ना प्रतिष्ठा । सुभटा गा ।।४।।

**जो अंतर्निष्ठ राहे । अंतरी तन्मय होये ।**
**तयाशीच राहे । परी ही कर्म भक्ती न सांडिजे ।।८९।।**

जेणे निर्मिले अंतर । आणि व्यापिले ते अंतर । तेचि ते निरंतर । लक्षिता अंतर नुरेचि ।।१।। निरंतर नुरवी अंतर । म्हणोनि ते निरंतर । नाहीतर पडलेचि अंतर । अंतरोन ।।२।। ऐसे न पडावे अंतर । तरी ते जाणावे अंतर । तेथ व्हावे तदाकार । अंतरनिष्ठे ।।३।। निजनिष्ठा ते अंतरनिष्ठा । वर्म जाणोन चोखाळी वाटा



। अंतर्यामी सुभटा । तन्मयता ।।४।। तयासी जो संलग्न राहे । कर्मभक्ती सांडो नये । तोचि तो होये । तयाचि ऐसा ।।५।।

**जो जडभरताचे वृत्ती राहे । तया कर्मे करावे काय ।**
**इंद्रियांच्या व्यापारी जो न ये । तयाशीच राहे कर्मकृत्य ।।९०।।**

जे का आहे कृत कृत्य । तया करणे नलगे कृत्य । जगी होतसे कृतकृत्य । कृत कृत्य साधोनि ।।१।। जेणे जाणिले हे कृत कृत्य । त्याचे सदाचि जाले कृत्य । तया नाही कृत्याकृत्य । कर्माकर्म ।।२।। कर्माकर्म सापेक्ष । परी हा असे निरपेक्ष । हाचि सर्वांशी अपेक्ष । न यासी अपेक्षा ।।३।। जडामाजी जे भरत । भरोनि जे जड न होत । ऐसे जे उपाधिभूत । अंतर्गत चैतन्य ।।४।। तया जडभरताचे वृत्ती जो राहे । जेथ जड वृत्ती उरो नये । तया कर्मे करावी काय । करोन न ये उपेगा ।।५।। जो इंद्रियांचे व्यापारी न ये । तयासी कर्मकृत्य राहे । अमृतधारा कर्म भक्ती हे । जीवन ज्याचे ।।६।। कायिक वाचिक मानसिक । न राहेचि ज्या लौकिक । तयाचे कर्मजाळ अशेख । सरले की ।।७।।

**जो अंतर वोवडी पहुडला । मन उन्मन होऊन ठेला ।**
**तोचि कर्माशी आचवला । आत्मनिष्ठ म्हणोनि ।।९१।।**

जे अंतर शून्याची ओवरी । तेथे कोणी पहुडे जरी । मनाचे जे मनत्व तरी । उरेचिना ।।१।। रामकृष्णनामी उन्मनी । साधिली सर्व सिद्धी तयानी । जिवंतपणाचा भाव ग्रासुनी । मनासह ।।२।। मग तो उन्मन होऊन ठेला । मन पांगुळले तो व्यापार लुळा । देहेंद्रियाचा जहाला । येणेपरी ।।३।। म्हणोन कर्मासी दूरी ठेला । आत्मनिष्ठ ऐसा राहिला । देहमनाचा सुटला । कर्मबंध ।।४।। मग तो नाही कर्मासी । आणि कर्म नाही तयासी । जडभरतापरी ऐसी । अवस्था ते ।।५।।

**परी कर्म न सांडिजे । देह पडे तो आचरीजे ।**
**नाचरे त्या भक्ती लाविजे । त्या पुण्यास पार नाही ।।९२।।**

आत्मयाचे सहज कर्म । जे करी जीवासी निष्काम । कृतिरूप नेम । भक्तीयुक्त जयाचा ।।१।। यापरी नाही स्वधर्म । जेणे साधिला उपरम । साधोनिया

शम दम । दमदार जो ।।२।। जया एका दमावरी । दमदारपणे दम धरी । ऐसा जो दम धरी । हरदम झाला ।।३।। हराने जे धरले दमात । ते आले ज्याचे आत । रंगोनि गेले चित्त । तेथेचि ज्याचे ।।४।। सर्वासी ज्याचा धीर दम । म्हणोन सांगे धरा दम । तेणे तुमचे होईल काम । याचि नामे ।।५।। देह पडे तो हा आचार । मनी नाही दुसरा विचार । लोकोपचारा जो उच्चार । तोहि तोची ।।६।। येणेचि सर्वाचे आतिथ्य । येणेचि नमोनि सर्वांचे स्वागत । करीतसे उचित । आपुले ठायी महात्मा ।।७।। सहजी पाखांडमती । परी तयांचीही निवळे वृत्ती । अंतरी उपजोनि भक्ती । आणिले त्या भक्तीसी ।।८।। सांडोनिया पाखंडता । तेही आले भक्तिपंथा । पार नसेचिया आता । पुण्यालागी ।।९।।

**आपणा देखता बुडिजे । सवे धडाडी घालोनि त्याते काढिजे ।**
**त्या पार नाही पुण्या जे । आत्मघात चुकला म्हणोनि ।।९३।।**

बुडता हे ऐसे जन । ते न देखवे म्हणोन । कळवळे हे अंतःकरण । जयाचे गा ।।१।। तेथ धरोनी धडाडी । जो आपण घाली उडी । स्वतः मारोनिया दडी । वरची काढी जीवासी ।।२।। वासना नदीचे महापुरी । जो का बुडोनि ग्लानी करी । तया आत्मबळे जो तारी । आपण जो ।।३।। ऐसा आत्मनिष्ठ महात्मा । या तयाचीया पुण्यकर्मा । पहाता जगी नाही सीमा । ऐसेचि तो ।।४।। येथ आत्मघात चुकला । हा केवढा लाभ जहाला । आत्मा तो आत्मया मिळाला । जैसा तैसा ।।५।।

**आता असो जो परोपकारी । आपण तरोनि जडजीवा तारी ।**
**तो एक संसारी । पुरुषार्थी म्हणावा ।।९४।।**

परोपकार मोठे पुण्य । पाप ते परपीडन । अष्टादश पुराणी आपण । बोलती व्यास ।।१।। पुण्य ते परोपकार । पाप परपीडा फार । श्रीतुकाराम ऐसेचि सार । सांगती काही ।।२।। पर परमात्मस्वरूप । उप म्हणजे सान्निध्ये तद्रूप । कार म्हणजे अपाप । तदाकार होतसे ।।३।। ऐसा हा परोपकार । श्रीमामा कीर्तनी सांगती विचार । जो करी तया अपार । पुण्य जोडे ।।४।। आपण तरोनी दुजीयासी । जडबुध्दी जड जीवासी । तारी परमात्म निश्चयेसी । परोपकारी तो धन्य ।।५।।



जीवनाचे संसरणी । तो धन्य एक प्राणी । नामोच्चारे श्रवणी । तद्रूप तो पुरुषार्थी ।।६।। तेणे साधिले पुरुषार्थ । जेणे जोडिला परमार्थ । समर्थामध्ये समर्थ । श्रीमंत तोची ।।७।।

**जड उन्मत्त पिशाच्य जाले । तेणे त्याही आपणशीच तरिले ।**
**आपुले पोट भरिले । परोपकार न घडेची ।।९५।।**

कोणाची भूतबाधा घालविली । कोणी पिशाचे मुक्त केली । परी ते विद्या झाली । पोटासाठी ।।१।। ऐसी या युक्ती पोटभरी । तो नव्हे परोपकारी । आत्मसमाधान परी । तया कैचे ।।२।। सारासार विचार । करता कळे सारासार । ज्ञानियांची बुद्धी अपार । तल्लख तेथे न टिके हे ।।३।।

**गीता ज्ञानी भरतर्षभ । ऐसे बोलिले पद्मनाभ ।**
**ज्ञानी तो आत्मा स्वयंभ । बोलिले सप्तमाध्यायी ।।९६।।**

भरतर्षभ गीताज्ञानी । पद्मनाभ बोले हे वचनी । आत्मा तो स्वयंभू ज्ञानी । सप्तमाध्यायी कथियेले ।।१।। ज्यात गीत असे ती गीता । ग्रंथित असे ती गाथा । काही कथिले ती कथा । होय प्रथा आचारे ।।२।। ईश्वरनिर्मित गीत । भगवतगीता स्वयंज्योत । सुबोध दावी अनुहत । अर्जवोनि रहाता ।।३।। अर्जवून राहे तो अर्जुन । सरळपणा हे ज्याचे जीवन । तया वृत्तीसी आकर्षुन । सांगे श्रीकृष्ण गीत हे ।।४।। हे गीतेचे स्पष्टीकरण । गीत हे कैचे स्वयंपूर्ण । आत्मा स्वयंभूचि ज्ञान । जेणे ज्ञान सर्वांचे ।।५।। आत्मयाचा विषय ज्ञान । ज्ञानाचा विषय आत्मा न होन। अप्रमेय प्रयोगी आपण । न प्रमेय प्रयोग ।।६।। म्हणोन तो आत्मा ज्ञानी । तया जाणे तो आत्मज्ञानी । तोचि एक खरा ज्ञानी । परोपकारी ।।७।। जो का तारी दुजीयासी । तो ज्ञानी निश्चयेसी । वेळोवेळा तयासी । आपण शरण ।।८।।

**आपण तरोनि अन्याते तारिजेत । म्हणोनि आत्मज्ञानी म्हणिजेत ।**
**स्वमुखे सांगे भगवंत । तोषोनिया ।।९७।।**

आत्मज्ञानी तो योगी । जो कदा न वियोगी । म्हणोनि सकळा योगायोगी । आत्मयोग दावितसे ।।१।। आपण आधी तरी तरी । आणि दुजियातेही तारी ।

म्हणोन तयाते श्रीहरी । आत्मज्ञानी म्हणतसे ।।२।। आपुलिया मुखे उचित । संतोष पावोनि भगवंत । गौरवचि करीत । निजभक्ताचा ।।३।।

**निर्विकल्प समाधी निर्गुण योगी । संप्रज्ञात समाधी कर्मयोगी ।**
**जो कर्म आचरे सर्वांगी । परी अकर्ता तो ।।९८।।**

जे का साधे अपाप । ते होय निर्विकल्प । कर्मयुक्ती कृतिस्वरूप । पावे सविकल्प अवस्था ।।१।। निजतेजी मिळोन जाये । जो मग देहभावावरी न ये । निर्विकल्प जो पाहो ये । जे निर्विकल्प समाधी ।।२।। सहज समाधी निर्गुणी । जेथ संपली बोलणी । खुंटली ये चारी वाणी । अनिर्वाच्य आतुडले ।।३।। येथ जे कर्मकृती । तेचि जो पावे गती । अमृतधारा चित्ती । अखंड ज्याचे ।।४।। ऐसा जो कर्मयोगी । कर्म आचरे सर्वांगी । सर्वांगी कर्म म्हणोनि असंगी । देहदृश्या ।।५।। म्हणोन तो होय अकर्ता । जरी सर्वांगे आचरिता । संप्रज्ञात समाधी अवस्था । साधिली जया ।।६।। जो सर्व काही करी । आणि सर्व करोनि काही न करी । श्रीहरी जया करी । करवी सर्व ।।७।।

**निर्विकल्प समाधी कैसी । काही कल्पना नाही जयासी ।**
**निस्तरंग सागराचि ऐसी । स्थिती जयांची ।।९९।।**

सांडी कल्पना उपाधी । तेचि साधुला समाधी । श्रीमुक्ताई वर्म बोधी । ताटीचे अभंगी ।।१।। जीव जाला कल्पनोपाधी । ते कल्पनाची सरली आधी । उरली नाही व्याधी । भवाचि हे ।।२।। आधीव्याधी सरली । तो साम्यावस्था आली । विश्रांती पूर्ण लाधली । सहजेची ।।३।। देहभाव जेथ विरे । तेचि ते साधन खरे । सुख शांत मन उरे । तीळही नुरे काम क्रोध ।।४।। तरंगाविण जै सागर । तैसा कल्पनेविण हा आगर । परमार्थाचे माहेरघर । निर्विकल्प ।।५।। जो सदाच नि:संकल्प । तेथ काय उठेल विकल्प । दोनी पैल जे अपाप । उरलेसे ।।६।। तेचि जो जाहला । तो जैसा तैसा उरला । मन मुरोनि आपणाला । पहातसे ।।७।। म्हणोन ते निर्विकल्प समाधी । जेथ समरूप जाहली धी । जेणे साधिली अवधी । जीवनसंधी ।।८।।



**जो अंतर वोवरी पहुडला । सहजचि इंद्रियव्यापार खुंटला ।**
**मग शुभाशुभ नाही त्याला । निर्विकल्प म्हणोनि ।।१००।।**

जो अंतर शून्य वोवरी । पहुडे निजत्वे निज निर्धारी । तो येईचना व्यापारी । इंद्रियांचे ।।१।। खुंटला इंद्रियांचा व्यवहार । कर्माकर्म कोठे तर । ते जेथे नाहीच जर । कैसे शुभाशुभ तयासी ।।२।। मग तया हरिच्या दासा । शुभकाळ दाही दिशा । जया भावे जैसा तैसा । सर्वचि हरी ।।३।।

**तया देहावरी येणेचि नाही । या देहभावने आतळेल काही ।**
**देह पडेल हे स्मरणची नाही । नसे काही आठवण ।।१०१।।**

तया देहावरी नाहीच येणे । तो का येईल देहभावने । आणि फुगेल देहाभिमाने । जड जीव होऊनी ।।१।। जया नाही देहाभिमान । देहाचे जया विस्मरण । देह पडेल हे स्मरण । तरी कैसे ।।२।। देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो । घेतसे आनंदानुभवो । जन्ममरणी ।।३।। जन्म आणि मरण । या दोहीची नाही आठवण । झाली अंतरी साठवण । श्रीहरीची म्हणोनि ।।४।।

**ठाव नाही मनबुध्दीशी । मग आठवण कैची त्याशी ।**
**तो निर्विकल्प समाधीसी । रत जाहला ।।१०२।।**

मन बुद्धीच जेथे निमाली । जन्ममरण हे नयेचि बोली । ते आठवणही पा नुरली । नि:संकल्प होऊनी ।।१।। जो जाहला नि:संकल्प । तोचि होय निर्विकल्प । परी जेथ उदेला संकल्प । तो विकल्पही अटळ ।।२।। वायुवरी उठे संकल्प । तो तेथ देहदृश्य ताप । व्यवहारही अपाप । घडोचि लागे ।।३।। परी तो वायूची जेथ संथ । तो संकल्पावरी होय मात । संकल्प न उठे तेथ । निर्विकल्पता सहजेची ।।४।। मग ते निर्विकल्प समाधी । स्थिर झाली मनबुद्धी । चंचळपणाचिये अवधी । उरली नाही ।।५।। तेथ तो जाहला रत । तो आत्मत्वे मिळे आपणात । आत्मानुभव सुखेचि घेत । आनंदाने ।।६।।

**अंतरी काही कल्पावे । कीं इंद्रियाव्दारी वर्तावे ।**
**हे केले कर्तव्य आघवे । नाही निर्विकल्प योगियासी ।।१०३।।**

अंतरी काही कल्पावे । हे न घडेचि स्वभावे । अंतरी न सामावे । कल्पनाते ।।१।। अंतर ते निरंतर । निरंतर ते अंतर । जेथ पाहता काही अंतर । नसेचि की ।।२।। परी का तयासी अंतर । पडले तो फार अंतर । तेथे कल्पनेसी बहर । विस्तार होये कल्पनेचा ।।३।। मग तो कल्पनाविस्तार । तया म्हणती संसार । मध्यवर्ती कल्पना सूत्र । अंतर निरंतर आत्मत्व ।।४।। तरी ते मोडे कल्पना । इंद्रियद्वारी येणे घडेना । हे केले कर्तव्य आपणा । हेही नुरे ।।५।। जे काही केलेचि पाहिजे । हेही नाही सहजे । अंतरनिष्ठ तो विराजे । अंतरीच ।।६।। तो निर्विकल्प योगी । नव्हे सविकल्प भोगी । संगी असोनि असंगी । त्यागी विरागे आत्मत्वे ।।७।।

**जाली जरी वर्तणुक । तरी परापेक्षा वर्तणे देख ।**
**ना तरी एकांत निर्विकल्प । सुख अखंड भोगिजे ।।१०४।।**

जयाचेनि देहवैभव । तया वर्तनाचा स्वभाव । जीवित्वाचा जरी अभाव । तरी आचार सहजे ।।१।। परी तो आचार विचार । जाणोन परापेक्षा साचार । परपरमात्मा निरंतर । ओळखोनी ।।२।। ही परमात्मयाची सेवा । म्हणोन वर्तणे या गावा । जेणे न पडेचि गोवा । अज्ञानाचा ।।३।। अज्ञानाचा जरी गोवा । तरी प्रपंची पस्तावा । ना तरी विसावा । आत्मत्वेसी ।।४।। परांची अपेक्षा जाणून । तयांचे सुखवावे मन । ऐसे जयांचे अंत:करण । उंचावले ।।५।। हे न जरी घडे कारण । तो करी एकांत सेवन । राहोनि एकांती आपण । निर्विकल्प ।।६।। मग तेचि ते सुख । भोगीतसे एकीएक । अखंडपणेचि देख । आपणिया ।।७।।

**निर्विकल्प समाधी पुरुष । आता संप्रज्ञा समाधी परीस ।**
**जे आठै प्रहर पांचही पालव सावकाश । मोकळे इंद्रियांचे ।।१०५।।**

जयाचि जाली सम प्रज्ञा । की जे स्वतंत्र बुद्धी असे प्रज्ञा । जया मानवली श्रीगुरु आज्ञा । प्रज्ञाचक्षूचेनि ।।१।। भूवोर्घ्राण मध्यस्थान । जेथ हे प्रज्ञा झळके आपण । ते होवोन समाधान । समा आली ।।२।। तो ते निर्विकल्पता । पावली समाधी अवस्था । पंचविषयी निर्विषयता । सावकाश जोडली ।।३।। सकारी जे अवकाश । ते जेणे जोडले सावकाश । मोकळपण इंद्रियास । नाही बंध



विषयांचे ।।४।। आठौ प्रहर ऐसे साधिती । गुरुआज्ञेचिया युक्ती । सहजेचि विरक्ती । भक्ती समाधी निजयोगे ।।५।।

**तो इंद्रियाते नेणे । तो आवघी स्फूर्ती आपुलीच जाणे ।**
**सागरे तरंग मानणे । सागरचि तो ।।१०६।।**

जो इंद्रिये मुळीच नेणे । तो ते आपुली स्फूर्तीच म्हणे । तरंग सागरी विलसणे । जीयापरी ।।१।। जेथ नाही अन्य स्फूर्ती । जेथ आपुलीच प्रचिती । येणपरी जो द्वैती । न येचि की ।।२।। देहइंद्रिये सांग । हे आत्मयाचे आवेग । धावती सवेग । स्फूर्तीपणे आत्मत्वी ।।३।। स्फूरद्रूप जे स्फुरे । ते स्फुरद्रूपीच सरे । स्फुरणरूप साचोकारे । ते कृती जयाची ।।४।। स्फुरणावरी नाही कृती । स्फुरण हेचि जया कृती । नव्हे स्फुरण हेचि आकृती । जयाची गा ।।५।।

**तरी इंद्रियांच्या लहरी । ते तळपती याचिवरी ।**
**विषय इंद्रिये हाचि जरी । वर्तता बाध काय ।।१०७।।**

आत्मया ठायी लहरी । ते दृश्यरूप चराचरी । प्रगट जाहले कुसरी । चैतन्यत्वे ।।१।। दृश्यलहरी देहलहरी । मन चित्त बुद्धी लहरी । इंद्रियांच्याही लहरी । लहरीपणे ।।२।। मग तया आत्मस्थिती । लहरी उठोनि तळपती । विषय इंद्रिये का होती । यावाचून ।।३।। मग हाचि विषय इंद्रिये । आपुलाचि आपणा आपण होये । आपणचि भोगे स्वये । आपणाठायी आपण ।।४।। मग ते वर्तना । बाध काय आपणा । जेथे आपुलीया आपणा । काम आहे ।।५।। आपुलिया आपणाचे काम । तरी ते सहज निष्काम । तया कोण म्हणे सकाम । सांगा मज ।।६।।

**हाचि हा आघवा जरी । तेथे मन बुद्धी इंद्रिया कैची उरी ।**
**नसता उरी कोण कोणा मारी । अद्वयानंदी वाया ।।१०८।।**

हाचि सकळ काही जाहला । तेथ ठावचि नाही बुद्धीला । मग इंद्रियांना आणि मनाला । काय वाव ।।१।। मन इंद्रिया बुद्धीसी ठाव । नसता कोण कोणासी मारी वाव । अद्वयानंद स्वयमेव । स्वयंपूर्ण ।।२।। तेथ सर्व व्यवहार वाया । म्हणोनि कोण करी या उपाया । जेथ ठावचि आनंदा या । वाचून नाही ।।३।।

**काय अग्नि अग्निते जाळी । काय सूर्य सूर्याते पोळे ।**
**काय पाणी बुडवी ये जळी । पाणीयाते ।।१०९।।**

अग्नी जाळी का अग्नीसी । का सूर्यची पोळी सूर्यासी । पाणी बुडवी पाण्यासी । हे केवी घडे ।।१।। तयेचि परी । पाहता विचारी । कळो येई हे परी । आत्मतेसी ।।२।।

**तेवी हाचि आघवा असता । आपणासी करी बद्धता ।**
**होय आपणीया द्वंद्वे लाविता । देखिला असे कोठे ।।११०।।**

मग हाचि जरी पूर्ण सिद्ध । तो करी का आपणासी बद्ध । हे संभवे का आनंद । असता पा ।।१।। मग तेथ द्वंद्व काय । तो आपणासी लाविता होय । ऐसा कोणी तरी काय । असे जगी ।।२।।

**परी अद्वयानंद ज्ञान । झाले पाहिजे दृढीकरण ।**
**तयाशी विषयेंद्रिय पूर्ण । ब्रह्मत्वेचि भासे ।।१११।।**

परंतु येथे हे एक वर्म । अवश्य ध्यानी घेणे मर्म । जीवाठायी बोध परम । पाहिजे की ।।१।। अद्वयानंद ज्ञान । एकत्वाचेचि दृढीकरण । काहीच नाही ब्रह्मावाचून । हे प्रचिती अवश्य ।।२।। विषय इंद्रियेही पूर्ण । ब्रह्म होती जया लागुन । जया एका ब्रह्मावीण । काहीच नुरे ।।३।।

**तो जे जे करी ते ते ब्रह्म । हे नेणोनिया गुरुमुखे वर्म ।**
**ते करिती म्हणोनि इंद्रियकर्म । तरी बाधकता होय त्याशी ।।११२।।**

जे जे काही दृष्टीस दिसे । ते ते ब्रह्मरूप असे । हे जया प्रत्यया येतसे । तो सिद्ध पुरुष ।।१।। पूजा जप ध्यान । हे नाहीच तया लागुन । तो करी ते ते ब्रह्मार्पण । ब्रह्मकर्म ।।२।। जे कर्मचि होय ब्रह्म । म्हणोन ते ब्रह्मकर्म । ऐसेच हे वर्म । येथे आहे ।।३।। तो बोले ते स्तुती । झोपता ते समाधी स्थिती । पदसंचार घडता होती । प्रदक्षणा ।।४।। तो पाहे ते देवाचे रूप । ऐके ते अनुहत अपाप । घ्राण घेई तो धूप । हाती दीप तो आरती ।।५।। तो जे जे काही करी । ते ते ब्रह्मचि होय तरी । हे नेणोनिया अवसरी । अधःपात ।।६।। जया हे ओळखेना । गुरुकृपेचि नाही खुणा । तयाचिया मग जीवना । अधःपात अटळ ।।७।। गुरुमुखे वर्म नेणती । आणि जे इंद्रियाकरवी कर्म करती । ती कर्मे बाधक होती । ऐसीया जीवा ।।८।।



**विद्या नेणोनिया आपण जीवे । डोळ्या सर्प धरु धावे ।**
**तो वाचे की जाय जीवे । विचारी पा ।।११३।।**

जया ते विद्याचि न ये । आणि तो सर्प धरु जाये । जरी तो का दिसे ये । कोठेहि कैसा ।।१।। तो वाचे का मरे । विचार करोन पहा बरे । तैसेचि हे जीवा खरे । बाधक आत्मज्ञानाविण ।।२।। म्हणोनिया गुरुकृपे । अध्यात्मविद्या अपापे । प्राप्त जाली या तपे । तप ना परी सिद्ध ।।३।।

**तेवी अध्यात्मविद्या नसता । ते संत स्थिती वर्तो जाता ।**
**तया न चुके बद्धता । असंप्रदाई म्हणोनी ।।११४।।**

अध्यात्मविद्या विद्यानाम् । ऐसेचि बोले पुरुषोत्तम । श्रीभगवद्गीता गुह्य उत्तम । वर्म ऐसे ।।१।। जरी का नसे ज्ञान । ते जिताची पशुसमान । आत्मविद्या साधिल्याविण । माणुसपण ते व्यर्थ ।।२।। वाचा बोलू वेदनीती । तेचि करु जे केले संती । गणिताचिये निश्चिती । ताळा दावी ।।३।। तेवी हे अध्यात्मज्ञान । सर्व ज्ञानांचे अधिष्ठान । ते आपण जाणोन । संतापरी जे वर्तती ।।४।। तयालागी समाधान । का मग उरेचिना बंधन । तेचि ते मुक्तपण । सहजेचि संतस्थिती ।।५।। परी नसोन प्राप्त अध्यात्मविद्या । हे तयावीण पाखांडी भेद्या । साधो जाई वरपंग अभेद्या । संत ऐसा ।।६।। आणि दावी संतपण । जगालागी सफाई करून । परी चुकेचि ना कर्मबंधन । का आचरण वरपंग ।।७।। जो निगुरा असंप्रदायी । तया कैचे साधो येई । साधोचि नये तो केवी होई । मुक्त साधु ।।८।।

**जीवदशा फिटली नसता । ते पूर्णाची स्थिती वर्तो जाता ।**
**तयाशी होय बद्धता । आत्मनिष्ठ नव्हे म्हणोनि ।।११५।।**

तोचि तो आत्मा आपण । जीवदशा येथे शून्य । म्हणोनिया परिपूर्ण । स्वयेचि सिद्ध ।।१।। तो सिद्ध असेचि मुक्त । तया कायसे बंधन होत । ते कायसे जरी पुसो जात । तरी तो अनिर्बंध ।।२।। चारी देहांची आठवण । नाही जया

लागुन । जीवभाव शून्य होऊन । सरे जीवपण जीवाचे ।।३।। मग ते आत्मता । संपादोनि अवस्था । सहजेचि अखंडता । भोगीतसे ।।४।। परी जीवदशा न फिटली । ते पूर्णता नाहीच आली । पूर्णतेचे अभावी जाली । बंधस्थिती ।।५।। जव जीवदशा सरली नाही । ते पूर्णा स्थिती वर्तो न येई । व्यष्टीभावे देही । नांदतसे ।।६।। न जाणोन समष्टी । होत असे तो व्यष्टी । म्हणोन तो होय कष्टी । देहाध्यासे ।।७।। अध्यास देहाचा । तोचि तो पाश कर्माचा । जीव देहे बांधिला साचा । म्हणोन बद्ध ।।८।। का तो आत्मनिष्ठ नोहे । देहनिष्ठे देहोची होये । जरी पूर्ण स्थिती वर्तो जाये । तरी बद्ध ।।९।। वर्तन जाले पूर्णाचे । परी वलय राहिले अपूर्णाचे । अध्यासेचि लहरींचे । अनित्याचे ।।१०।। हे न जाणोन बंध आला । म्हणोन न सुटे बंध त्याला । कर्माकर्मी गुंतला । देहामाजी ।।११।। वरकड चाले वरपंग । तरी त्याचे सुटले अंतरंग । म्हणोन रंग न येता बेरंग । जाहला जी ।।१२।।

**आता असो ही बुध्दीवाद स्थिती । तू आत्मनिष्ठ राहे ब्रह्मस्थिती ।**
**सोहं ब्रह्म मी हे स्मृती । असो दे सदा ।।११६।।**

आता असो जी हा बुद्धिवाद । तू आत्मनिष्ठची राहे सिद्ध । सोहं ब्रह्म हे स्मृती अगाध । सदा असो ।।१।। बुद्धिवाद तो बुद्धिवाद । तेणे काही नोहेचि सिद्ध । जे असे स्वयंसिद्ध । ते सिद्ध कैसेनि ।।२।। आत्मयामुळे बुद्धी । म्हणोन बुद्धीने ते नये सिद्धी। सरलीया देहबुद्धी । आत्मबुद्धी ते होय ।।३।। जव जवापरि देह असे । तव कर्म होय ऐसे । जया बिंदूत देहांत होतसे । तेथ विलसे आत्मबुद्धी ।।४।। तयालागी म्हणती प्रज्ञा । जाणिजे का रे सर्वज्ञा । तेचि ते गुरुआज्ञा । संस्थित इये भ्रुकुटी ।।५।। इये बुद्धीचि आत्मनिष्ठ । होसी सर्वासी वरिष्ठ । जेवी का ते वसिष्ठ । ब्रह्मनिष्ठ तपोमूर्ती ।।६।। हे तपची परी कष्ट नव्हती । ऐसी हे ब्रह्मस्थिती । जेथ अखंडची स्मृती । ब्रह्मास्मिची ।।७।। सोहं तेची ब्रह्म । जेथ नाही कर्माकर्म । मी देह म्हणती तो संभ्रम । भोवराचि तो कर्माचा ।।८।।

**पूर्ण ब्रह्मज्ञान । भावी मी चैतन्यघन ।**
**हेच निष्ठा असो दे पूर्ण । अहर्निशी ।।११७।।**

आत्मस्वरूप परिपूर्ण । जेथ नोहेचि अपूर्ण । तयाचे ज्ञानही पूर्ण । म्हणोन



असे ।।१।। अस्तित्वाचा जो भाव । तेथ मी कोण हा ठाव । सापडे हेचि लाघव । पाहता दिसे ।।२।। तेथ जे चैतन्यघन । तेचि ते आपण । अहर्निश काई हे जाणुन । असो निष्ठा तैसीच ।।३।।

**मुळीचाची मी परब्रह्म । ऐसे बिंबले मुळीचे वर्म ।**
**तो म्हणे मी झालो ब्रह्म । मुळीचा असे म्हणोनि ।।११८।।**

मुळीचा मी परब्रह्म । तर मी मुळी आहेचि ब्रह्म । का सापडले हे वर्म । म्हणोनिया ।।१।। जे असे मुळी । तेचि तृणकाष्ठी सकळी । दिसो येई तत्काळी । सहजेची ।।२।। तैसेचि हे सर्व । एकविध ब्रह्मभाव । तरी का आपणा ठाव । वेगळा असे ।।३।। म्हणोन तो मीच तो । तया वेगळा न होतो । तोचि तो असतो । तो मी ऐसा ।।४।।

**असे म्हणो तरी नसेपण येथे । असे नसेपण आइते ।**
**असे तेचि निरुते । असशी बापा ।।११९।।**

जे असे ते न दिसे । जे न दिसे ते असे । दिसे ते ते भासे । ऐसे नवल ।।१।। म्हणोन जे न दिसे । तेचि ते गा असे । दिसे ते खरे नसे । का नासे म्हणोनी ।।२।। म्हणोन असे आणि नसे । दोनी परी ते आइतेची असे । श्रीसद्गुरु बोधे गिवसे । साधकासी ।।३।। असे आणि नसे । हे जेणे सापेक्ष दशे । आलेसे जे काहीसे । तेसेचि की ।।४।। ते जे का असे । तेचि ते सापेक्ष नसे । निरपेक्ष असे । स्वयंसिद्ध ।।५।। ऐसे जे निरपेक्ष । तेथ दृश्यादृश्य सापेक्ष । दोनी नुरता प्रत्यक्ष । उरले छेदे ।।६।। तेचि ते निरुते । तू असशी गा येथे । समाधान चित्ते । साम्यावस्थे ।।७।।

**तू क्षराक्षराचाही साक्ष । जीवाशिवाचाही साक्ष ।**
**तू बद्ध ना मोक्ष । आता स्वत: सिद्धची अससी ।।१२०।।**

जे का असे क्षराक्षर । विनाश अविनाश अपार । चैतन्य आणि जड साचार । मिसळले एकमेका ।।१।। हे दोनी मिसळले । परी एकमेका न मिळाले । ऐसे हे दिसो आले । नवल येथ ।।२।। ऐसे हे पाहता सापेक्ष । परी तू तो निरपेक्ष

। सापेक्षासी होसी साक्ष । स्फुरद्रूप ।।३।। क्षराक्षरा साक्षीभूत । तेवीच जीवाशिवाही होत । जीवशिव हे उठत । तरंग चित्सागरी ।।४।। चैतन्य जे प्रवाही । तेथ जे गतीमान होई । ऐसी जे का नवाई । बंधमोक्षा अतीत ।।५।। दिक् काल आणि आकाश । या अतीत जे सौरस । तयालागी काय असे पाश । देहादिकांचा ।।६।। जेथ नाही बंधपाश । तेथ कोठे असे मोक्ष । जेथ ना बंध मोक्ष । तो तू प्रत्यक्ष स्वयंरूप ।।७।।

**तू आत्म्याचाही आत्मा । तू उभयतांचा चिदात्मा ।**
**तू परमात्म्याचा आत्मा । यालागी बोलिलो ।।१२१।।**

तू आत्मयाची आत्मगती । जीवशिवा चिदात्म स्थिती । परमात्मयाची प्रचीती । परमात्मयाची प्रतीती तोही तूची ।।१।। तीन परी एकची तो । हे गुरुगम्य प्रचीती । ऐसे हे वर्म चित्ती । निरुपाधी ।।२।।

**एरव्ही आत्मा परमात्मा बोलिजे । तरी दुसरा नसता कोण म्हणिजे ।**
**जेथ दुसरा न साजे । तेथे आत्मा परमात्मा म्हणे कोण ।।१२२।।**

आत्मा परमात्मा ऐसे बोलती । दुजे नाहीच तो कोण म्हणती । आत्मा परमात्मा प्रचीती । एकचि असे ।।१।। परी हे जाणो नये । तेणे ऐसी भाषा होये । जरी हे जाणो ये । तरी अनिर्वाच्य ।।२।।

**म्हणोनि म्हणती अनाम अनिर्वाच्य । तेथे ॐकारसहित शब्दाची कचकच ।**
**राहिली विवेकाची वचवच । स्वत: सिद्ध कळलीया ।।१२३।।**

म्हणोनिया तया म्हणती । अनाम अनिर्वाच्य स्थिती । ॐकारासह शब्द प्रचीती । नुरे जेथे ।।१।। जेथ प्रणवही निमाला । तेथ शब्दची सहजची आटला । विवेकही जाला । स्वरूपाकार ।।२।। नित्यानित्य वस्तुविवेक । तो तरी कोठे म्हणता एक । स्वत: सिद्ध स्वरुपी तुक । तुटले जन्माचे ।।३।। स्वत: सिद्ध जे कळले । तेचि ते आकळिले । जे का असे कोंदले । सर्वा ठायी ।।४।।

**दोर दोरपणे असे । दोर काही सर्प झाला नसे ।**
**दोर सर्पत्वे भ्रांतीशी भासे । अपभ्रांती करोनी ।।१२४।।**



दोर हा पाहता दोरचि असे । तो दोरपणेचि विलसे । तो काही सर्प नसे । जाहला की ।।१।। जो परी जाहला भ्रांत । जयाची दृष्टी असे तरळत । तो अपभ्रांतीने देखत । सर्पाभास ।।२।। जे भासे ते नसे । न भासे तेचि असे । परी काही असे म्हणोन भासे । काहीतरी ।।३।। मुळीच काही नसे । मग तेथे काय भासे । भासासी काय आभासे । भासाभासापैल काय? ।।४।। हे सर्व विचारे जाणावे । कळो येईल आघवे । हे सांगती बरवे । श्रीएकनाथ ।।५।।

**तेचि ब्रह्म ब्रह्मत्वेचि असे । ब्रह्म काही प्रपंच जाले नसे ।**
**ब्रह्म प्रपंचत्वे अज्ञानाशी भासे । अपभ्रम जाणिजे ।।१२५।।**

ब्रह्म हे ब्रह्मची असे । आणि ते ब्रह्मपणेचि विलसे । ते काही जाले नसे । प्रपंच गा ।।१। परी जे अज्ञानी । तया भासे प्रपंचपणी । का ते भ्रांत म्हणोनी । भ्रमलेची ।।२।। दिननिशी जे सायास । तोचि गा प्रपंचाभास । जयाचा गुण भगवंतास । आठवीना ।।३।। प्रपंचगुणे गुणाकार । तो अधोगामी जीवन असार । होतसे पा देहाकार । बहिर्मुख ।।४।। देहाकार होय जर । साक्षात्कार कैचा तर । ऊर्ध्वगामित्वे साचार । अंतर्मुख ।।५।। जरी होय ऊर्ध्वमुख । होवोनिया अंतर्मुख । तरी होय एकीएक । तद्‌गुणाकारे ।।६।।

**भूमीतूनी मडकी निघती काय । ते कुलाल मती होत आहे ।**
**तैसे ब्रह्म काही करीत नाही पाहे । कर्ता संकल्प तेथे ।।१२६।।**

मडकी काय भूमीसी घडती । ते होय कुंभाराचे मती । ब्रह्म काही न करी पहाती । विश्वघटना ।।१।। एथ एक करता संकल्प । ब्रह्मरूप ते निर्विकल्प । स्वयंसिद्ध स्वयंरूप । स्वयंपूर्ण ।।२।।

**वायूचेनि संयोगे । सागर भरे तरंगे ।**
**ते सागर करी किंवा वायुसंगे । होय विचारी पा ।।१२७।।**

सागरी उठती लहरी । ते का पहा सागर करी । दिसो येई हे विचारी । घडवी वायू ।।१।। वायुसंगे उफाळे सागर । तरी तरंग उठती अपार । म्हणोन तरंग आणि सागर । हे वायूमुळे ।।२।।

**तेवी ब्रह्म उगेचि असे । संकल्पे प्रपंचाकार होतसे ।**
**संकल्प निमता काहीच नसे । ब्रह्म वेगळे ।।१२८।।**

उगेपणी ब्रह्म असे । संकल्पेचि प्रपंच भासे । तया संकल्पाचे नासे । ब्रह्मचि उरे ।।१।। संकल्पेचि दृश्य पसरे । नि:संकल्पे ते ओसरे । ते नुरलिया जे उरे । ते ब्रह्म ।।२।।

**तू म्हणशी ब्रह्मी संकल्प नसे । तरी कोणापासून होतासे ।**
**जो भावी तया होतसे । एरव्ही नाही ।।१२९।।**

ब्रह्मी जरी संकल्प नसे । तरी तो कोणापासोन होतसे । कोणे ठायी गिवसे । कोण्यालागी ।।१।। व्यष्टीभावे संकल्प उठे । समष्टी होताचि तो नुठे । संकल्पे दृश्य प्रगटे । नसता अप्रगट ।।२।।

**सोनेपरी गेटा तानवडे । भावी तया लेण्याची आवड ।**
**भंगता न भंगता सोनेचि अखंड । भूषणाकार असे ।।१३०।।**

सोनयावरी जैसा भाव । तैसे दागिने होती स्वभाव । ते भाविता प्रभाव । आवडीचा ।।१।। जया लेणियाची आवड । तयालागी हे सवड । परी ते सोनियाची लगड । आहेच की ।।२।। भंगता न भंगता । सोनेचि ते अखंडता । भूषणाकारे तत्त्वता । सर्वथा ते ।।३।।

**सोन्या भूषणाचा दृष्टांत पाहे । सोने अंगेचि विस्तारले होये ।**
**परी हे न विस्तारोनि विस्तारले आहे । अज्ञान वसे अज्ञानाशी ।।१३१।।**

सोने अलंकार । याचा घेता विचार । सोनियाचा अंगविस्तार । दिसो येई ।।१।। पाहता हे सोने । होती अंगेचि ते दागिने । परी हे न हो न होणे । विश्व ब्रह्मी ।।२।। अज्ञान अज्ञानाशी वसे । तयासि हे दृश्य भासे । ते नासे तरी असे । ब्रह्मचि की ।।३।।

**आपुलीच कल्पना । विविध रची स्वप्ने नाना ।**
**ते करिता दिसे रचना । प्रबोधी काहीच नाही ।।१३२।।**



जे मनी ते ध्यानी । ध्यानी ते दिसे स्वप्नी । कल्पना ते विविधपणी । साकार होये ।।१।। म्हणोनि ते कल्पना । रचोनि दावी स्वप्ने नाना । परी ते प्रबोधी उरेना । निर्विकल्पी ।।२।। प्रकर्षात्मक बोध । तोचि जीवनी होय प्रबोध । जयालागी आत्मबोध । संत म्हणती ।।३।। आत्मस्थिती ते बोधस्थिती । निरुपाधी होणे युक्ती । जेथ शाश्वती निश्चिती । स्थिरत्वेची जीवना ।।४।।

**तेवी संकल्पे रचिले दिसे । निर्विकल्पी कांही न दिसे ।**
**रचे खचे संकल्प वसे । कल्पना नाशी दोन्ही नावी ।।१३३।।**

संकल्पेची दृश्य । निर्विकल्पे ते अदृश्य । दृश्य आणि अदृश्य । ऐसे होये।।१।। परी दृश्यादृश्य । पाहता हे दोनी सदृश्य। दोनीकडे संकल्पना नाश । होत असे ।।२।।

**आता नसले तरी नसो । याचा काय अंती नसो ।**
**तुझे मन स्वरूपी बैसो । अखंड असो तेचि होऊनी ।।१३४।।**

कल्पनेचा अंत । जये ठायी हा होत । काही नाही तेथ । ऐसेचि गा ।।१।। दृश्य नसले तरी नसो । संकल्प देह जाय पुसो । पुसोनि अंती तोही नसो । मन विलसो स्वरूपी या ।।२।। मन हे स्वरूपी असो । अखंड ते तेथेचि बसो । तेचि ते होवोनि बैसो । तदाकारे ।।३।।

**तेचि अखंड होऊनी राहे म्हणिजे । ते आधीच असे सहजे ।**
**परी नेणतेपणा वाहशी ओझे । मी आपणाते नेणे म्हणशी ।।१३५।।**

तेचि ते गा होये । का जे आधीच आहे । अखंड सहज स्वये । अंतर्यामी ।।१।। परी नेणतेपणे । आपणासी नेणे । नेणोनि हे वाहणे । प्रपंच ओझे ।।२।।

**त्या नेणिवेते तू जाणशी । जाणते ते तूचि होशी ।**
**आता नेणीव वाहशी । व्यर्थचित् ।।१३६।।**

ऐसे जे हे नेणपण । परी ते तत्त्वता जाणे कोण । तो जाणताचि आपण । विचारे कळे ।।१।। जाणता जरी का आपण । तरी नेणिवेचा शीण । व्यर्थचि मग

ते कोण । वाही ओझे ।।२।।

**नेणिवेशी कोण जाणे । त्या नेणिवेशी आत्माचि जाणे ।**
**तो तू आत्मा जाणपणे । जाणिवेशी जाणसी ।।१३७।।**

आत्मा तो जाणपण । जणिवेसी जाणे जाण । हेचि ते वर्मखूण । उमगावी की ।।१।। तरी हे नेणपण । कोण जाणे आत्म्याविण । जाण नेण जाणाया कारण । आत्माचि असे ।।२।।

**जाणीव नेणीव दोहीशी । तूचि जाणपणे जाणशी ।**
**जाणपणाचे जाणणे होसी । दोनीवीण ।।१३८।।**

जाणीव नेणीव दोनी भाव । जाणपणे जाणसी स्वभाव । जाणपणाचे जाणणे अपूर्व । तूचि आहेसी ।।१।। जाणणे नेणणे ही दोनी । जाणपणे जाणे प्राणी । जाणपणाचे जाणणे होती । दोनीवीण ।।२।।

**होणे न होणे काही । तुज बापा उरले नाही ।**
**तू स्वत: सिद्धची पाही । आइताची असशी ।।१३९।।**

होणे आणि न होणे । उरले नाही येणे । का जे आइतेपणे । स्वत:सिद्ध ।।१।। मग येथ व्हावे काय । आणि न व्हावे ऐसे काय । सांगावे जी माय । मजलागी ।।२।। होणे न होणे जेथ नुरे । तेथ आपणची उरे । जे उरे तेचि पुरे । अपुरे सरे तेधवा ।।३।।

**ब्रह्म माया काही । तुजवाचोन आन नाही ।**
**दोन्ही दैवत तुजवीण काही । आन नसती ।।१४०।।**

ब्रह्म तेथे माया । माया तेथे ब्रह्मराया । दोनी तुजहोनि सखया । दुजी नव्हती ।।१।। माया ते मुळीच नाही । ते असोनिया काई । ब्रह्म ते ब्रह्मची राही । समष्टीपणे ।।२।। समष्टीचेनि व्यष्टी । उपाधीगुणे होय कष्टी । परी निरुपाधी जैं दृष्टी । तैं तूचि ते ।।३।। म्हणोनिया ते । तूची दोनीही दैवते । होसी पहा निरुते । अंतर्मुख ते ।।४।।



**सवे सृष्टी चराचर । हा सर्व तुझाचि विस्तार ।**
**हाही भ्रम भासे साचार । होसी स्वये तूचि तू ।।१४१।।**

तुझ्याचि बरोबरी हे सृष्टी । चराचर झाली त्रिपुटी । परी तया पाठी पोटी । सबाह्य दृष्टी तूचि तू ।।१।। या वेगळा तो भ्रम । सर्वी जे उपाधी नाम । लहरीचेनि संभ्रम । जीवनी म्हणोनि ।।२।। म्हणोन नसे ते भासे । आणि वाटे तेचि असे । परी असे तेचि न दिसे । नसे ऐसे वाटोनी ।।३।। ऐसे हे वाटणे । परी ते वाटणेचि होणे । यापरते न होणे । आणिक काही ।।४।। स्वये तूचि निरंजन । अससी आपण । सत्चिदानंदघन । सबाह्यचि ।।५।।

**डोंब गव्हाला म्हणती । अपभ्रमे आपणचि नाम ठेविती ।**
**दीपे रज्जू पाहता आपणचि म्हणती । सर्पभास लटिकाची ।।१४२।।**

डोंब आगीचा म्हणती । अपभ्रम होवोनि चित्ती । आणिक नाम ठेविती । परी ते आणिक नव्हे ।।१।। रज्जूवरी सर्पाभास । साप म्हणोनि घाम अंगास । हाकाटी केली लोकास । ते आले धावुनी ।।२।। दिवा घेऊनी आले हाती । कोणी दंड घेवोनि येती । कोणी मारा मारा म्हणती । परी काय तेथे ।।३।। साप म्हणोन भुई बडविती । सरली घाबरलियाची भ्रांती । प्रकाश जो भूमीवरती । तो दोर दिसे ।।४।। दोर दिसे तो सर्प नासे । भ्रांतीचे गेले पिसे । धीर गंभीर होतसे । प्रसन्न मन ।।५।। उरली नाही भीती । जीवीत्वाची आशा निगुती । राहिली शाश्वती । मेले मरण ।।६।। सर्पाभास लटिका । तो दोर उरला निका । दोरावरी आभास का । भास होय ।।७।। आभासक जीव । जरी अभ्यासक धरोनि भाव । तोचि सर्व दृश्या वाव । स्वयमेव सर्प दोरू रुपे ।।८।।

**पहा हो रज्जूपणे असता । मी भ्रमे सर्प भाविला होता ।**
**तो तरी रज्जूपणे आइता । असता भ्रांती केवढी ।।१४३।।**

रज्जू रज्जूपणेचि आहे । भ्रमे भाविला सर्प पाहे । दोररुपे तो आइताहे । भ्रांती परी केवढी ।।१।। दुजेपणे भ्रांती । एकत्वे भाविता शांती । स्थिरत्वे प्रचीती । दोररूपाची ।।२।। मूळी पाहता दोर । भ्रांतीने सर्प जाला घोर । तो जीवासी लागला घोर । जन्ममृत्यूचा ।।३।। जीवनाचा ओळखिता घोर । जीव जाला

बिनघोर । उकलीले जीवनाचे सार । सूत्ररूप ।।४।। येथ घोर निमाला । संसार सरला । संदेह फिटला । आत्मसूत्री ।।५।।

**तेवी ब्रह्म ब्रह्मत्वेचि असे । तेथे अपभ्रमे प्रपंचाकार भासे ।**
**ते गुरुकृपे पहाता काही न भासे । ब्रह्मचि असे स्वत:सिद्ध ।।१४४।।**

ब्रह्म ब्रह्मपणेचि असे । अपभ्रमे वरी प्रपंच भासे । प्रपंचाकार दिसे । जे सायासे चुकेना ।।१।। काही न करता आयास । जो हा प्रपंचाकार आभास । हातातोंडागाठी प्रयास । चिंतेचे सायास जीवनी ।।२।। जो न सापडे अनायास । तोवरी प्रपंच जरी विनायास । तरी जन्मांती न चुके आयास । संभ्रम जीवास जन्ममृत्यू ।।३।। गुरुकृपे पाहता । अनायास हाती येता । उडाली प्रपंचाची वार्ता । जे सायास दिननिशी ।।४।। स्वरूपावीण काही न भासे । तेथ स्वत:सिद्ध ब्रह्मची असे । जीवनधारणेमाजी ठसे । सबाह्यची निजरूप ।।५।।

**पहा हो ब्रह्मपणे असता । तेथ म्या जीव भाविला होता ।**
**तो गुरुकृपे भ्रम गेला आता । स्वत: सिद्ध मीची ।।१४५।।**

ब्रह्मपणेचि असता पहिला । तेथ मियाची जीव भाविला । तो भ्रम गुरुकृपे नुरला । उरला तो मी स्वत:सिद्ध ।।१।। स्वत:सिद्ध मीच आता । उरलो असे की स्वता । स्वता कोण हे कळता । स्वरूपाकार ।।२।। स्वरूप तो आपुले रूप । जे असे निर्विकल्प । जेथ संकल्प विकल्प । उरती ना ।।३।।

**ऐसे स्वत:सिद्ध जाणे आपणासी । प्रपंच तो ब्रह्म भासे तयासी ।**
**सोन्याचे श्वान केले तयासी । कुतरे म्हणिजेत काई ।।१४६।।**

स्वत:सिद्धचि आपण । जया गुरुकृपे हे ज्ञान । उडे प्रपंचाचे भान । उरे ब्रह्म ।।१।। एकाजर्नादनी सार । ब्रह्मरूप हा संसार । अभंगात बोधिती सार । श्रीएकनाथ ।।२।। मीपणे बुडाले घरी । नातरी ब्रह्मरूप संसार । सांगती श्रीज्ञानेश्वर । साचार अभंगी ।।३।। प्रपंच तो ब्रह्मभासे । सोन्याचे कुत्रे जसे । परी तया म्हणतसे । कुत्रे कोण ।।४।। का ते आहेच सोने । ते परीच येथ होणे । प्रपंचाकारे पहाणे । परी प्रपंच नव्हे ।।५।। कुत्रे सोन्याचे न भुंके । तेवी प्रपंच मोले हावतुके । प्रपंचाकार



देखे । परी न ठाके सुखदु:ख ।।६।।

**तेवी ब्रह्म प्रपंचकारे दिसे । परी ते प्रपंच झाले नसे ।**
**तंतू पटाकार भासे । परी पट नोहे तंतूची ।।१४७।।**

तंतू पटाकार दिसे । तंतूचि असे परी पट नसे । तयेपरिच हे ऐसे । येथ आहे ।।१।। ब्रह्म प्रपंचाकारे भासे । तरी ते का प्रपंच झाले असे । प्रपंच म्हणोन काही नसे । ब्रह्मत्व नसता ।।२।। ब्रह्म प्रपंच झाले नसे । जरी तो प्रपंच दिसे ऐसे । प्रपंच दिसे परी नसे । अखंडपणे ।।३।। म्हणोन ते ब्रह्मचि असे । जे उघड डोळ्यासी न दिसे । वैय्यर्थ कळता काहीसे । प्रपंचाचे ।।४।।

**तू म्हणसी पट प्रत्यक्ष दिसे तो कैचा नाही । परी पट काढून घेई तो तंतू देई ।**
**तंतू काढिता उरे काई । पटाशी उरी विचारी पां ।।१४८।।**

वस्त्र तरी प्रत्यक्ष दिसे । तरी ते नाही म्हणावे कैसे । परी हाती का वस्त्र येतसे । तंतू गेलिया ।।१।। तंतू जो काढोनि घेतले । तो वस्त्र नाहीच राहिले । तंतूचेनि वस्त्र झाले । ते तंतूचि की ।।२।। तंतू सत्य वस्त्र खोटे । मग ब्रह्मी तरी माया कोठे । जीवसूत्र हेचि मोठे । या प्रपंची ।।३।।

**प्रत्यक्ष तरंग दिसे । परी तरंगरूपे पाणीच असे ।**
**आणि तरंग घेता गवसे । पाणीच आघवे ।।१४९।।**

जरी ते उठती तरंग । परी पाणीच ते अभंग । पाणियाविण अंग । नसेचि त्याचे ।।१।। तरंग कोणी घेऊ गेले । तो ते पाणीच हाती आले । मग तया पाणियावेगळे । तरंग केवी ।।२।।

**तेवी देहाकार ब्रह्म दिसे । परी देह ब्रह्म जाले नसे ।**
**साखरेचे वृंदावन केले दिसे । परी ते काय कडू झाले ।।१५०।।**

देहाकारे ब्रह्म । दिसे जरी ते परम । पावले जरी देहनाम । तरी ते उत्तम देह नव्हे ।।१।। साखरेचे वृंदावन केले । तरी ते का कडू झाले । तेवीच हे असे भले । जाणती ते ।।२।।

**तेवी ब्रह्म प्रपंचाकार दिसे । परी प्रपंच झाले नसे ।**
**प्रपंच म्हणणे सांडिता असे । ब्रह्मचि आइते ।।१५१।।**

ब्रह्म न दिसे प्रपंच दिसे । का ते प्रपंचाकार भासे । परीही ते झाले नसे । प्रपंच गा ।।१।। प्रपंच शब्दाते । सारिता शब्देचि बाजूते । तेचि ते असे आइते । ब्रह्मचि की ।।२।। काट्याने काटा काढावा । तैसा हा प्रकार आघवा । शब्दाचा निरासू व्हावा । शब्देचि या ।।३।।

**आता किती वटवट वाचेची । आइता स्वत:सिद्ध तूची ।**
**गुढी उभारी आनंदाची । मी मी आघवा म्हणोनी ।।१५२।।**

वाचेची वटवट । हे उगाचि होय लटपट । जरी तेचि वाटे खटपट । फुकट ते ।।१।। शब्द बाजूसी सारिता । स्वत:सिद्ध आपण स्वता । निरुपाधी प्रत्यय येता । आनंदरूप ।।२।। आघवा मीचि विश्वलहरी । हे आनंदाची गुढी उभारी । ऐसी आनंदाची परी । सीमाचि नाही ।।३।।

**ऐसीच भावीस्थिती अखंडिता । मीच मी स्वत:सिद्ध आइता ।**
**नाना मते नाना रूपे तत्त्वता । मी माझी आघवी ।।१५३।।**

अखंडची स्वत:सिद्ध । आइता मी हाचि प्रबोध । भावी तसे भाव शुध्द । ऐसी ये परी ।।१।। नाना मते नाना रूपे । माझीच आघवी स्वरूपे । निजानंदी निर्विकल्पे । नि:संकल्पे सहजेची ।।२।।

**मीच मी परब्रह्म । ऐसा असो दे नेम ।**
**मुळीचे नि:सीम । परी वर्म सांगतो तुज ।।१५४।।**

मीच मी परब्रह्म । ऐसीये हे गौप्यवर्म । श्रुती बोले उत्तम । अहं ब्रह्मास्मि ।।१।। ऐसी नेमाचिये ज्या गोठी । धारणा जेणे साधिली कंठी । तेचि पोटी आणि दीठी । ओठीही गा ।।२।। असंग संग प्राणगाठी । प्राणैव आत्मा जाणुनि गोठी । जेणे साधिली हे कोटी । तो सनेम ।।३।। नेम प्राणासवे गाठी । हे वर्मचि आहे दिठी । जेणे सहजेचि भेटी । ब्रह्मास्मिची ।।४।। जेथ आपुले परम प्रेम । ऐसेचि जे नि:सीम । नसे सीमा असे परम । हा उपरम रमवी ज्या ।।५।। सन्निधची आत्माराम



। राम आत्मा आत्माचि राम । रमे तेथ का मनोरम । तोचि असे ।।६।। ऐसे कर्म एकनाथ । प्रेमभरेचि येथ । अंत:करणीचे सांगत । तेचि आत ठसावे ।।७।।

**आता जीवभावना सांडावी । मी ब्रह्म हेचि भावना भावी ।**
**मी तूपणा जाणणे जे जाणवी । ते मीच असे भावी तू ।।१५५।।**

भावनेची भावना जाये । का भावनेचा पालट होये । औषधेचि निरोगी स्वये । होत असे ।।१।। काहीतरी होय व्यथा । परी ती सांगता नये सर्वथा । कसेसेचि वाटे स्वता । नाही स्वस्थता म्हणोनि ।।२।। तेचि ते भवव्यथा । जीवभावना उमटे चित्ता । सुखी परी अवचिता । दु:खी दुश्चिता होय पै ।।३।। सद्गुरु वैद्य मिळे जरी । औषधेची पालट तरी । भावना पालट जरी । नुरी व्यथा ।।४।। जेथ देहाचा अध्यास । तेथ लागे नामाचा ध्यास । जीवन जगेन हे आस । होय निरास देहाचा ।।५।। ऐसा जयाचा हव्यास । तो होय जणू व्यास । नारदोक्ती भगवद्गुणास । सप्रेम गाये ।।६।। तो आली ब्रह्मभावना । तननननननन हे ताना । घेवोनी येई जीवना । मूळस्वरुपी ।।७।। वैद्य लाभला सुखदाता । रोग पालट झाला आता । गेली भवव्यथा । होय स्वस्थता स्वरूपेसी ।।८।।

**ऐसी ब्रह्मभावना दृढावली । बुद्धी ब्रह्मची होऊनि ठेली ।**
**मग मी ब्रह्म ही भावना राहिली । स्वत: सिद्ध असे म्हणोनि ।।१५६।।**

मग जीवभावना सरली । ब्रह्मभावना राहिली । भावनाचि पालटली । तो ब्रह्म काया ।।१।। व्यथा गेली तो भावना नुरली । प्रकृती निरोगी जाली । अखंड विश्रांती साऊली । लाधली हे निजसुखे ।।२।। बुद्धी आत्मप्रवण झाली । आत्मबोधे ठसावली । आत्मस्वरूपाकार भली । उरली ब्रह्मभावना ।।३।। का ते असे स्वत:सिद्ध । जे का सदाचि अभेद । जेथ भेद हा शब्द । उरला नाही ।।४।।

**मुळीचा जो राजा असे । तया राजा म्हणणे कायसे ।**
**म्हणता कृत्रिम दिसतसे । म्हणोन ब्रह्म म्हणणे ठेले ।।१५७।।**

श्रीमंताची श्रीमंती । काय ते सांगावी लागे पा ती । तयाची प्रचीती । घेती सकळ ।।१।। तया कायसी हिकमती । का जे आहेच सांगाती । का

शोभायमान जे होती । श्रीमंत गुणे ।।२।। श्रीमंतेचि शोभे श्रीमंती । श्रीमंतीने जे शोभती । ऐसी सहज ऐक्य स्थिती । दुणावे जेथ ।।३।। जयासी हे नाही स्थिती । तया करणे लागे युक्ती । तरीच लोक म्हणती । श्रीमंत तया ।।४।। परी तैसे येथे नाही । मग श्रीमंत म्हणणे हे काई । आणि ते म्हटले नाही । तरी ते का दरिद्री ।।५।। जे श्रीमंत ते श्रीमंत । तेथ म्हणणे हे कृत्रिम होत । तैसेचि काही येथ । तंत्र आहे ।।६।। म्हणोन ब्रह्म म्हणणेही ठेले । का ते ब्रह्मचि झाले । अखंड वैभव लाभले । आनंदाचे ।।७।।

**गेठा म्हणे मी काय सोने । म्हणता येत असे उणे ।**
**आपण सोने असता म्हणणे । भूलीच की जाणिजे ।।१५८।।**

सोने म्हणोनि बोभाट । करी का सोनियाचा गट । बोभाटलिया उत्कट । उणेचि वाटे ।।१।। सोने म्हणोनि बोभाटिता । कमीपणा तो तत्त्वता । का तयासि लागे सांगता । मी सोने म्हणोनि ।।२।। हे वृत्ती उठली । तो ते जाणावी भूली । का न सांगताचि भली । किंमत त्याची ।।३।।

**अहं ब्रह्म म्हणणे । ते म्हणती ज्ञान जाणणे ।**
**ते ज्ञानचि परी अज्ञान म्हणणे । दिसतसे ।।१५९।।**

जो जाणो ऐसे म्हणे । तो तरी काहीच नेणे । ऐसीया वर्म खुणे । पहावे जी ।।१।। जो म्हणे मला कळले । तया हाती काही न आले । जे कोणी म्हणती झाले । ते काहीच नव्हती ।।२।। नुसते अहं ब्रह्म हे म्हणणे । ते होय अज्ञानवाणे । ते ज्ञान परी मुखे बोलणे । अज्ञान होय ।।३।। का ते आहे स्थिती । अवस्थात्मक प्रचीती । अवस्थेचि उमटे चित्ती । जीवनातू ।।४।। चित्त होय चैतन्य । जेथ देह होय शून्य । बुद्धीमाजी ठसावे पूर्ण । परिपूर्ण जे ।।५।। मनासी नाही मनपण । इंद्रिया नाही इंद्रियपण । बद्धी जीव हे विलीन । चित्त चैतन्य होवोनि ।।६।। मग ते बोलणे । आता सांगा केवी होणे । मग ते बोलणे । ज्ञान कैसे ।।७।।

**ज्ञान तेचि अज्ञान । अद्वयानंदी कायसे जाणपण ।**
**द्वैत नसता कोणाकोण । जाणे येथे ।।१६०।।**



शब्दज्ञान ते अज्ञान । ज्ञानावस्थे शब्द लीन । का ते अनुभवे पूर्ण । सौरसु झाले ।।१।। जेथ होय स्वानुभव । तेथ नसे हे गौरव । शब्द जे असंभव । ते संभवे कै ।।२।। स्वानुभव तो स्वानंद । म्हणती जो अद्वयानंद । जो का एक आनंद । विषयातीत ।।३।। जेथ नाहीच जाणपण । आणि नसेचि नेणपण । का ते एकपण । दोन नसे ।।४।। मग तेथ कोणा कोण । जाणे येथे हे जाण । विचार करोन सुजाण । पाहिजे पा ।।५।।

**जाणावे ते बोलिजे ज्ञान । आपणा नेणे ते अज्ञान ।**
**नेणणे तरी हाचि आपण । तेथे जाणणे नेणणे कायसे ।।१६१।।**

जाणावे ते ज्ञान । आपणया नेणे ते अज्ञान । परी जेथ हाचि हा आपण । तो नेणणे काय ।।१।। जेथ जाण नेण सरे । तेथ हाचि आपण उरे । आणि जाण नेण पसरे । जयाचेनी ।।२।। पसरे आणि ओसरे । ओसरे आणि पसरे । आणि हे दोनी सरे । एकत्वेसी ।।३।। मग जाणीव नेणीव नाही । तये ठायी काय राही । आप आपणियानिही । ऐक्य जाले ।।४।।

**ज्ञाने उजळे ऐसा नाही । अज्ञाने मळे हे न घडे काही ।**
**तो स्वत: सिद्धची पाही । आइताचि असे ।।१६२।।**

जो ज्ञाने न उजळे । आणि अज्ञाने न मळे । साधकासी आतळे । निश्चयेसी ।।१।। जो का असे निश्चळ । स्वत:सिद्धची केवळ । आइताचि विमल । सुनील गा ।।२।।

**दीपे काय सूर्य उजळे । अंधारी काय मळे ।**
**तो मळे ना उजळे । स्वत:सिद्धचि असे ।।१६३।।**

सूर्य का उजळे दिव्याने । आणि का मळे अंधाराने । स्वयंप्रकाशे प्रकाशणे । जया लागी ।।१।। जो का स्वयंप्रकाशमान । का असे स्वयंपूर्ण । स्वत:सिद्धचि आपण । पाहता दिसे ।।२।।

**सूर्य कधी अंधारी वेष्टिला होता । या दिपे होय अंधार निवारिता ।**
**तो स्वयंप्रकाशरूप असता । दीप काय करी तेथे ।।१६४।।**

सूर्य का अंधारी सापडे । म्हणोन हाती दिवा जोडे । आणि तो अंधार दडे । जै उजेडे दीप तो ।।१।। दिवाकर जो आपण । तया दिव्याचे काय कारण । आणि तेणे अंधार निवारण । हे बोलणे कैचे ।।२।। तो तरी प्रकाशरूप । स्वयेचि झळके प्रदीप । तरी तेथे काय दीप । करी सांगा ।।३।।

**सूर्य अंधाराशी नेटी । काय तरी होय कल्पकोटी ।**
**सूर्ये अंधार देखिला नाही दृष्टी । तो वेष्टिला काई ।।१६५।।**

सूर्ये अंधार देखिला नाही । तो तेणे का वेढला जाई । अंधारासी करीत राही । धकाधकी ।।१।। हे तो बोलणेची वृथा । कपोल कल्पित दंतकथा । ययालागी काही अर्था । नसे सत्यता ऐसे जी ।।२।।

**तेवी आत्मा वेष्टिला अज्ञाने । म्या सोडविला ज्ञाने ।**
**आत्मा अज्ञाना भेटी होता उणे । घडे तया काय ।।१६६।।**

आत्मा वेढला अज्ञाने । ऐसे हे बोलो जाणे । तरी ते अज्ञान होणे । विचारी पा।।१।। जो वेढिलाचि नाही अज्ञाने । तो सोडविला मी ज्ञाने । अज्ञानाचा कळस गाठणे । बोलोनि हे ।।२।। सूर्यासी अंधार भेटे । हे बोलणेचि ओखटे । अज्ञान आत्मया झगटे । खोटेचि हे ।।३।। हे विधान आणि उणे । हे जाणोनिया घेणे । म्हणोन सुविचारी शहाणे । मानती ना ।।४।।

**भेटी होता तृणाग्नीशी । उरी नसे तृणाशी ।**
**तेवी आत्मया मिळणे अज्ञानाशी । उरी नुरे तया ।।१६७।।**

तृण जो अग्निसी मिळे । तो ते तयाचिया मेळे । समरस होवोनि गेले । उरले ना ।।१।। तेवी आत्मयाचे ठायी । अज्ञानासी उरी नाही । ते टिकेचिना काही । कोणे परी ।।२।।



**मुळी अज्ञानची नाही । तो आत्मा वेष्टिला काई ।**
**त्याची कल्पना तेचि पाहे । अज्ञानरूप ।।१६८।।**

अज्ञानाची कल्पना । तेचि अज्ञान ऐसे म्हणा । अज्ञान तेचि कल्पना । उपरी काय ।।१।। जे नसे ते भावना । तेचि ते गा कल्पना । मग ते वेष्टी कवणा । आत्मयासी ।।२।। अज्ञान हे मुळी नाही । तरी तेणे वेढिले काई । हे विचारेचि पाही । कळो येई ।।३।।

**ते कल्पना जैं मुरे । मग ते उर्वरित उरे ।**
**ते तू होवोनि राहे बारे । अखंडित ।।१६९।।**

कल्पना मनाचा स्वभाव । कल्पने कल्पिलासे जीव । कल्पना उपाधी सावेव । दृश्य दावी ।।१।। हे ऐसी कल्पनाचि मुळी । दो रूपाने नटली । विवेकेचिया मिळाली । स्वस्वरूपी ।।२।। मनोकल्पना जेथ । मुरे उरे कोण तेथ । तेचि ते होय अखंडित । उर्वरीत ।।३।। मन मुरे मग जे उरे । सेविसि ना ते तू कारे ।विचारिले श्रीज्ञानेश्वरे । अभंगी हेची ।।४।।

**अखंडीत परब्रह्म । तू हा न विसरे नेम ।**
**ते विसरे तरी चुकेल वर्म । पुन: जीवदशा नवजाय ।।१७०।।**

जे अखंड परब्रह्म । स्थितिस्थापक स्थायी परम । तया उपासनेचा नेम । अखंड तो ।।१।। अखंड ब्रह्मनेम न विसरे । तो अखंड ब्रह्मी सरे । देह दृश्य तो विसरे । जीवपण ।।२।। परी अखंड ब्रह्म न स्मरे । वर्म चुकोनि जैं विसरे । पुन: ते जीवदशा उरे । ऐसे होय ।।३।।

**ज्याची जीवदशा नवजाये । तो ब्रह्म केवी लाहे ।**
**मी सोहं ब्रह्म अद्वय । हाचि नेम असो दे ।।१७१।।**

जीवदशा न जाता । केवी पावे ब्रह्मावस्था । सोहं ब्रह्म ऐक्यता । हाचि नेम ।।१।। जैसा नेम तैसी स्थिती । स्थितीपरी ऐक्यवृत्ती । जैसी वृत्ती तैसी प्रचीती । येवोचि लागे ।।२।। अहंकाराचे प्रस्थ मोडता । मग ते सहजावस्था । परी तया काही आस्था । पाहिजे की ।।३।।

**जे सत्चिदानंदघन । ते मीच असे आपण ।**
**येणे भावने दृढीकरण । तोचि पूर्ण परब्रह्म ।।१७२।।**

जे सत्चिदानंदघन । जेथ काहीच ना न्यून । जयामाजी पोकळपण । नसे काही ।।१।। जरी का थोडी पोकळी । काही कोठे आली । तो तेथेचि शिरली । द्वैतवृत्ती ।।२।। पोकळीने फुटीर वृत्ती । जेणे नाशचि असे मागुती । तया आकाश निवृत्ती । हे अवस्था ।।३।। पोकळी म्हणून सुखसंवाद । एक मुक्त एक बद्ध । सर्व व्यवहार आनंद । देणे घेणे ।।४।। तो एक आशावाद । का जे पूर्ण नोहेचि सिद्ध । तेथ काय जी आनंद । परी सुख दुःख ।।५।। तैसा नव्हे हा वाद । हा तो एक ध्येयवाद । जेथ का आनंद । हाचि होय ।।६।। का तो असे स्वतःसिद्ध । म्हणोनि नाम सत्चिदानंद । विरळ नोहे घन प्रसिद्ध । अगाधची ।।७।। तेचि ते आपण । ऐसे जे दृढपण । तोचि ध्यासे नारायण । जीव पूर्ण ब्रह्म होय ।।८।।

**येणेपरी शिष्यराया । लटिकी मानोनि माया ।**
**मी साच परब्रह्म यया । ध्यास विसरु नको ।।१७३।।**

ब्रह्मी लटकोनि जो लटके । तया हे दृश्यजात लटके । नातरी येथ कोण टिके । खरे म्हणोनि ।।१।। माया हे आहेचि लटिकी । परी ते जया जाली लटिकी । तरी तोचि ब्रह्मसुखी । सुखी होय ।।२।। जागृत होता स्वप्न लटिके । का तेथ स्वप्न न टिके । तयाचि सारिखे । हेही गा ।।३।। जरी होय ब्रह्मावस्था । तरी हे सारी स्वप्नावस्था । परी येथचि होय तादात्मता । तरी ब्रह्म कोण ।।४।। मग ते ब्रह्माची होय भ्रांती । का ते नाही प्रचीती । का तयाचे स्मरण चित्ती । नाहीच की ।।५।। जयालागी जो ध्यास । जयासी जो हव्यास । सहज तेचि गिवसे तयास । का तो सोस म्हणोनी ।।६।। म्हणोनि ब्रह्म विसरो नये । तरी मग तेचि स्वागता ये । स्वागत होय उत्साहे । जीव होय ब्रह्मची ।।७।।

**एरव्ही लटिके ते लटिके । लटिके ते साच होयके ।**
**अथवा साच तरी लटिके । होऊ सके का होई ।।१७४।।**

एरव्ही काही खोटे आहे । परी ते खोटे असोनिही आहे । खोटे ते जरी



खोटे होये । खोटेपणे ।।१।। मग हे खोटे आहे । ऐसे जाणविले हे जिये । जे पूर्वी समजो नये । मग उमज कै ।।२।। तेचि होते लटिके । परी तेथ लटको न लटके । लटक लागता तेचि टिके । हे न टिके ।।३।। जे न टिके ते न लटिके । जे टिके तेथ लटके । मग दृश्य कवतुके । भासमय ।।४।। मग जे मुळीच नाही । ते आहे म्हणणे काई । आहे म्हणोन तरी काई । आहे होय ।।५।। जे नाही ते नाही । म्हणण्यासी प्रत्यवाय काई । जरी प्रत्यवाय नाही । जे नाही ते नाहीच ।।६।। मग जे नाही ते नाही । मग जे उरे तै आहे होई । आहे ते आहे म्हणती नाही । जरी कोणी ।।७।। ते नाही म्हटले तरी आहे । हे आहे म्हटले तरी नोहे। ऐसेचि जे काही आहे । तेचि ब्रह्म ।।८।।

**लटिके साचात शिरेना । साच लटकियात भरेना ।**
**दोहींची संगती घडेना । लटकियाचा भ्रम काय ।।१७५।।**

लटिके खऱ्यात न शिरे । खरे लटकियात न भरे । दोघे समागमे पुरे । येतीच ना ।।१।। लटिके वाहती पुरे । पुरा ऐसे वाहोन अपुरे । खरे ते असे पुरे । अपुरे नव्हे ।।२।। जरी दृश्याचा पूर ओसरे । आणि ओसरोनि जेथ सरे । तेथेचि जे का पसरे । ते खरे गा ।।३।। लटकिया परी श्रम । ते जीवासी वाटे उत्तम । जाले रूप आणि नाम । आकर्षण ।।४।। जे परी अरूप अनाम । जेथ नोव्हेचि संभ्रम । तया आगम निगम । वानिताती ।।५।। साच लटिके विसंगती । परी जग लावी त्याची संगती । तेणे जीवा अधोगती । सुसंगती चुके ते ।।६।। जरी होय सुसंगती । तरी या दोहोची लागे संगती । ते जरी दिसती सांगाती । परी ते संगती नव्हे ।।७।।

**साच आत्मा तो साच असे । लटकियात कोठेच असे नसे ।**
**लटकियाचे भय कायसे । वाहशी व्यर्थ ।।१७६।।**

जे मुळातची लटिके । तेथ का रमसी कवतुके । तयाचे भय कायसा निके । जे का व्यर्थ ।।१।। म्हणताचि माझे माझे । भ्रांतीचे ते होय ओझे । लटकीयाचे वांझे । साचपण ।।२।। साच आत्माचि सत्य असे । जयाचे संतालागी पिसे । लटकिया तो असे ऐसे । नसे कोठे ।।३।। तो आहेचसा चांगी । लटकीया अंगी तो न भोगी

। लटकीयासी जे वियोगी । ते भोगी आत्मयाचे ।।४।। जे देहदृश्याचे त्यागी । तेचि ते आत्मयोगी । आत्मसुख सर्वांगी । घेतु पैरा ।।५।।

**साच लटकियास जाणते । लटिके तरी साच ओळखते ।**
**या गोष्टी भेटी होती दोहीते । सुखदुःखाच्या ।।१७७।।**

साच ते खोटे जाणे । खोटे आहे म्हणोनि येणे । साच ते ओळखणे । सापेक्ष ते ।।१।। खोटे आहे म्हणोनि खरे । खरे वगळीता खोटे सुटे । खरे खोटे दोनी सरे । निरपेक्ष बरे उपरीये ।।२।। साच लटकिया भेटी । होती सुखदुःखाच्या गोष्टी । उठती कोटीवरी कोटी । जीवनी या ।।३।। जैं जीवनाची गाळणी । लाभ ते संजीवनी । आत्मलाभ आत्मपणी । आत्मया लागुनी प्रत्यक्ष ।।४।।

**हे साच हे लटिके । या दोहीशी जाणे ते निके ।**
**ते साच की लटिके । कीं दोहीहोनी वेगळे ।।१७८।।**

हे सत्य हे वोखटे । हे दोनी जिये प्रगटे । आणि तैं घसवटे । ज्ञानाज्ञाने ।।१।। या दोहोसी जे जाणे । तेचि ते निके होणे । ते लटिके की साचपणे । साच असे ।।२।। का ते असे निराळे । दोनी पासोनि वेगळे । का ते लक्षण आगळे । म्हणोनिया ।।३।। सर्वी जरी कोंदले । परी ते सर्वागळे । मनश्चक्षुसी न कळे । ते डोळे हे जाणति कैं ।।४।।

**साच म्हणणे ते साचा वेगळे । लटिके जाणे लटिकिया निराळे ।**
**उभयासि जाणते केवळ । ज्ञप्तिमात्र तू ।।१७९।।**

साच म्हणणे हे साचाहून । वेगळे होय जाण । लटिके ओळखे जे आपण । ते निराळे तयासी ।।१।। उभयासी जाणे जे केवळ । तो तू ज्ञप्तिमात्र निखळ । ऐसे हे ज्ञान सोज्वळ । होय जेणे ।।२।।

**हे ज्ञान हे अज्ञान । दोनी ते जाणे ते निजज्ञान ।**
**तेचि मी स्वये आपण । हाचि ध्यास असो दे ।।१८०।।**

जेणे योगे होय ज्ञान । आणि कळे अज्ञान । त्याचे ज्ञान तेचि ज्ञान । जाणिजे पा ।।१।। जेणे होय ज्ञानाज्ञान । त्याचे अज्ञान ते अज्ञान । ज्ञानाज्ञाना जाणे ते पूर्ण । निजज्ञान ओळखिजे ।।२।। तेचि ते आपण । स्वयमेव संपूर्ण । हाचि ध्यास पूर्ण । असो दे जी ।।३।।



**हा निश्चय बिंबल्या पूर्ण । मग कोणाचे कोण करी ध्यान ।**
**ध्येय धाता हे ओळखण । त्रिपुटीशी जेथे ।।१८१।।**

निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ । ऐसे हे वचन केवळ । ध्यानी असो ।।१।। आत्मनिश्चय पूर्ण । ठसावे जैं अंतःकरण । कोण करी येथ ध्यान । कोणाचे पा ।।२।। ध्येय ध्याता ध्यान । याची होता ओळखण । त्रिपुटीपैल आपण । त्रिपुटी कोठे ।।३।। ध्येय ध्याता ध्यान । ज्ञेय ज्ञाता ज्ञान । गेय गाता गान । नुरे साधन साधक साध्य ।।४।।

**ऐशा त्रिपुट्या कोट्यानुकोटी । त्या सर्वांचा साक्षी तू जगजेठी ।**
**साक्षीचा साक्षी तू अंतर्दृष्टी । तूचि जाणता ।।१८२।।**

ऐसिया परी त्रिपुटी । उठती कोटीवरी कोटी । तया सर्वांचा जगजेठी । साक्षी जो का ।।१।। तोचि तू तो साक्षी । आत्मत्वेचि आत्मया निरीक्षी । बाह्य चक्षूचेनि न लक्षी । चक्षी अलक्षी लक्षी का ।।२।। जै लक्षी अलक्ष । तै अलक्षची लक्ष । याची असे साक्ष । साक्षीसी पा ।।३।। ऐसा जो साक्षी । तो आपणा ते लक्षी । तयाचाही साक्षी । तोचि तो तू ।।४।। तूचि जाणता अंतर्दृष्टी । तुझी तुज अखंड भेटी । दृष्टीचिया पाठीपोटी । व्यष्टी समष्टी तोचि तू ।।५।। तूची तो जाणता । जाणतया होसी जाणता । मग तू खरा जाणता । जाणरूप ।।६।।

**जाणता म्हणो तरी जाणपण नाही । नेणता म्हणो तरी नेणपण नाही ।**
**नेणण्या जाणण्या ते जाणत पाही । तोचि तू असशी ।।१८३।।**

जाणपण नसोनि जाणता । नेणपण नसोनि नेणता । जाणणे नेणणे जाणता । दोही परौता तोचि तू ।।१।।

**असणे आणि नसणे । उभय नसोनि तुझेचि असणे ।**
**त्याही ज्ञानाज्ञाना ते जाणणे । तूचि बापा ।।१८४।।**

असणे आणि नसणे । इये दोनी घडे जेणे । ते तुझेची पा असणे । उभयावीण ।।१।। ज्ञानाज्ञाना ते जाणणे । तोचि तू आत्मपणे । परब्रह्मीचे ठेवणे । अनादि जे ।।२।।

**आता हे म्हणणे कासयासी । जे असे नसे ते तूचि अससी ।**
**आता कुंथाकुंथी कायसी । बद्ध मोक्षाची ।।१८५।।**

असे नसे ते तूचि अससी । का तू विश्वरूप प्रगटसी । काही दिससी न दिससी । ऐसा होसी ।।१।। जड चैतन्यासी हे गुंती । मग काहे कुंथाकुंथी । बद्ध मुक्त हे आइती । वार्ताचि नाही ।।२।। जेथ त्रिपुटीच नाही । तेथ त्रिपुटीचे बोलणे काई । आणि व्यवहार मग होई । का परमार्थ ।।३।।

**जो निरंजनवनी निजेला । तो कोणे सांग निजविला ।**
**पुन: जागा कोणे केला । सांग बापा ।।१८६।।**

जेथ जीवनाचे सौम्य ज्वलन । तेहि नुरे संचलन । ऐसे स्थिरपण पूर्ण । निरंजन ते ।।१।। तेथ जो निजत्वी आला । ऐसा प्रबोधे निजे आला । इयापरी जो निजेला । तो कोणे निजविला ।।२।। पुन: कोणे जागृती आणिला । हे सांगावे जी मला । निजत्वेचि चेईला । जो ये तुला निजत्वी ।।३।।

**तैसा चेताचे चेतविता हाचि । बोधा बोधविता हाचि ।**
**येथे दुसरा नाहिची । तूच तू आइताची ।।१८७।।**

चैतन्या जो चेतवी । निजबोधाते ते बोधवी । ऐसा दुसरा नाहीच विश्वी । काय सांगो ।।१।। तो तूचि एक आपण । अससी गा सत्चिद्घन । त्रिपुटी नाहीच ते निरसन । कासयासी ।।२।। हा एक विश्वी विलास । विलास म्हणताचि निरास । व्यवहारी तयास । सोयीसी म्हणती त्रिपुटी हे ।।३।। परी हे नोहेचि त्रिपुटी । आपआपणा पहात उठी । निजत्वेचि निजभेटी । दिठी होय ।।४।।



**आता तूचि होतासी । तरी भेद कर्तृत्वासी ।**
**जे जे करिसी ते तूच अससी । अद्वयानंदपणे ।।१८८।।**

अद्वयानंद तुझे रूप । जे जे करिसी ते तुझे स्वरूप । कर्ता क्रिया कर्म अपाप । निष्पाप निर्लेप एकची ।।१।। तूचि सर्व होसी । तरी भेदभावना कैसी । अभेद जे आपैसी । होऊनि ठेली ।।२।।

**आता तुज जाणे नाही कोण्या पदासी । भेटणे नाही कोण्या देवासी ।**
**देवाधिदेव तूचि अससी । सर्व व्यापक तूचि तू ।।१८९।।**

सर्वात्मक तू आपण । तरी जाणे कोण ठिकाण । जाणे जाणारा जाणेचे ठिकाण । तोहि तूची।।१।। सर्व विश्वी जो तू स्थिर । आणि नव्हेसी अस्थिर । असिजे का निरंतर । अंतर नुरे ।।२।। जेथ नोहेचि अंतर । ते तोडावयाचा विचार । आणि येरझार । असंभव ।।३।। जो नाही येरझार । तो कोण पद गाठणार । हे घेता विचार । कळो येई ।।४।। जो तू देवाधिदेव आपण । तो भेटसी कोण्या लागुन । कोणासि भेटे कोण । सांगिजे पा ।।५।।

**व्याप्य व्यापकपण केवि साहे । आपणचि तो अवघा आहे ।**
**या दोहीसी नाही ठाय । व्यापकपण कैचे ।।१९०।।**

व्याप्य व्यापकपण । स्थिती स्थापक गहन । हे तो नोहेचि सहन । जयालागी ।।१।। का सर्वाचे सर्वपण । ऐसे ज्याचे व्यापकपण । जो आघवाचि होय आपण । मी तू पण सरोनी ।।२।। या दोहोसी नाही ठाय । का ते अविभाज्य होय । आणि ऐसीये स्थिती केली सोय । व्यवहाराची ।।३।।

**अकर्ता अभोक्ता म्हणिजे । तरी हे बोलणे न साहिजे ।**
**काही केलेच नाही या भोगिजे । काय तेणे ।।१९१।।**

अकर्ता अभोक्ता म्हणो जाये । तरी हे बोलणे न साहे । काही केलेचि ऐसे नोहे । ते भोगणे कै ।।१।।

**भोक्ता भोग्य भोगणे । हे त्रिपुटी तेथे क्षीण ।**
**सर्व भोक्ता तयाविण कोण । तरी भोक्ता ना अभोक्ता ।।१९२।।**

जो सर्वची आपण । पाहता असे त्रिपुटीवीण । का ते जेथ क्षीण । संपूर्ण ते ।।१।। भोग्य भोक्ता भोग कोण । सांगाजी मज आपण । त्रिपुटी जै विलीन । जरी भोक्ता ना अभोक्ता ।।२।। भोक्ता ना अभोक्ता कोण । अभोक्तांना कोठे भोक्तेपण । .सापेक्षता हे नोहेचि न्यून । जे संपूर्ण निरपेक्ष ।।३।।

**जयाचा संकल्प गेला होय । तो भोगित असता भोक्ता नोहे ।**
**पाहता अवघा तूचि आहे । तरी कोण कोणा भोगी ।।१९३।।**

जयाचा संकल्पची नुरला । तो भोगासक्त नव्हे भला । म्हणोनि भोग जरी घडला । निरासक्ती भोग नव्हे ।।१।। संयोगिच होय वियोग । तो त्याग होय भोगुनी भोग । संगी दिसे परी असंग । निश्चळत्वे ।।२।। जो का असे निश्चळ । आणि नव्हेचि चंचळ । तोचि त्रिपुटी निरसोनि निखळ । शुद्धबुद्ध ।।३।। जरी तूचि अवघा होये । कोण कोणा भोगिताहे । आणि स्वयेचि भोगी जो स्वये । तरी तो नोहे भोगु की ।।४।। मग कोण कोणाते भोगी । जो अखंड स्वये योगी । का नव्हेचि वियोगी । उपाधीने ।।५।।

**काय आकाशी आकाश लोळे । काय पाणी पाण्यात खेळे ।**
**हे बोलणे कासया मिळे । तेचि असता ।।१९४।।**

आकाशात अभ्र खेळे । परी आकाश का आकाशी लोळे । का जे नोहेचि निराळे । म्हणोनिया ।।१।। पाणीयात मासा खेळे । पाणियात परी पाणी उसळे । म्हणोन का ते खेळे । म्हणावे गा ।।२।। पाणीयावाचोन पाही । जेथ तो काहीच नाही । मग तो का खेळ होई । पाणीया पाण्याचा ।।३।। आकाश ते आकाशी लोळे । पाण्यासीया पाणी खेळे । हे बोलणेची न मिळे । का ते एकत्व म्हणोनी ।।४।।

**असो हे ते ऐसे । वटवट करणे कायसे ।**
**आता दृढ धरी मानसे । मीच अवघा म्हणोनि ।।१९५।।**



मीच सर्व म्हणोनि । घट्टची धरी जे का मनी । तोंडाची वटवट करोनी । उपेगा नये ।।१।। बोले ते काय करी । का तो काहीच न करी । करतयासी वेळचि परी । बोलाया नाही ।।२।। हाता तोंडाची पडता गाठी । मुखातुनी शब्द उठी । जीवशिव होता भेटी । शब्द दिठी न तोंडी ।।३।।

**आता मीच मी अवघा हेचि दंडी । काही न करी सांडी मांडी ।**
**तूच तू अवघा जडाजडी । अवघेवीणपणे ।।१९६।।**

मीच मी आवघा हे धारणा । सांडी मांडीचे कामना । मी तू तू मी चेता चेतना । अवघेवीण ।।१।।

**अवघा तूचि तू एक । हेही म्हणविता नाही आणिक ।**
**आता एकावीण एक । एकलाचि ।।१९७।।**

आवघा तूचि तू एक । ऐसे जो म्हणे तो नाही आणिक । म्हणणारा म्हणविणारा देख । म्हणणेही तू ।।१।। जेथे नाही भेद दृष्टी । ते एकपणाची कायसी गोठी । एकावीण एक दिठी । ऐसे एकले ।।२।। दोन आहे म्हणोनि एक । ऐसे हे नव्हेचि एक । परी जे एकीएक । ऐक्यपणे ।।३।। सापेक्ष नव्हे म्हणोन । जे एकावीण एकलेपण । तेचि आपण । साचचि पा ।।४।।

**एकला तू म्हणणारा । का कोण म्हणसी दुसरा ।**
**तरी तोचि तू खरा । नाही दुसरा आन कोणी ।।१९८।।**

एक तूचि हे म्हणणारा । हा कोण तुजहोन दुसरा । नव्हे तोहि तूचि खरा । एक पुरा अससी गा ।।१।।

**आता नसेल तरी नसो का । व्यर्थ वचवच वाढऊ नका ।**
**आता तुझे सुख तूच घे का । ऐक्य बोधाचे ।।१९९।।**

नसेल ते नसो उगाच । परी हे नको वचवच । जेणे होय कचकच । देहबुद्धी ।।१।। तुझे तूचि सुख । आता एकमेव एक । ऐक्यबोधे बोध एक ।

प्रचीती गा ।।२।। जेणे होय एक प्रचीती । ते ऐक्यबोध स्थिती । जये अवस्थे इये मती । स्थिर होय ।।३।।

**ते सुख गा अभंग । सुख ते सागरीचे तरंग ।**
**मीचि मी अभंग । अखंड होवोनि राही ।। २००।।**

जयाशी नाही भंग । ऐसे सुख ते अभंग । सुखसागरी तरंग । सुखचि ते ।।१।। मीच मी तो अभंग । तेथची सदा दंग । अखंडची माझे रंग । जया खंड नाही ।।२।।

**होय म्हणो जरी तूचि अससी । येऱ्हवी विसर पडला होता तुजसी ।**
**चुकला सापडला आपणासी । आता विसंबू नको सर्वथा ।।२०१।।**

होय म्हणो जरी । तूचि आघवा अससी तरी । चुकी ते परी जाली । अंतरी विसरेची ।।१।। स्मृती होता ते तुजसी । आपआपणा सापडसी । जो स्वता विस्मृतिने सांडसी । हेचि वर्म ।।२।। आता हे जे स्वयंभे । सापडले तया न विसंबे । भरो नको देह दंभे । असोन निर्दंभे स्वयेची ।।३।।

**तव शिष्य म्हणे गुरुराया । तुमचा बोध केवी जाय वाया ।**
**उगवला असता सूर्योदया । सामर्थ्य काय तमासी ।।२०२।।**

दिशा फाकता अंधार गेला । तो का सूर्योदयी राहिला । सांगावे जी मला । विचारेसी ।।१।। अंधारासी हे सामर्थ्य काय । जो सूर्योदयीही मांडी ठाय । हे ऐसे केवी होय । सूर्यप्रकाशे ।।२।। तेवी गुरुराय तुमचा प्रबोध । तेथ कोण राहू शके बंध । दृष्टी होवोनि अंध । शुद्धबुद्ध न होति ।।३।। व्हावे चित्त शुद्ध। ऐसाचि हा तुमचा बोध । जो अमृताचा बुंद । अमर करी ।।४।। आत्मबोध आत्मप्रतीती । तेथ कैसी राहे भ्रांती । भ्रांतीच ना कोण होती । वाया जगी ।५।।।

**तुमचा बोधसूर्य गहन । विसर तमा करी छेदन ।**
**स्वत:सिद्ध बोधा पालट करी कोण । करु शके स्वामीया ।।२०३।।**



तुमचा श्रीगुरुबोध । पाहता तो नव्हे शब्द । जो होय विशद । अंगेचिया ।।१।। जे आपण जगी । क्रियाशील सर्वांगी । निजछंदे निजयोगी । नासे वियोगी अवस्था ।।२।। हे न जाले योगायोगी । जे स्वयेचि स्वयंरूप भोगी । जीवभाव देह त्यागी । विरागी ये ।।३।। विगतराग विरागी । पूर्ण होवोनि वीतरागी । स्वरूपीच अनुरागी । जगी ठेला ।।४।। विसर तमांध विध्वंसन । जो प्रबोध करी आपण । ऐसा निजबोध प्रमाण । निरसोन उपाधी ये ।।५।। तया पालटे ऐसा कोण । विश्वामाजी शक्तिमान । आहे सांगा जी आपण । गुरुराया ।।६।। काया पालट मन पालट । चित्त पालट बुद्धीपालट । जीवनाची आलटापालट । नुरे घट देहबुद्धी ।।७।। ऐसीया बोधासी । जगी तोड नाही यासी । जो एकदाचि पालटवी वृत्तीसी । एकसरा ।।८।। बोधे एकदाचि पालट । परी पुन: न होय पालट । का साधिला आलट । पलटही त्रिकुटी ।।९।। जरी का होय पालट । तरी तो आला देहावरी स्पष्ट । मग ते बोधाचे चोखट । पण कोठे ।।१०।।

**तुम्हा ऐसा दाता । पाहता त्रिभुवनी ना सर्वथा ।**
**तुम्हासी उपमा देता । ना तुळे काही ।।२०४।।**

पार नाही दातृत्वपणा । दानसम्राट तू राणा । दानशूर तू आपणा । दिससी लोचना समर्था ।।१।। समर्थाचिया पंगती भोजने । तळल्या वरल्या एकचि पक्वान्ने । श्रीज्ञानेशांची अमृतवचने । सत्य सत्य ।।२।। श्रवणी जे पेरीले । तेचि नयनासी आले । म्हणोन हे न तुळे । आतळे जे कृपेसी ।।३।। दाता तो एक जाणा । स्मरवी जो नारायणा । श्रीतुकोबाराय खुणा । सांगती अभंगी ।।४।। ऐसा जगी दाता । कोणी न दिसे पहाता । म्हणोन सद्गुरु समर्था । उपमा न साजे ।।५।।

**कामधेनूची उपमा द्यावी । ती कल्पित अर्थ पुरवी ।**
**कल्पनातीत भेटवी । सद्गुरुरावो ।।२०५।।**

कामधेनू परी होई । ऐसे म्हणावे जरी सोई । तरी कामधेनू देई । कल्पिले ते ।।१।। कामधेनू वसिष्ठासी । मिळाली चरितार्थासी । जेणे विश्वामित्रासी । चकित केले स्वागते ।।२।। ते पुरवी कल्पित अर्थ । जे साधोनि देई स्वार्थ ।

परी हा निर्विकल्प परमार्थ । देणेसी समर्थ नव्हे जी ।।३।। संकल्प विकल्प । सारोनि भेटवी निर्विकल्प । ऐसे सामर्थ्य अमूप । सद्‌गुरूंचे ।।४।। कल्पनेची उपाधी । सारोनि दावी निरुपाधी । ऐसा का जे सुसंधी । संधीकाली दर्शनाची ।।५।। ऐसे आत्मदर्शन । जो करवी आपण । दावी दृष्टी दर्पण । चित्तार्पण चैतन्यी ।।६।। जे नव्हेचि कल्पित । म्हणोनि जे कल्पनातीत । ते दाविती जे समर्थ । हा गुह्यार्थ जेथीचा ।।७।। म्हणोनि हे उपमा नये । ऐसेचि येथ म्हणो ये । तया वानावे कोणे काये । कोण शब्द ।।८।।

**चिंतामणीची उपमा द्यावी । तरी तो चिंतिले अर्थ पुरवी ।**
**सद्‌गुरुरावो भेटवी । अचिंत्य दानी ।।२०६।।**

जरी म्हणावे चिंतामणी । तरी जे चिंता ते पुरवी झणी । परी आत्मचिंतनी । नेदी आत्मप्रत्ययो ।।१।। चिंता नुरवोनि निश्चिंत । करीत जे सद्‌गुरुनाथ । जीवनाची निश्चिती निश्चित । जे दावित निश्चये ।।२।। शाश्वती निश्चीती स्थिरता । जीवनासी निवांतता । कृपाकर माथा येता । सरे चिंता जीवाची ।।३।। भेटविती अचिंत्य दानी । आणोनिया आत्मचिंतनी । चिंतेची जागा पटकावुनी । जीवनी दे स्वानुभव ।।४।। तया गुरुते चिंतामणी । म्हणेल का सांगा कोणी । जेणे कृपे चक्रपाणी । भेटे जीवनी कृपेसी ।।५।।

**परीस लोहाचे परी सुवर्ण करी । आपणा ऐसे न करी ।**
**सद्‌गुरू आपणा ऐसे करी । परब्रह्म शिष्यासी ।।२०७।।**

लोहो परीसाची उपमा । न देववे श्रीतुकारामा । ऐसा सद्‌गुरु महिमा । अगाध अभंग बोलती ।।१।। परीसासि जैं लोह संलग्न । तै तयाचे होय सुवर्ण । परी तयासी आपण । परीस न करी ।।२।। परी हा सद्‌गुरु दयाळ । शिष्या आपणाचि ऐसा करी तात्काळ । काही न लगे काळ वेळ । तयालागी ।।३।। सद्‌गुरु तो आपण ब्रह्म । शिष्याचा घालविती भ्रम । नाठवोचि जो संभ्रम । तो दवडिती ।।४।। नाठव तो भवभ्रम । दुरावता कृपेचि वर्म । आठव तो ब्रह्म । ऐसे करिती ।।५।। जे शिष्यासी ब्रह्म करिती । ऐसे जे ब्रह्ममूर्ती । तयासी या त्रिजगती । उपमा काय ।।६।।



**यालागी तुमचे दातेपणा । उपमा दीजेल कवणा ।**
**चिदानंद चिद्‌घना । देता दाता तूचि एक ।।२०८।।**

म्हणोनि तुमचे दातृत्वासी । तोड नाही पाहता ऐसी । म्हणोनि त्रिजगती तुम्हासी । उपमा नाही द्यावया ।।१।। तू तो चिदानंद चिद्‌घन । स्वामी समर्थ आपण । नवल तुझे महिमान । वानावे कैसे ।।२।। आणि आपुले देसी पद । हे कृतीच अगाध । जरी तुझे परी भाव शुद्ध । देसी सर्वस्व तयासी ।।३।। करोनिया निजबोध । शिष्या करीसी चिदानंद । ऐसे तुम्हीच विशुद्ध । विमल जगी ।।४।।

**चिदानंद दान देवोनि पूर्ण । केले अखंड चिद्‌घन ।**
**ऐसीया उपकारा उत्तीर्ण । केवी होय स्वामीया ।।२०९।।**

चिदानंद चिद्‌घन । ऐसे जे आपण । तेचि ते सर्वस्वार्पण । शिष्यालागून करीतसा ।।१।। आपणासी राखून । जगी लोक करिती दान । तुम्हा ऐसे परिपूर्ण । न दे कोण ।।२।। तुम्ही स्वत:चि पूर्ण । शिष्या करिता परिपूर्ण । देवोन तयासी संपूर्ण । पूर्णपण आपुले ।।३।। ऐसे आपुले उपकार । पाहता स्वामी अपार । तेथ कोण असे प्रकार । उत्तीर्ण होण्या ।।४।।

**तुमचे देणे सदोदित । सांसारिक देणे सर्व नाशिवंत ।**
**म्हणोनि उत्तीर्णपणाची मात । काय करु येईना ।।२१०।।**

तुमचे श्रीसद्‌गुरु हे देणे । कल्पतरूहोनि कोटीगुणे । का ते असे अखंडपणे । अनुस्यूत ।।१।। तुमचे देणे सतत । पहाता जे शाश्वत । येर जे याचका देत । नाशिवंत असे ते ।।२।। आपण देता ते शाश्वत । जे सर्व व्यापुनि असत । म्हणोन उणे जेथ । नोहेचि की ।।३।। तरी आता म्हणोन । कैचेनि व्हावे उत्तीर्ण । हे माझे मन । विचारी पा ।।४।।

**तव श्रीगुरु बोलती शिष्यासी । आम्ही निरुपिले तैसा वर्तसी ।**
**तरी सर्वस्व पावले आम्हासी । निश्चयेसी जाण पा ।।२११।।**

तव श्रीगुरु आपण । बोलती शिष्याकारण । व्हावया तरी उत्तीर्ण । तुझे मन चिंतीतसे ।।१।। तरी तुजलागोन । आम्ही जे केले संपूर्ण । एथवरी निरूपण

। स्पष्टीकरण ।।२।। शिष्यराया तू तैसा वर्तसी । जे ऐकिले ते इयेपरी ऐकसी । तरी हे श्रवण घडले तुजसी । आणि आम्हासी समृद्धी ।।३।। आम्ही जे कथिले तुजसी । तेचि तू जैं आचरसी । तरी सर्वही आम्हासी । मिळाले गा ।।४।। तुझे सर्वस्वपण । आम्हालागुन । सहजेचि होय अर्पण । होऊन उत्तीर्ण येणेपरी ।।५।।

**आम्ही ब्रह्मज्ञानी पूर्ण । जग हे सर्व अज्ञान ।**
**ऐसा धरिसी अभिमान । तरी ब्रह्मत्व जाय ।।२१२।।**

जो जाहलो म्हणो जाये । तया हाती काहीच न ये । कळले म्हणता कळो नये । ऐसा पुरावा ।।१।। तुम्हासी झोप का लागली । ऐसी कोणी केली बोली । तो हा म्हणे हो लागली । तरी न लागली हे सिद्ध ।।२।। आम्हा झाले ब्रह्मज्ञान । हे म्हणणेचि अज्ञान । आणि जग वाटे अज्ञान । तो अज्ञान कळस ।।३।। जगाते पारखो गेले । ते स्वतासीच अंतरले । नाही नाही ओळखिले । आपणा त्यानी स्वतासी ।।४।। जरी होय ब्रह्मज्ञान । समूळ जाय अभिमान । तो येताचि आपण । ब्रह्मत्व जाये ।।५।। जरी ज्ञाने निरभिमान । तेचि ते ज्ञान । यांचे असो दे संधान । शिष्यराया ।।६।।

**जो स्वये ब्रह्म होये । तो सर्व जग ब्रह्मत्वेचि पाहे ।**
**भेदाचे अंधारे जाये । अभेद सूर्य प्रकाशता ।।२१३।।**

जैसी दृष्टी तैसी सृष्टी । दृष्टी सृष्टी वाद उठी । आपणा ऐसी कोटी । भासे जगी ।।१।। आप मेला जग बुडाला । ऐसे व्यवहारी बोलती बोला । आपण सुखी तो सुखी झाला । सकळ लोक ।।२।। आप सुखी तो जग सुखी । आप दुःखी तो जग दुःखी । बोलती हेचि शेखी । जाती तरी ।।३।। जो ब्रह्म होय स्वये । तो जगची ब्रह्म पा होये । भेदाचा अंधार न राहे । अभेद सूर्ये ।।४।। सूर्यासी नाही अंधार । अभेदा नाही भेद विचार । का जे अंतर । निरंतर शुद्धची ।।५।।

**पूर्वे प्रकाशता गभस्ती । तये क्षणी सर्व दिशा उजळती ।**
**की अंधारे वेष्टून राहती । की प्रकाशती जाण पा ।।२१४।।**

सूर्योदय पूर्व स्थिती । तेव्हाचि दिशा फाकती । आणि तम दवडिती । कानोकानी ।।१।। मग पूर्व दिशेप्रती । जई सूर्योदय प्रचिती । तै क्षणार्धे न लागता उजळती । सर्व दिशा ।।२।। कायसा राहे अंधार । हा घेई पा विचार । तरी कळो येई सार । गुज ऐसे ।।३।।



**तेवी आपण ब्रह्म होय । तो जगही सर्वही ब्रह्म पाहे ।**
**तयाचा भेदचि जाय । होवोनि ठाया जगचि ब्रह्म ।।२१५।।**

आपण जैं ब्रह्म होये । जग सर्व ब्रह्म दिसो ये । जग ब्रह्मचि होतसे ठाये । अधिष्ठानी ।।१।। तेथिचा जावोनि भेद । ते अनुभवा ये अभेद । अभेदामाजी आनंद । अनुभव ।।२।।

**तू जगासी ब्रह्म होई । जग ब्रह्म तेचि पाही ।**
**जग सर्व मानी माझे ठायी । हेचि उतराई होणे सदा ।।२१६।।**

ब्रह्म पहाणे का होणे । हे जाणोनिया घेणे । पहाता श्रुतिवचने । कळो येई ।।१।। देव पहावा देव पहावा । ऐसे वाटे मानवा । परी तोचि तो व्हावा । हे बोधिती संत ।।२।। तू देवासारिखा बैस । मोठे सांगती लहानास । देव न पाहताही तयास । कल्पना आहे ।।३।। जेथ नाही सायास । जे सहज विनायास । स्वस्थ होता आपणास । देव होणे ।।४।। जो स्वस्थ तो देव होय । देव होय तो देव पाहे । देव न होनि पाहो जाये । तया न दिसे ।।५।। हे सर्व अधिष्ठानी । श्रीसद्गुरुचे जो मानी । आणि न पडे मानामानी । उत्तीर्णपणी राही सदा ।।६।।

**तू अहंममता अभिमान सांडिशी । वित्पत्ती चातुर्य गाळिसी ।**
**जगा धाकुटा म्हणविसी । हेचि उतराई होणे आम्हा ।।२१७।।**

तू अहंपण सांडोन । टाकी ममत्व अभिमान । व्यत्पुत्तिशास्त्र चातुर्य ज्ञान । बाजूस ठेवी ।।१।। दशेंद्रिया कुटोनि । धाकुटा म्हणविसी जगी झणी । तरी तू उत्तीर्ण आम्हालागोनी । होसी बापा ।।२।। लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा । तुकोबाराय प्रार्थिती देवा । प्रति हेची ।।३।।

**सर्व जीवास दया करिसी । दु:ख हरोनि सुख देसी ।**
**संता ते कुरवंडी करिसी । हेचि उतराई होणे आम्हा ।।२१८।।**

सर्व भूतांची दया । हेचि भांडवल यया । नाही ममता आणि माया । देहि या गा ।।१।। भूतदया हे सदया । जेथ भाव नुरे काया । प्रथम सुगम साधन सखया । हेचि असे ।।२।। साधन हे ऐसे । जयाचे गा चित्ती वसे । मायाजाळ तरी नासे । सहजेचि ।।३।। सर्वांचे दु:ख हरोनी । दयेचि सुख देसी तयांचे मनी । संतासी कुरवंडी करोनी । उतराई होसी ।।४।।

**म्हणसी उत्तीर्ण काय होईजे । तरी हेचि उतराई होईजे ।**
**जे सर्वभूती असिजे । निर्वैर होवोनि ।।२१९।।**

कोण्या जीवाचाही न मत्सर । कोणेहि ठायी नाही वैर । हेचि पूजा सर्वेश्वर । गोड करी ।।१।। तरी निर्वेर व्हावे । सर्व भूतमात्रासवे । हेचि तत्वज्ञान आघवे । मुरे अंगी ।।२।। तरी तू होसी उतराई । हेचि आम्हा सांगो पाही । गुरुभक्तीची कमाई । नवाई हे ।।३।।

**अवघा तूचि तू अससी । तरी वैर करणे कोणासी ।**
**म्हणोनि आर्जव सर्वासी । असो देई शिष्यराया ।।२२०।।**

दुसरे कोणी नाहीच जर । अवघा अससी तूचि तर । तरी कोणासी वैर । करणे होय ।।१।। म्हणोनि हो आर्जवी । सरळपणाचि राहे जीवी । अर्जुनाचे वृत्तभावी । आर्जव ते ।।२।। सरळ राहोनि सर्वासी । तू गा उतराई होसी । हेचि धरी गा मानसी । प्रियोत्तमा ।।३।।

**जीव म्हणीतला म्हणवुनी । ही भावना भाविसी हो झणी ।**
**ब्रह्मभावनाचि भावी मनी । भेद सांडोनि बापा ।।२२१।।**

जीव म्हटला म्हणोनि । जीव भावला भाविसी झणी । तरी ब्रह्मभाव ठेवोनि मनी । अभेदू राहे ।।१।। तोचि तो अभेद । जये ठायी नाही भेद । अद्वैत श्रीगोविंद । ओळखिजे ।।२।। जरी सर्वत्र अद्वैत । श्रीगोविंद प्रतिती तेथ ।



रामनाममाला जेथ । मनोमाळे अखंड ।।३।। ऐसे पितृदेव सांगती । याची घ्यावी जी प्रचीती । का ते तैसेच होती । आचरणी ।।४।।

**जो हा भेदाकार प्रपंच दिसे । ते ब्रह्मचि विस्तारले असे ।**
**तेथ ब्रह्मवाचोनि आन नसे । हे भावना असो देई ।।२२२।।**

प्रपंच दिसे भेदाकार । व्यष्टीरूपेचि साचार । परी तो विस्तार । या ब्रह्मीचा ।।१।। अभेदी जे प्रवाहिले । ते भेदाकार भासले । परी अभेद संचले । जैसे तैसे ।।२।। ब्रह्मवाचोनि आन नसे । म्हणोन ते ब्रह्म असे । भेद नसे अभेद असे । परी हे गिवसे गुरुपुत्रा ।।३।।

**ब्रह्म प्रपंचाकार विस्तारले । ते लोपले की शोभेसी आले ।**
**रत्न किळेने लोपले । की शोभले तेणेचि ।।२२३।।**

ब्रह्म प्रपंचाकार । तरी प्रपंच ब्रह्माचा विस्तार । मग ते आकसले अरुवार । की शोभले गा ।।१।। अखिल विश्वाचा चैतन्यगाभा । तरी विश्व हे तयाची शोभा । आणि तया स्वयंभा । निर्दंभा न झाकवे ।।२।। रत्न कील प्रभा । प्रभा ते रत्नाची शोभा । मग ते लोपे रत्न गर्भा । सप्रभ जे ।।३।।

**सुवर्ण खोटीचा गोळा । बांधला वधूचिया गळा ।**
**तरी ते शोभेची कळा । दिसो येईल काय ।।२२४।।**

सुवर्णाचा गोळा । बांधिला जरी वधूच्या गळा । लग्न मंडपी शोभेला । आणि का तो ।।१।। हे सांगा वेगी मला । करोनि विचार चांगला । तैसाचि हा हिशेब झाला । ब्रह्माठायी ।।२।।

**त्या खोटीची भूषणे करोनिया । अंगी प्रत्यंगी लेवविलिया ।**
**ते सुवर्ण जाय वाया । की शोभे आले ।।२२५।।**

सोनियाचिये लगडी । भूषणे केली ते सवडी । लेवविली बहु आवडी । प्रीती भरे ।।१।। लेणी जी अंगी घातली । तो तया श्रीमंतीस शोभा आली ।

सोनियाची झाली । किंमत खरी ।।२।। ते सुवर्ण वाया न गेले । परी ते खरेचि शोभले । आणि शोभायमान झाले । लेणारासी ।।३।। चैतन्य विश्वाकार झाले । ते शोभुनि दुणावले । आणि तेणे शोभविले । जाण तयासी ।।४।।

**तेवी ब्रह्म प्रपंचाकार दिसे । परी ते काही लोपले नसे ।**
**तेणे तेचि शोभले असे । असे कळे जयासी ।।२२६।।**

ब्रह्म जरी प्रपंचाकार । तरी मग का ते लोपे तर । शोभायमान होय सुंदर । पहा तरी ।।१।। ऐसे कळे जयासी । वर्म सापडे तयासी । न पडता सायासी । सुख शांतीसी पावे जी ।।२।।

**सागर तरंगे भरला । सागरपणा काय झाकला ।**
**की विशेष शोभे आला । विचारी पा ।।२२७।।**

तरंगानीच सागर भरला । तरी ते झाकती सागराला । का सागरची उसळला । उल्हासाने ।।१।। तरी ते का शोभा आली । का सागराची निवृत्ती झाली । आणि प्रवृत्ती उरली । तरंगांची ।।२।।

**ब्रह्मसागरीचा तरंग । ते हे जाणिजे जग ।**
**जगपणा सांडिता सर्वांग । ब्रह्मचि असे ।।२२८।।**

जग ब्रह्माचा विलास । जग ब्रह्माचा उल्हास । म्हणोन होय दृश्याभास । जाणिजे पा ।।१।। तरी हा कळता विलास । ब्रह्म व्यापिले सर्वास । आपणचि प्रत्यक्ष । ब्रह्मरूप ।।२।।

**ब्रह्मसागरीचा तरंग । तू आपणीया भावी जग ।**
**ब्रह्मसागरची सर्वांग । होवोनि असे ।।२२९।।**

तू आपणा ठायी । भावी जे का इहि । ब्रह्मसागरी होई । तरंग जग ।।१।। ब्रह्मसागरी हे तरंग । तो ब्रह्मसागर सर्वांग । अनुस्यूत अभंग । अखंड असे ।।२।।



**होवोनि ठायी म्हणता । तरी पूर्वी काय नव्हता ।**
**जितुका भ्रम झाला होता । तो गुरुकृपे प्रकाशला ।।२३०।।**

आपण ते व्हावे । तरी पूर्वी काय होतो आघवे । ठिकाणावरी यावे । तरी जाणार कोठे ।।१।। भ्रम नुरोनि उरले ब्रह्म । हे गुरुकृपेचे वर्म । प्रकाशाठायी तम । उरेल कैचा ।।२।। गुरुकृपेचा प्रकाश । तो दृश्याचा निरास । परब्रह्माचा निदिध्यास । तो सर्व ब्रह्म ।।३।।

**जो सूर्य आभ्रे अच्छादिला । अभ्र जाता सूर्य काय नवा झाला ।**
**तेवी तू भावी आपणाला । मी स्वत:सिद्धची असे ।।२३१।।**

सूर्य अभ्राने आच्छादिला । तो कोण पहिला । अभ्राने झाकिला । तरी कोण ।।१।। मग ते अभ्र बाजूसी जाता । सूर्य का नवा उगवता । तो जैसा तैसा स्वता । स्वयंसिद्ध ।।२।। गडबड सारी अभ्रपटला । परी ते नसे सूर्यगोला । तो जैसा तैसाचि ठेला । अखंडत्वे ।।३।। आभाळ आले आणि गेले । का ते आले म्हणोनि गेले । आणि गेले म्हणोनि आले । हेचि वर्म ।।४।। जे आले ते जाई । जे जाई ते येई । परी जे असे तेचि राही । शाश्वत गा ।।५।। जातकाची नवाई । कळता कळे कोण राही । हे जाणोनिया लाही । निजरूप ।।६।। तैसे तू भाविजे आपणासी । तरी स्वत:सिद्ध दशा ऐसी । श्रीगुरुकृपेसी । प्राप्त होये ।।७।।

**आता असे नसे हे किती । वटवट करिता संत क्षोभती हसती ।**
**तू अखंड राहे ब्रह्मस्थिती । समदृष्टी सदा ।।२३२।।**

आता असे नसे हे किती । जे सांगितले युक्ती । नुसते बोलोनि काय कृती । जाली पाहिजे ।।१।। बोले ते काय करी । करतया बोलाया वेळ नुरी । हातातोंडाची गाठी तरी । बोलणे संपे ।।२।। हे तो जीवाशिवाची गाठी । जे गुरुवाक्याची गोठी । जेथे कृती स्वये उठी । आणि नुठी जीवपण ।।३।। तुका म्हणे जीवी शिव । हाचि येथीचा अनुभव । ऐसे हे सोलीव । अध्यात्म गा ।।४।। बोलण्यात आयुष्य गेले । तो कृतीमाजी काय आले । कृतीवीण वाया जाले । प्रत्ययाचे सौरसु ।।५।। पंथी पाऊल नच पडले । तरी अंतर नाही तुटले । मग केवी होय गाठले । ध्येय पै गा ।।६।। उगाचि करिता वटवट । नाही तोचि बोभाट । संता

न रुचे हे स्पष्ट । हासेचि होय ।।७।। त्यांचे हे हसे । आपण जाणोन घ्यावे ऐसे । वर हसे परी आत असे । कल्याणार्थ राग तो ।।८।। कल्याणार्थ राग । तो राग नव्हे अनुराग । जाणोन जरी उपाधी त्याग । आत्मभोग यौगीक ।।९।। जे का असे अखंड । तेचि होई जे अखंड । तरी तू उदंड । धन्य होसी ।।१०।। अखंड सुटता होय खंड । खंडेचि वाटे पाखांड । जे का असे पाखड । पाखडावे ते ।।११।। म्हणोनिया समदृष्टी । सम जीवन सम सृष्टी । साम्यावस्था भेटी चोखटी । समबुद्धी सम नामी ।।१२।। जेथ सरेचि विषम । ऐसे जे का सम । तेचि ते परब्रह्म । आत्मरूप ।।१३।।

**हे वाक्पुष्प पूजा । घडो श्रीगुरुराजा ।**
**एकनाथ म्हणे बुझा बुझा । हा ग्रंथ जे अनुभवोनि पाहती ।।२३३।।**

मनेचि वाक्पुष्प मोगरा । अर्पिला श्रीसद्गुरुवरा । तरी आता संसारा । येणे नसे ।।१।। वाक्पुष्प हे शेवंती । अर्पिलीया श्रीगुरुमूर्ती । तरी पुनरपी संसृती । येणे नाही ।।२।। हे वाक्पुष्प अर्पण । असो श्रीगुरुते वंद्न । पूजा जाली समर्पण । बुद्धी ऐसी ।।३।। हेचि घडो गुरुराजा । जन्मवरी हे तव पूजा । आले नीज नीज गुजा । बुझोनिया जीवभाव ।।४।। हा ग्रंथ अनुभवोनि पाहती । तयासीच कळे ही महती । श्रीएकनाथ हद्गत बोलती । श्रीजनार्दना ।।५।। जन नोहे अवघाचि । जनार्दन असे हाची । हे परिपूर्ण प्रचीती जयांची । तेचि ते श्रीएकनाथ ।।६।।

**ते या देहीच ब्रह्म होती । ते जाणती बृहदारण्यश्रुती ।**
**ते ओळखती । या ग्रंथाते ।।२३४।।**

बृहदारण्य श्रुती । जे अभ्यासेचि जाणती । तेचि ते ओळखती । या ग्रंथाते ।।१।। जे हा अभ्यासती ग्रंथ । ते या देहीच ब्रह्म होत । धन्य धन्य जीवन्मुक्त । ऐसा महिमा ।।२।।

**मी तरी संतांचा दासानुदास । तेणे वाक्ये रचू पद्मदास ।**
**तुम्ही ओळखिले हा विश्वास । दृढ माझा ।।२३५।।**



संत दासांचे दासांचा दास । असावे हा मनी उल्हास । ना तरी उदास । दृश्य देही ।।१।। आणिक नाही हव्यास । श्रीगुरुचरणाचा निदिध्यास । आणि ते हर्षेचि सहर्ष । हत्पद्मी ।।२।। चरणी वाहतो स्तुती सुमने । मनेचि चालीली अंतरी नमने । मनाचिया उन्मने । चाले सेवा ।।३।। तुम्हीच एक ओळखले । तेणे जीवनाचे सार्थक जाले । तुम्ही आपुले म्हणीतले । कृतकृत्य भले हेचि जगी ।।४।। निवांत राहोनि विश्वास । म्हणोनि सोडिले विश्वास । विश्वरूप दर्शनास । तव पदास मिठी जाली ।।५।।

**जव कृपा तुमची न जोडे । तव स्वानुभवज्ञान केवी घडे ।**
**तुमचे कृपे ज्ञान अनुभव जोडे । म्हणे एकनाथ ।।२३६।।**

नाम रूप सोपे । जो गुरुचिया कृपे । तेणेचि अपापे । ज्ञान जाले ।।१।। तैसे हारपले आपणपे पावे । जे संताते पाहता गिवसावे । श्रीज्ञानेश्वरे केले ठावे । वर्म ऐसे ।।२।। कृपेचिया प्रत्यया आले । मुक्ताबाई हेचि बोले । सर्व संती अनुभविले । हेचि एक ।।३।। आला नावा रुपा । तुका म्हणे झाला सोपा । येणेचि स्वस्वरूपा । गाठी होय ।।४।। ना तरी श्रीएकनाथ । हेचि प्रार्थिती जनार्दनाप्रत । जै गुरुकृपासूर्य तळपत । तैं तमांधु जाय ।।५।।

**हा ग्रंथ अध्यात्मपूर्ण । गुह्याचेही गुह्य ज्ञान ।**
**जो नित्य करी पठण । तो चैतन्यघन होवोनि राहे ।।२३७।।**

हा ग्रंथ अध्यात्माचा । ज्यात विचार प्रधान आत्म्याचा । आत्मा प्रधान तरी साचा । अध्यात्मग्रंथ ।।१।। ज्यात प्रधान भौतिक । तेचि ते आधिभौतिक । हे विचारे सम्यक । पहाता कळे ।।२।। अध्यात्मशास्त्रामाझारी । जो रंगे तो त्याचा अधिकारी । अंतरंग प्रकर्षे भारी । म्हणोनिया ।।३।। नुसते वाक्चातुर्य । हे नव्हेचि गा चातुर्य । बोलण्याचे जरी चातुर्य । तरी तुर्य नव्हे ।।४।। म्हणोनि हे अध्यात्म । का येथ उकल आत्मानात्म । नुरोनि जीवन संभ्रम । निर्भ्रम ब्रह्म स्वानुभवे ।।५।। आकाशमार्गी गुप्त पंथ । जाणती योगी ये समर्थ । हाचि असे गुह्यार्थ । श्रीसमर्थांचा ।।६।। हे गुपिताचे गुपित । हे इंगिताचे इंगित । हे साराचे सारभूत । हृदयंगम तत्त्व असे ।।७।। ऐसे हे जे गुह्यज्ञान । जो नित्य करी नेमे पठण । श्रवण मनन

निदिध्यासन । तै तेचि गती तया ।।८।। तइं तोचि तू आपण । होवोनि राहे चैतन्यधन । जयाचे सरले पोकळपण । शब्दज्ञान ।।९।।

**येथिचा गुह्यार्थ पाहता । ब्रह्मत्वे पूर्ण होय श्रोता वक्ता ।**
**मुक्ती सायुज्यता । पाया लागे ।।२३८।।**

शब्दाठायी अर्थ । अर्थाठायी ध्वनी घुमत । तैं प्रसाद उमटत । चित्तावरी ।।१।। जे चित्ताची प्रसन्नता । ऐसा हा प्रसाद जोडता । अर्थस्वरूप अर्थार्था । जोडले की ।।२।। जो जोडे अर्थार्थ । तोचि जयाचा निजस्वार्थ । तोचि तो परमार्थ । हा गुह्यार्थ अर्थरूप ।।३।। गुह्यार्थ तो गूढार्थ । गूढार्थ तो निगूढार्थ । वरी वरी न पावत । उथळपणे ।।४।। जयाची दृष्टी सखोल । तयासीच लाभो येल । अंतरीच नाही ओल । तो फोल अर्थ पै ।।५।। स्वार्थ हाचि जया अर्थ । उपाधीचा नोहे स्वार्थ । म्हणोनि जया नाही स्वार्थ । स्वत्व अर्थ ओळखिला ।।६।। तोचि तो गा परमार्थ । जो जोडी चारी पुरुषार्थ । स्वार्थाची जै निष्ठा । पराकाष्ठा ।।७।। स्वार्थाची जैं पराकाष्ठा । तो देहाची ना प्रतिष्ठा । जो संपादिजे इष्टा । निजत्वासी ।।८।। निजगुजा गूज जोडिले । तयासीच हे तो कळे । कृतिरूप होवोनि वळे । घेई सुवेळे स्वानुभव ।।९।।औट हाताचा हा मळा । येथ राबती बारा सोळा । विधात्याने जप मांडिला । अमृतवेळा ।।१०।। ऐसे गुज हे लाभता । तरी पूर्ण होय श्रोता वक्ता । अखंड लाभे ब्रह्मावस्था । ब्राह्मी स्थिती ।।११।। सलोकता समीपता । सरूपता सायुज्यता । चारी मुक्ती पायी माथा । ठेवोनिया राहती ।।१२।।

**जो वेदशास्त्राचा गुह्यार्थ । साचाही देखण्या हा परमार्थ ।**
**निजज्ञानासी सामर्थ्य । होय या ग्रंथे ।।२३९।।**

वेदशास्त्रांचे मथित । ऐसे हे काढिले नवनीत । जो का असे गुह्यार्थ । आनंदाचा ।।१।। हा साचा सत्य परमार्थ । खरा खरा निजस्वार्थ । निजज्ञानेचि समर्थ । सामर्थ्यवंत ।।२।। ऐसा आनंदानुभव ग्रंथ । उकलोनि ठेला यथार्थ । धन्य धन्य श्रीएकनाथ । जनार्दन शिष्यवर ।।३।। एक एकाजनार्दन । दुजे रामजनार्दन । तिजे जनीजनार्दन । जनार्दन महिमा वाढविती ।।४।।



**येथे विवेक उजळे । अनुभव विवळे ।**
**आपण आत्मा हे कळे । गुरुकृपेने ।।२४०।।**

नित्यानित्य वस्तुविवेक । जेणे उजळे अलोलिक । ऐसा हा एक अमोलिक । अलौकिक स्वानुभव ।।१।। म्हणोनि तो आनंदानुभव । जेथ विरले अनुभव । जयाचा श्रेष्ठ प्रभाव । त्रिपुटी निरास ।।२।। आपण आत्मा हे कळे । यया स्वानुभवाचेनि मेळे । आत्मत्वेचि न्यहाळिले । आत्मयाते निरुपाधी ।।३।। धन्य धन्य श्रीगुरुकृपा । जेणे परमार्थ जाला सोपा । चुकती चौऱ्यांशीच्या खेपा । यातायाती ।।४।।

**हा ग्रंथानुभव पाहे । तो स्वयेचि ब्रह्म होये ।**
**नित्य पठण करिता लाहे । आपुला निजठेवा ।।२४१।।**

ऐसा हा ग्रंथानुभव । जेणे प्रगटे ब्रह्मभाव । देहभाव जीवभाव । शिवभावही नुरोनी ।।१।। येथिचिया ज्ञान सोये । जो का होय ब्रह्म स्वये । नित्यनेम पठणे लाहे । निजठेवा ।।२।। निजठेवा प्रसादमेवा । स्वये घ्यावा आणि द्यावा । नव्हे नव्हे लुटावा । जीव जाता ।।३।। लुटिताही जो न संपे । ऐसा असेचि अमुपे । जो न प्राप्त होय तपे । करोनिया ।।४।। ऐसा हा आनंद । एक जाणे श्रीगोविंद । अखंड श्रीहरीकीर्तनी धुंद । आपणाठायी ।।५।। श्रीएकनाथांचे हरिकीर्तन । जेथ तीन तपे भगवान । सेवा करी न कळो देऊन । ते फेड करी गोविंदजी ।।६।। श्रीहरिकीर्तन । श्रीहनुमतप्रभु आज्ञाप्रमाण । जयालागी हेचि वचन । जोडलेसे ।।७।। श्रीपांडुरंगमहाराज म्हणत । श्रीगोविंदजी एकनाथ । बुधगावचे गुंडुबुवा गौरवीत । परमार्थी पुरा म्हणोनि ।।८।। ऐसे पितृदेव गोविंद । म्हणोनि कीर्तनाचा आनंद । आनंदानुभव सनद । अनुभवानंद ।।९।। ऐसी जवळीक लाभली । तेणे श्रीएकनाथ सेवा घडली । प्रेमभावे समर्पिली । पितृदेवा ।।१०।। श्रीज्ञानेशांचा अमृतानुभव । तैसाचि नाथाचा आनंदानुभव । दोघांचाही अभिनव । विलास हा ।।११।। श्रीज्ञानेशांचा ज्ञानविलास । नाथांचा आनंदविलास । स्फुरलासे सहर्ष । श्रीगुरुकृपे ।।१२।। उद्‌धवराव यरगट्टीकर । स्वप्नी प्रगटोनी साचार । आशीर्वाद निर्भर । दिला सप्रेम दासरामी ।।१३।। मार्गशीर्ष शुद्‌ध षष्ठीप्रती । श्रीउद्‌धवरावांचे पुण्यतिथी । समर्पिली ही सेवाभक्ती । **दासरामी** ।।१४।।

*******

## श्रीएकनाथमहाराज यांची आरती

**१**

आरती एकनाथा । संतराया समर्था ।
पताका भागवत । फडके ही तुझी सत्ता ।। १ ।।
पांडुरंग टाळधरी । केवी तुमचे कीर्तनी ।
चंदन स्वये घासी । कावडीने भरे पाणी ।। २ ।।
दासोपंत चरणी शरण । दत्तात्रेय दारी पहाता ।
दासराम निवांतचि । पायी ठेवितो माथा ।। ३ ।।

**२**

आरती एकनाथा । जय जया समर्था ।
जन नोहे जनार्दन । अनुभव हा चित्ता ।। ध्रु ।।
तुका म्हणे भागवत । केले श्रुत सकळा ।
मुक्तीवरील गुरुभक्ती । मागे उद्धव स्तुतीला ।। १ ।।
माऊलीचा अवतार । नाथा म्हणती नारीनर ।
समाधि संजीवन । दावियली साचार ।। २ ।।
ज्ञानेश्वरी शुद्ध पाठ । थोर उपकार केला ।
अखंड कीर्तनाने । देव ऋणीच कला ।। ३ ।।
जनार्दन एकनाथ । ध्वजा लाविली भागवत ।
साधुसंत गात कीर्ती । दासराम वंदीत ।। ४ ।।

**श्रीदासराममहाराज केळकर**

# श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा


१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र................१९४०
२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ..१९५२
३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश, साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार.......१९६८
४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)...........१९६९
५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१
६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२
७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत.......................१९७३
८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र.................(सन दिलेला नाही)
९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)....१९७४
१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र....................................................१९७५
११) सिद्धस्तुती........................................................१९७७
१२) अमृतानुभव मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.........................१९७९
१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र..................................१९८३
१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र...............................(सन नाही)
१५) गुरुपाठ..........................................................१९८४
१६) सांप्रदायबोध.................................................... १९८४
१७) श्रीरामपाठामृत..................................................१९८४
१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र....................................१९८४
१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र..............................१९८७
२०) नित्यपाठामृत.....................................................१९८७
२१) संजीवनपाठ......................................................१९८७
२२) श्रीदासरामवचनामृत...............................................१९८७
२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति.......................................१९८८





# श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा



२४) श्रीगोविंददर्शन...................................................१९८८
२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत.....................१९८८
२६) श्रीदासरामगाथा..................................................१९८८
२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण.....................१९८९
२८) श्रीगुरुमहिमा.....................................................१९९१
२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ...................................१९९७
३०) श्रीरामदासबोध...................................................१९९७
३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला...................................१९९९
३२) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह)..२००२
३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी........................२००२
३४) आरती संग्रह.....................................................२००२
३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ.........................................२००२
३६) हरिपाठ संकीर्तन..................................................२००७
३७)श्रीदासराममहाराज : श्लोकरचना....................................२०१०
३८)अनुभवामृत, सम-ओवी-टीकेसह....................................२०१०
३९)परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी....................................२०१०
४०)आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०१०
४१) ग्रंथत्रयी.........................................................२०११
४२) उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०११
४३) सद्बोध दशक....................................................२०११
४४) गुरुराजकथित ज्ञान आणि बोध ....................................२०११
४५) आत्मलहरी.......................................................२०११
४६) श्रीदासराममहाराज यांची प्रवचने.....................................२०१२

## श्रीबापूरावजी केळकर ऊर्फ
## श्रीमामामहाराज केळकर यांची आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंग साधु बोधा ।।१।।
हनुमंत सद्‌गुरु आज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।२।।
ब्रह्मचैतन्यादी संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।३।।
श्रीराम जय राम जय जय राम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे *दासराम* ।।४।।

– श्रीदासराममहाराज

## श्रीदासराममहाराज केळकर यांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।
सद्‌गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्‌ध । धरुनि रूप सिद्‌धानंद ।।१।।
सिद्‌धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

– प्रा.डॉ.के.वा.आपटे

## श्रीसंत पांडुरंगमहाराज ताम्हनकर कृत अभंग

एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ।।ध्रु।।
पंचक्रोशी ही दत्तप्रभूंची । कृष्णा वाहे अमृत जलाची ।
पावनभूमि तपोवनाची । स्थान पाहूनी रमला ।।१।।
कुलसंशोधन करिता करिता । केळकरांचे आले चित्ता ।
अनंत तनुची घेऊनी सत्ता । राधाकुशी अवतरला ।।२।।
एकनाथ गोविंद जाहला । हनुमंताची दीक्षा त्याला ।
नाम रसाचा पिऊनी प्याला । रंगी रंगुनि गेला ।।३।।
दासबोध हरिपाठ भागवत । ज्ञानेश्वरी रामायण सांगत ।
प्रवचन कीर्तन रंगी नाचत । डोलवी श्रोतृगणाला ।।४।।
पैठण क्षेत्री अतृप्त हेतू । सांगलीत पूर्णेच्छा होतू ।
हरिभक्तीचा कळस डोलतू । *पांडुरंग* मनी भरला ।।५।।

****

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज : आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत(ओवी टीकेसहित) | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम(श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्बोध दशक (श्रीदासरामरक्षास्तोत्रासह) | २७ | २०११ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र (आवृत्ति ३री) | २८ | २०११ |
| श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध | २९ | २०११ |
| प.पू.श्रीमाईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र | ३० | २०११ |
| पाठांतरसुलभ भगवद्गीता (आवृत्ति २ री) | ३१ | २०११ |
| श्रीदासराममहाराज लिखित लघुचरित्रे | ३२ | २०११ |

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत मनोबोध व निवडक अभंग (विवरणासह) | ३३ | २०११ |
| प.पू. सद्गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर | ३४ | २०११ |
| महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का | ३५ | २०११ |
| तो हा दासबोध | ३६ | २०११ |
| श्रीदासराममहाराज चरितामृत (२ री आवृत्ति) | ३७ | २०११ |
| श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र ( ४ थी आवृत्ति) | ३८ | २०११ |
| श्रीदाजीसाहेबमहाराज चरित्र | ३९ | २०११ |
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र | ४० | २०११ |
| श्रीदासराममहाराज यांची आत्म लहरी | ४१ | २०११ |
| हरिनामसंकीर्तन | ४२ | २०१२ |
| श्रीदासराममहाराज यांची प्रवचने | ४३ | २०१२ |
| प.प.सद्गुरु श्रीमामामहाराज केळकर चरित्र | ४४ | २०१२ |
| दासरामगीतम् | ४५ | २०१२ |
| श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (आवृत्ती तिसरी) | ४६ | २०१२ |
| चैतन्यब्रह्म | ४७ | २०१३ |
| श्रीदासराममहाराज विरचित वायुलहरी विवरण | ४८ | २०१३ |
| श्रीदासराममहाराजकृत विवरणासह सात करुणाष्टके | ४९ | २०१३ |
| श्रीगुरुलींगगीता | ५० | २०१३ |
| चिमड सांप्रदायातील पंचपदी (विवरणासह) | ५१ | २०१३ |
| गुरुलींगगीतेचे अंतरंग (भाग-१) | ५२ | २०१४ |
| राम दास बोध | ५३ | २०१४ |
| श्रीदासरामायण | ५४ | २०१४ |
| वास्तुशांत | ५५ | २०१४ |
| श्रीदासराममहाराजकृत रेवणसिध्दपाठ (विवरणासह) | ५६ | २०१५ |
| गुरुलींगगीतेचे अंतरंग (भाग-२) | ५७ | २०१५ |
| अभंगदरबार (आवृत्ती दुसरी) | ५८ | २०१५ |
| श्रीदासरामचरित्र | ५९ | २०१५ |
| आत्मारामपाठ | ६० | २०१५ |
| श्रीज्ञानेश्वरी (अध्याय ६ वा)(श्रीदासरामकृत अर्थासह) | ६१ | २०१५ |
| श्रीमत् दासबोधातील प्रपंचयोग | ६२ | २०१५ |
| अभंग दरबार भाग-२ | ६३ | २०१५ |
| श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग (श्रीदासरामकृत अर्थासह) | ६४ | २०१६ |